ISBN 978-81-925945-6-9
शासनमान्य यादीतील क्रमांक १४६/२०१५

विदर्भातील अष्टविनायकांचा थोडक्यात
परिचय करून देणारा संशोधनपर ग्रंथ

# वैदर्भीय अष्टविनायक

## डॉ. पवन मांडवकर

**डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र**
इंदिरा महाविद्यालय, कळंब
जि. यवतमाळ ४४५४०१
भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८
e mail : marathipradhyapak@gmail.com

(या पुस्तकात संकलन केलेल्या किंवा प्रकाशित मजकुरात काही ठिकाणी तफावत आढळू शकते. पुढील आवृत्तीसाठी अधिकची माहिती, सूचना, बदल, तृटी यांसंदर्भात भक्तांनी, अभ्यासकांनी कळवावे, ही विनंती.)

मूल्य एकशे पन्नास रुपये

- ISBN 978-81-925945-6-9
- शासनमान्य यादीतील क्रमांक १४६/२०१५
- **वैदर्भीय अष्टविनायक**
  (Vaidarbhiya Astavinayaka)


- © प्राचार्य डॉ. पवन मांडवकर
  © (Principal Dr. Pavan Mandavkar)


- लेखक – संपर्क : ९४२२८६७६५८


- प्रकाशन क्र. १०
- प्रथमावृत्ती प्रती १०००  - आकार क्राऊन
- मुखपृष्ठ फोर कलर  - पृष्ठसंख्या ११६
- प्रथमावृत्ती १७ सप्टेंबर, २०१५ (श्रीगणेश चतुर्थी)
  (भाद्रपद शुद्ध चतुर्थी)
- संगणक/मुखपृष्ठ
  डॉ. पवन मांडवकर
- प्रकाशक/मुद्रक/वितरक
  डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
  इंदिरा महाविद्यालय, कळंब,
  जि. यवतमाळ ४४५ ४०१
  e mail : marathipradhyapak@gmail.com
  भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८, ९४०३०१४८८५
- सहयोगी वितरक
  सेवा प्रकाशन
  विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४ ६०६
- मूल्य १५० रुपये

# दोन शब्द

प्राचीन वेदकालापासून आजपर्यंत श्री गणेश स्वरूपात बदल होत गेला आहे. काही दैवते काळाच्या ओघात नष्ट झाली तर काही उन्नयन स्वरूपात लोकप्रिय झाली. इंद्र आणि वरुण ही दैवते वेदकालात लोकमानसात रुजली होती; परंतु त्यांच्या उपासना, स्तोत्रे, वैदिक ऋचा, हवनादी विधी या सर्वांद्वारे ऐहिक जीवनात संपन्नता मागण्याची प्रवृत्ती काळाच्या ओघात कमी झाली. श्रीकृष्णाने पर्जन्यासाठी इंद्रपूजा करण्याची परंपरा गोकुळात मोडली आणि गोवर्धनाची पूजा आरंभिली होती, इंद्राचा रोष ओढवून घेतला होता, तसेच बदल पुढेही होत गेले असावेत. 'विष्णू' ही देवता वेदकालात महत्त्वाची नव्हती. पुढे तिचे उन्नयन होऊन ती 'विश्वपालनकर्ती' देवता झाली. 'रुद्र' ही देवता वैदिक काळात महत्त्वाची होती. तिचे स्वरूप बदलून पुढे शिव–महादेवात ते दिसू लागले. रौद्र स्वरूपातील असणाऱ्या शनीची आणि हनुमानाची पूजा आणि पुढे यक्षदेवता, रक्षणकर्ते म्हणून होऊ लागली. नंतर श्री हनुमान, श्री गणेश यांचे पूजन अधिक प्रमाणात होत गेले असावे. अनेक ऐतिहासिक, पुरातन गावांच्या वेशीवर या दोन्ही देवतांची मंदिरे अथवा मूर्त्या पहारेकऱ्याप्रमाणे आजही दिसतात.

चौदा विद्या आणि चौसष्ट कलांची अधिष्ठात्री देवता श्री गणेश हे सर्वमान्य असे दैवत आहे. विविध जाती, धर्म, पंथ संकटनिवारक श्री गणेशाला पूजतात, मानतात. कुठल्याही कार्याची सुरुवात किंवा नवनिर्मिती श्री गणेश पूजनाने होते. यवतमाळ जिल्ह्यातील कळंब ही कर्मभूमी असल्याने व

चिकित्सक दृष्टी असल्याने मी बरीच वर्षे अध्ययन करून 'श्री क्षेत्र चिंतामणी कळंब' हे पुस्तक २०१० मध्ये प्रकाशित केले. त्यातूनच पुढे अनेक भक्त, इष्टमित्र व अभ्यासकांनी वैदर्भीय अष्टविनायकांवर लिहिण्यास सुचविले. संशोधनपर लिखाणाची आवड, श्री गणेशावर श्रद्धा, आवडता आणि कुतूहलाचा हा विषय असल्याने गेल्या कितीतरी वर्षांपासून जो संकल्प केला होता, तो या पुस्तकाच्या रूपाने पूर्णत्वास जात आहे, यात आनंद आहे. मात्र हे लिखाण परमेश्वरानेच माझ्याकडून करवून घेतले, मी निमित्तमात्र आहे, हे नम्रपणे नमूद करतो. ज्याने सर्व सृष्टी निर्माण केली, त्याच्यावरच भाष्य करण्याची आपली ती बिशाद काय?

महाराष्ट्रातील अष्टविनायकांसंबंधी आता मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी झाली आहे. गाणपत्य संप्रदायाविषयी माहिती असणाऱ्या आध्यात्मिक चिंतनपर 'श्रीमुद्‌गलपुराण' या ग्रंथात सर्वप्रथम अष्टविनायकांची संकल्पना आढळते. या पुराणात ९ खंड असून त्यापैकी ८ खंडांमध्ये श्री वक्रतुंड, श्री एकदंत, श्री महोदर, श्री गजानन, श्री लंबोदर, श्री विकट, श्री विघ्नराज, श्री धूम्रवर्ण अशा आठ गणेशावतार व लीला वर्णन केल्या आहेत. आठ खंडात मत्सरासुर, मोहासुर, मदासुर, लोभासुर, क्रोधासुर, कामासुर, ममासुर, अहंकारासुर असे आठ असुर असून त्यांच्या विनाशासाठी हे 'अष्टविनायक' प्रगटले आहेत. साहजिकच हे मानवी विकार असून त्यांना नियंत्रणात आणण्याकरिता अष्टविनायकांच्या उपासनेचे महत्त्व जणू मांडले गेले आहे.

या पुराणात नमूद अष्टविनायक हे भारताच्या आठ दिशांना स्थापित आहेत. आठही दिशांनी जणू ते आपले रक्षण

करतात. चेन्नईमध्ये श्री वक्रतुंड, कालडीजवळ श्री एकदंत, धनुष्कोटी किंवा धनुष्कोडीजवळ (रामेश्वरम) श्री महोदर, तंजावरमध्ये श्री गजानन, गणपतीपुळे येथे श्री लंबोदर, काश्मीरमध्ये शंकराचार्यांच्या टेकडीजवळ श्रीविकट, हिमालयात ज्योतिर्मठाजवळ श्री विघ्नराज, तिबेटची राजधानी ल्हासाजवळ श्री धूम्रवर्ण असे अष्टविनायकांचे वर्णन आढळते.

गाणपत्य संप्रदायाचा आरंभबिंदू व समस्त गणेशक्षेत्रांचा केंद्रबिंदू महाराष्ट्रातील पुण्याजवळचे मयुरेश्वर म्हणजेच श्री क्षेत्र मोरगाव होय. या मोरेश्वराचे दर्शन घेतानाच श्री समर्थ रामदासस्वामींना उत्स्फुर्तपणे श्री गणेशाची आरती 'सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची' ही आरती सुचली.

या संपूर्ण भारतभर पसरलेल्या श्रीक्षेत्रांची यात्रा सोपी नाही. तेव्हा मयुरेश्वराला केंद्र करीत त्याच्या आसपासच्या आठ स्थानांना पुढे अष्टविनायकत्व प्राप्त झाले. भक्ती आणि श्रद्धा तोलता येत नसते. त्यामुळे आपल्या मनातील इच्छा किंवा श्रद्धेला परमेश्वरापर्यंत पोचविण्यासाठी आवाक्यात नसलेल्या मार्गाचाच अवलंब केला पाहिजे असे नाही. तेव्हा पेशव्यांच्या काळात महाराष्ट्रातील अष्टविनायकांना महत्त्व प्राप्त झाले. श्री मोरगाव, श्री रांजणगाव, श्री थेऊर, श्री लेण्याद्री, श्री सिद्धटेक ह्या पंचेश्वरांनी मिळून श्री मोरगाव क्षेत्र निर्मिले. श्री रांजणगावी श्री शंकर, श्री क्षेत्र थेऊरला श्री ब्रह्माजी, लेण्याद्रीस आदिशक्ती पार्वती तथा सिद्धटेकला श्रीहरी स्थापित श्री गणेश आहेत. उर्वरित श्री गणेश बालभक्त बल्लाळ यांनी स्थापन केलेला पालीचा बल्लाळेश्वर, अभिजित राजानिर्मित ओझरचा श्री विघ्नेहर, पेशव्यांचे सरदार रामजी महादेव बिवालकरनिर्मित राजा

रुक्मांद याच्या स्मृतिप्रित्यर्थ महाडचा श्री वरदविनायक या स्थानांच्या मान्यतेमागे यात्रेकरिता सोयीची दृष्टी असावी.

महाराष्ट्रात जसे अष्टविनायक प्रसिद्धीस आले तसे मग थोड्याफार प्रमाणात विदर्भातही अष्टविनायकांची संकल्पना आली. नागपूरचे अभ्यासक प्रा. बाळासाहेब पदवाडांनी 'नागपूर परगण्यातील अष्टविनायक' हे पुस्तक फार पूर्वी लिहिले होते. त्यात त्यांनी विविध संदर्भ शोधून प्रथमत: ह्या अष्ट गणेशस्थानांची ऐतिहासिक, पौराणिक दृष्टीने विषय मांडणी केली होती. आदाश्याचे श्री. द.ग. गोडसे यांनी विदर्भ साहित्य संघाच्या १९९०च्या अकोला येथील परिषदेत अध्यक्षीय भाषणात 'विदर्भातील अष्ट गणेश आवर्त' या विषयावर विचार मांडले. थोर अभ्यासक, संशोधक आणि सव्वाशे पुस्तके लिहिणारे विदर्भातील पहिले साहित्यिक दिवंगत डॉ. भाऊ मांडवकर यांनी आपल्या संशोधनपर स्फुट लेखनातून या विषयाला स्पर्श केला होता. प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृतीचे अभ्यासक श्रीपाद केशव चितळे यांनी 'विदर्भातील अष्टगणेशस्थाने' शीर्षकाखाली पुस्तक लिहून फार मोठी भर घातली आहे.

पूर्व विदर्भाच्या आठ दिशांना असलेल्या या वैदर्भीय अष्टविनायकांना कमीअधिक प्रमाणात सुमारे १५०० वर्षांचा इतिहास आहे. या मूर्ती केवळ प्राचीनतम आहेत, असे नाही तर नाग संस्कृती, बौद्ध व जैन धर्माच्या सांस्कृतिक मंथनातून त्या घडल्या आहेत. विदर्भाला सुमारे १००० वर्षांचा महाश्म संस्कृतीचा इतिहास आहे. अश्म तसेच लोकसंस्कृतीच्या लोकांची नागपुरात वसाहत असतानाच नागपूर परगण्यात नाग

लोकांचे संघराज्य उदयाला आले. पुढे हे नाग बौद्ध व नंतर जैन धर्माचे अनुयायी बनले. त्यामुळे विदर्भातील अष्टविनायकांत एकाच वेळी नाग, बौद्ध व जैन संस्कृतीचे प्रतिबिंब पडले आहे.

ही सर्व गणेशस्थाने पूर्व विदर्भातील यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यांतच समाविष्ट आहेत. महाराष्ट्रातील अष्टविनायकांच्या संदर्भात जसे श्रीमंत पेशव्यांच्या अधिपत्याखालील प्रदेशाचा आणि त्यांच्या सर्व सोयीसुविधा तसेच प्रांतातील भक्तांच्या आवाक्याच्या हिशोबाने विचार झाला असावा, त्याचप्रमाणे येथे भोसल्यांच्या राज्याचा विचार केला गेला असावा. नागपूरला मध्यवर्ती मानून आसपासची आठ महत्त्वपूर्ण अशी गणेशस्थाने योजिली गेली असावी. मात्र ही स्थाने प्राचीन आणि जागृत देवस्थाने असून प्रत्येक मंदिराचा वेगळा इतिहास आहे. त्यामुळे या अष्टविनायकांना नाकारण्याचे काही कारण नाही. बहुतेक गणेशस्थानांचे उल्लेख विविध प्राचीन ग्रंथांमध्ये आलेले आहेत. आज पूर्व विदर्भात ही अष्टगणेशस्थाने दिसतात, उद्या पश्चिम विदर्भातही तशी स्थाने नियोजिली जातील, परवा मराठवाड्यात. कोणती स्थाने यादीत येतात, यापेक्षा भक्तिभाव, श्रद्धा यांना महत्त्व देऊन श्री गणेशाचे पूजन होत राहील व आजच्या युगात आवश्यक असणारे संस्कारी वातावरण त्या निमित्ताने निर्माण होईल, हे खरे गरजेचे!

**- पवन मांडवकर**
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, श्री क्षेत्र चिंतामणी कळंब

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| दोन शब्द | ३ |
| गणपती बाप्पा मोरया | ९ |
| समर्थ रामदास स्वामीरचित श्री गणेशाची आरती | १७ |
| श्री शमी विघ्नेश, आदासा | १८ |
| श्री अष्टादशभुज गणेश, रामटेक | २८ |
| श्री भृशुंड गणेश, मेंढा | ३५ |
| श्री पंचानन, पवनी / श्री सर्वतोभद्र, पवनी | ४२ |
| श्री वरदविनायक, गवराळा, भद्रावती | ४९ |
| श्री चिंतामणी, कळंब | ६४ |
| श्री सिद्धिविनायक, केळझर / श्री एकचक्रा गणेश | ९५ |
| श्री टेकडी गणेश, नागपूर | १०३ |
| अष्टविनायकाची यात्रा कशी करावी? | ११० |
| वैदर्भीय अष्टविनायक नकाशा | ११५ |
| संदर्भ ग्रंथ / नियतालिके / वृत्तपत्रे | ११६ |

# गणपती बाप्पा मोरया!

श्रीगणेशाच्या नामस्मरणाने आपण कोणत्याही चांगल्या कामाची सरुवात करतो. विद्या आणि बुद्धीची देवता म्हणून ओळखला जाणारा गणपती हा चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा अधिपती आहे. चार वेद, सहा शास्त्रे आणि अठरा पुराणे ही गणरायाची रूपे आहेत.

शिवाचे सेवक जे गण, त्यांचा अधिपती तो गणेश. गणांचा ईश 'गणेश' तसा गुणांचा ईश 'गुणेश'. भारतात गणपतीची उपासना प्राचीन काळापासून केली जाते. अरबी समुद्रात मध्यंतरी १३००० वर्षांपूर्वीची श्री गणेशाची मूर्ती आढळली. रामायण, महाभारत काळापासूसन श्री गणेशाचे संदर्भ आढळतात. दुष्टांचा संहार करण्यासाठी गणांचा अधिनायक आणि सेनापती असलेल्या गणपतीने वेगवेगळ्या रूपांत अवतार घेतले. जेव्हा वाइटाचे प्राबल्य वाढते, तेव्हा तेव्हा चांगल्याकरिता परमेश्वर अवतार घेतात असे म्हटले जाते. ॐकार गणपतीचेच रूप आहे.

गुणांचा देव गणपती हा गाणारा, नृत्य करणारा, राजकारणपटू, जगातील पहिला लेखनिक किंवा लघुलेखक, आणि गनिमीकाव्याचा जनकही मानला जातो. व्यासांनी सांगितलेले महाभारत गणेशानेच लिहून काढले. जगातील पहिले स्त्री सैन्य गणपतीने निर्माण केले.

भाद्रपद शुद्ध चतुर्थीस 'महासिद्धी विनायकी' म्हणतात. श्री गणेशाच्या या जन्मदिवसापासून गणपती उत्सव सर्वत्र साजरा होतो. श्रीगणेशाचा आणि शेतीच्या हंगामाचा संबंध प्राचीन काळापासून लावण्यात आला असावा. हे दिवस पेरणी

आटोपल्यानंतरचे दिवस असतात. पीक चांगले यावे, म्हणून विघ्नहर्त्याला साकडे घातले जाते. अगदी पूर्वीपासून श्री गणेशाला धनधान्याच्या सुगीची देवता मानले गेले आहे. त्यामुळे नांगराच्या फाळाचे प्रतीक असलेला सुळा (सोंडेसह), धान्यकोठाराप्रमाणे पोट, पायाखाली दाबून ठेवलेला पिकांचा घात करणारा उंदीर असे तिचे रूप दिसते. पुढे भारतीय समाजास स्थैर्य प्राप्त झाल्याने बुद्धिप्रधानता वाढली. गणेशमस्तकास बुद्धीचे कोठार म्हटले गेले. सोंडेचे वळण ओंकारस्वरूप मानले गेले. तुटलेल्या दाताबद्दलची कहाणी अशी सांगितली जाते की महाभारत लिहिताना जेव्हा गणेशाची लेखणी अचानक मोडली तेव्हा वेदव्यासांची समाधी भंग होऊ नये, म्हणून त्याने आपला सुळा मोडून त्याची लेखणी केली आणि लेखन सुरू ठेवले.

आपण 'गणपती बाप्पा मोरया' म्हणतो. 'मोरया' म्हणजे नमस्कार. 'गणराया तुला नमस्कार' असे म्हणून आपण नतमस्तक होतो. आपल्यातले दोष, दुर्गुण, वाईट ते सर्व निघून जावे या भावनेतून लीन होतो. लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने तर महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात सार्वजनिक गणेश स्थापना आरंभ झाली आणि तेव्हापासून गणेशाचे, अष्टविनायकांचे महत्त्वही वाढत गेले.

श्री गणेशाचे शिर जे हत्तीचे आहे, याबाबत एक कथा सांगितली जाते. पार्वतीने स्नानास जाताना कोणी येऊ नये, म्हणून स्वतःच्या शरीराच्या मळापासून एका बालकाची मूर्ती तयार केली. त्यात प्राण संचार घडविले आणि 'कुणालाही इकडे येऊ देऊ नकोस' म्हणून आज्ञा दिली. साक्षात पार्वती पती शंकर आले आणि आत शिरू लागताच ओळख नसल्याने त्या बालकाने त्यांना अडविले. शंकर क्रोधित झाले आणि त्या बालकाचे शिर

त्यांनी उडविले. पार्वती आल्यावर तिला हे समजताच ती अतिदु:खी झाली. शंकरांनी यावर उपाय योजला. पार्वतीला संतुष्ट करण्यासाठी पार्षदाला जंगलात पाठविले आणि जो पहिला प्राणी दिसेल त्याचे मस्तक आणून ते या बालकास जोडण्यास सांगितले.

पार्षदाला प्रथमत: हत्ती दिसला आणि त्याचे मस्तक त्याने आणले. श्री शंकरांनी ते मस्तक बालकाच्या मानेवर बसविले. हे बालक म्हणजेच श्री गणेश.

श्री गणेशाचे रूप अत्यंत मोहक असते. त्यातून अनेक बोधप्रद गोष्टी प्रतीत होतात. गणपतीचे मस्तक हत्तीसारखे असून त्याचा भालप्रदेश विशाल असल्याने श्री गणेश विशाल बुद्धीचा असल्याचे लक्षात येते. म्हणूनच पृथ्वीप्रदक्षिणेच्या शर्यतीच्या वेळी गणपतीने स्वत:चा बंधू कार्तिकेय याच्यावर स्वत:च्या मातेला प्रदक्षिणा घालून बुद्धीने मात केली व पृथ्वीप्रदक्षिणेचे पुण्य मिळविले. ज्ञानाचे कोठार शोभावे तसे हे विशाल मस्तक.

सोंड हे शक्तीचे प्रतीक आहे. दुष्टांचे निर्दालन आणि सुष्टांचे रक्षण त्यातून प्रतीत होते. सोंडेचे वळण ओंकाररूप मानले जाते.

कान सुपासारखे आहेत. सूप हे फोलपटे, कोंडा फेकून देऊन फक्त स्वच्छ धान्य सुपात ठेवते. धान्य भुशाच्या आवरणात असते, त्याप्रमाणे ब्रह्म हे जीवरूपात मायेशी एकरूप असून मलावरणाचे त्यावर आच्छादन असते. हे आवरण एवढे प्रगाढ असते की त्यातून चैतन्याचा आभास मिळत नाही. अशा अवस्थेतून शूर्पकर्ण गणेशाची उपासना केली असता, ते मायेचे आवरण दूर होते. गणपती आपल्याला जणू हेच सांगत आहे की 'सर्वांचे ऐका पण चांगल्या गोष्टी ठेवा, वाइटाचा त्याग करा.'

कर्ण हे शरीरातील मुख्य ज्ञानेंद्रिय आहेत. म्हणूनच मोठे कान असलेले बाळ बघितले तर 'ते बुद्धिमान होईल', असे भाकित केले जाते. राजाला जनमानसात आपल्याबद्दल काय चर्चा सुरू आहे, हे जाणण्यासाठी सुपाप्रमाणे मोठे कान आणि संकटाची चाहूल हुंगता यावी, म्हणून मोठे नाक म्हणजे सोंड असेही मानले जाते.

धूर्त आणि चतुरतेचे प्रतीक गणपतीचे डोळे बारीक आणि भेदक आहेत. तसेच बारीक निरीक्षण करण्याचे त्याचे कार्य. ज्ञानी व्यक्तींचे निरीक्षणही बारीक असते आणि अनेक छोट्या गोष्टींतून मोठा अर्थ ते काढू शकतात. प्रत्येकाची महानता दिसणे, हा नेत्राचा खरा गुण होय.

गणपतीला दोन सुळे असतात. एक पूर्ण व दुसरा तुटलेला अर्धा. त्याला एका सुळ्यामुळे 'एकदन्त' असेही म्हणतात. 'एक' हा शब्द मायेचा वाचक असून 'दन्त' शब्द सत्ताधारक, मायाचालक परब्रह्माचा वाचक आहे. यावरून गणपती सृष्टीसाठी मायेला प्रेरणा देणारा आणि समस्त सत्तेचा आधारभूत अशा परब्रह्माचे अभिव्यक्त रूप आहे, हे कळते. सरळ मार्गाने जाणाऱ्यांना कुणी काही केले तरी चालेल, असे समजून त्रास देत असेल तर त्यांच्यासाठी हानी न करता केवळ भीती दाखवण्यासाठी हा दात आहे.

गणपतीचे पोट विशाल आहे, म्हणून त्याला लंबोदर म्हणतात. पण हे पोट घागरपोट नाही, तर सागरपोट आहे. सागरात जशा अनेक नद्या आपला प्रवाह मिसळतात, तशा लोकांच्या अनेक गोष्टी, अनेक अपराध हा गणपती पोटात घेतो. कुणी मनातले काही सांगितले तर ते या पोटातच ठेवायचे, तिसऱ्या व्यक्तीकडे जाऊ द्यायचे नाही. निंदा–स्तुती, जय–पराजय,

उच्च–नीच अशा अनेक परिस्थिती या पृथ्वीसारख्या पोटात सामावून घेतल्या जातात, म्हणून हा 'महोदर' किंवा 'लंबोदर'.

पाय मात्र लहान असण्याचे कारण आपण कुठलेही काम करताना उतावीळ होऊ नये. पूर्ण विचार करून पाय उचलावे, ससा कासवाच्या शर्यतीत कासवही जिंकू शकतो, हे त्यातून कळते.

कामाचा उरक असावा म्हणून गणांचा राजा गणपती चार हातांचा. युद्धजन्य अस्त्रशस्त्र व सुबत्तेचा मोदक हे दोन्ही या राजाच्या हातात असतात. चार हातांपैकी गणपतीच्या एका हातात अंकुश, दुसऱ्या हातात पाश, तिसऱ्यात मोदक तर चौथ्या हाताने तो आशीर्वाद देत आहे. अंकुश विश्वाचे नियंत्रण करतो. वासनांवर संयमाची गरज सुचवितो. आसुरी संस्कार मिटविण्यासाठी ज्ञानरूपी परशू ज्याच्याजवळ आहे, तो आध्यात्मिक योद्धाच खरा ज्ञानी ठरतो. गरज पडली तर शिक्षा करण्याचे सामर्थ्य हा परशू दाखवितो. पाश मोह दूर करतो. तो दैहिक बंधनाचे प्रतीक आहे. ज्ञानरूपी परशूने तो ही बंधने कापून टाकतो. स्वत:ला तो दिव्य बंधनांमध्ये बांधून घेतो, म्हणून पाश किंवा दोरी हे प्रतीक दाखवले जाते. परतात्म्याबरोबरचे हे बंधन निस्सीम प्रेमाचे, निरतिशय सुखाचे असते. मोदक म्हणजे संतोष आणि आशीर्वाद, म्हणजे सदैव पाठीशी असण्याची संकल्पना. तसेच या चार हातांपैकी तीन स्वर्ग, मृत्यू, पाताळ यांतील अनुक्रमे देव, मानव, नाग यांचे रक्षण करतात. चौथा हात केवळ भक्तांच्या कल्याणासाठी राखून ठेवलेला असतो. त्याला वरदहस्त म्हणतात.

शंकराचे वाहन नंदी, विष्णूचे गरुड तर गणपतीचे वाहन उंदीर आहे. कोणतीही वस्तू कुरतडणारा उंदीर म्हणजे कोणत्याही गोष्टीचे विश्लेषण–विघटन करण्याची कला. कुठल्याही गोष्टीच्या

मुळाशी जाणे, ज्ञान मिळविणे आणि सन्मार्गाने जीवनाचे सार्थक करणे, ही शिकवण जणू या वाहनाद्वारे मिळते. गर्व नसावा म्हणून हे छोटेसे वाहन मूषक अशीही मान्यता आहे.

एकंदरीत काय, गणांचा राजा तो गणपती. राजा कसा असावा, तर तो सर्वगुणसंपन्न असावा. प्रचंड मस्तक म्हणजे प्रचंड ज्ञानी, प्रचंड पोट म्हणजे सुबत्तेने परिपूर्ण, नेत्र, नासिका, शस्त्रयुक्त हस्त म्हणजे भेदक व तीक्ष्ण नजर, दूरदृष्टी, समयसूचकता, सावधानता, मोठे कर्णपटल इतरत्र काय सुरू आहे, हे जाणून घेण्याची शक्ती आणि मस्तक, सोंड यांतून जाणवणारे ओंकारस्वरूप, पायाखालचा उंदीर म्हणजे थांबवावयाची नासाडी.

श्री गणेशपूजनात पर्यावरण आणि स्वास्थ्याचा विचार करता २१ वनस्पतींचा वापर केला जातो.

सर्वांना भावणारा असा हा गणपती. या संदर्भात खूप कथा आहेत. भरपूर माहिती सर्वत्र आढळते. आहे. श्रद्धा असावी; परंतु ती डोळस श्रद्धा. भारतातील २१ गणेशांचे दर्शनास जाणे खूपच कठीण. आपण भारतातील अष्टविनायकही जर करू शकत नाही, तर महाराष्ट्रातील, विदर्भातील किंवा आपल्या परिसरातीलही करू शकतो. पुष्कळांना कुठे प्रवासाला जाणे शक्य होत नाही, तेव्हा त्यांना आपल्या घरी गणपती आणावा असे वाटते. त्याचे अनेक नियम सांगितले जातात, विधी सांगितले जातात. ते अवश्य पाळा; परंतु जर एखादी चूक झाली किंवा एखादी गोष्ट पाळता आली नाही, तर मनाला लावून घेऊ नका. परमेश्वर आपला पिता. तो चूक झाली म्हणून शिक्षा करणार नाही. दरवर्षी गणेशमूर्ती पूर्वीपेक्षा मोठी आणावी, हा एक गैरसमज आहे. मोठी मूर्ती आणली तर पुण्य अधिक असे समज करून घेऊ नये. उलट मूर्ती लहान असल्यास काळजी चांगली घेता येते.

उजव्या सोंडेचा गणपती कडक असे समजतात. असे काही नसते. आपला हात कोणत्या दिशेने ठेवायचा, हे आपण ठरवतो, तसे गणपतीने सोंड कुणीकडे वळवावी, हा अधिकार त्याला नसावा का? मूर्तीचे निरीक्षण करता असे दिसते की गणेशाच्या डाव्या हातात मोदक, उजवा हात आशीर्वाद देणारा, म्हणून सहसा सोंड डावीकडे असते; पण एखाद्या मूर्तीकाराने उजव्या सोंडेची गणेशमूर्ती तयार केली असेल तर ती कडक आणि डाव्या सोंडेच्या गणपती सौम्य असा विचार मनातून काढून टाका. पुष्कळदा गणेशमूर्तीचे पूजन झाल्यावर त्या मूर्तीला तडा गेल्याचे दिसून येते. असे होणे वाईट समजू नये. आपण सुंदर घर बांधतो, त्या घरालाही वातावरणामुळे तडे जातातच. तीपण वास्तूदेवताच असते ना? तसेच हवामानात होणाऱ्या बदलांमुळे किंवा पूजनात पाण्याचा वापर थोडा अधिक झाल्याने असे तडे मूर्तीलाही जाऊ शकतात. त्यावर विसर्जन हाच सर्वोत्तम उपाय आहे. मात्र सुंदर दिसते म्हणून विसर्जनाची मूर्ती प्लास्टर ऑफ पॅरीस किंवा पाण्यात न विरघळणारी आणू नका. शाडू किंवा चिकणमातीची मूर्ती फार चांगली. पर्यावरणालाही उत्तम.

शास्त्रानुसार घरातील गणेशमूर्ती पाटावर बसवली जाते. पाटाच्या खालच्या पोकळीत गणेशतत्त्वाच्या लहरी एकत्रित होतात तसेच मूर्तीभोवती मखर असल्यास त्यात गणेशमूर्तीतील देवत्व साठवले जाते, असे म्हणतात. मखराकरिता थर्माकोल हा पर्यावरणासाठी घातक घटक आहे. तेव्हा सात्त्विकतेचे प्रतीक असलेल्या केळीच्या खोडाचा वापर करावा.

असे म्हणतात की विनाशकारक, तमप्रधान यमलहरी पृथ्वीवर आषाढ पौर्णिमा ते कार्तिक पौर्णिमा या १२० दिवसांत अधिक येतात. त्या तीव्रतेच्या काळात भाद्रपद शुद्ध चतुर्थी ते

अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशलहरी पृथ्वीवर मोठ्या प्रमाणावर येत असल्याने यमलहरींची तीव्रता कमी होण्यास मदत होते. या दहा दिवसांत गणेशतत्त्व नेहमीच्या तुलनेत कितीतरी पटींनी जास्त कार्यरत असते. या काळातील गणेश उपासनेने अधिक लाभ होतो.

श्री गणेशचतुर्थीला ठरावीक वेळेतच प्रतिष्ठापना केली पाहिजे असा आग्रह काही मंडळींचा असतो. वास्तविक गणेशस्थापना व पूजनासाठी विशिष्ट वेळ किंवा मुहूर्त नसतो, असे धर्मपंडित सांगतात. भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशी श्री गणेशाची स्थापना व पूजन व्हावे, इतकेच काय ते! घरात गर्भवती स्त्री असल्यास गणेश मूर्तीचे विसर्जन करू नये किंवा घरातील एखादी व्यक्ती मृत्यू पावली असल्यास एक वर्ष कोणतेही धार्मिक कार्ये करू नये, याला शास्त्रीय आधार नाही.

अनेक समजुती, गैरसमजुती आपल्या देशात आहेत. निस्वार्थ मनाने केलेली भक्ती परमेश्वरापर्यंत पोचते, तेव्हा आपल्याकडून उत्तम कार्य कसे पार पडेल, याचा प्रयत्न करावा. ज्योतिषशास्त्र, धर्मशास्त्र, पुराणग्रंथ या सर्वांसोबतच वैज्ञानिक दृष्टिकोनही बाळगणे गरजेचे आहे. आपल्या दुष्कृत्यांवर पांघरूण घालण्यासाठी परमेश्वराकडे जाऊ नये. श्रद्धेने परमेश्वराला शरण जावे, कर्ताकरविता तोच आहे, ही भावना मनी असावी. मात्र कर्तव्य पार पाडण्यापासून, कष्टांपासून दूर पळू नये, हीच श्री गणेशाची शिकवण असावी.

गणपती बाप्पा मोरया!

# श्री समर्थ रामदासस्वामी रचित

# श्रीगणेशाची आरती

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची । कंठी शोभे माळ मुक्ताफळांची ।।१।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।।
दर्शनमात्रे मन:कामनापूर्ती ।।धृ।।

रत्नखचित फरा तुज गौरी कुमरा । चंदनाची उटी कुंकुम केशरा ।
हिरेजडित मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नुपूरें चरणी घागरिया ।। जय देव ।।२।।

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकष्टी पावावे निर्वाणी रक्षावें सुरवर वंदना ।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।।३।।

# श्री शमी विघ्नेश, आदासा

विदर्भाच्या या प्रदेशावर इ.स.पू. ३०० च्या दरम्यान मौर्यांचे राज्य होते. त्यानंतर शुंग, कण्व, सातवाहन, क्षत्रप, मुंड, वाकाटक, कलचुरी, विष्णुकुंडीन, चालुक्य, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालुक्य, परमार, यादव, बहामनी, गोंड, भोसले अशा अनेकांनी राज्य केले. या सर्वांच्या काळात गणेशाची आराधना केली जायची. गणेशपूजनाची प्रथा भारतात अत्यंत प्राचीन अशी आहे. यक्षपूजा करण्याचा प्रघातही तितकाच प्राचीन आहे. गावाच्या सीमेवर हनुमान आणि गणेश या दोन्ही देवतांच्या मंदिराची किंवा मूर्तीची स्थापना पुरातन काळापासून केली जाते. गावाचे रक्षण करणारा गजमुखी यक्षराज गणपती आणि कपिमुखी यक्षराज हनुमान अशा दोहोंचीही मंदिरे गावोगावी वेशीवर दिसतात.

नागपूर जिल्ह्यात शहराच्या वायव्येस सुमारे ३५ कि.मी. अंतरावर सावनेर तालुक्यातील अदासा (किंवा आदासा) हे मध्य भारतातील सर्वाधिक प्राचीन असे श्री गणेश क्षेत्र म्हणून ओळखले जाते. कळमेश्वरपासून १४ कि.मी. पुढे व सावनेरपूर्वी ६ कि.मी. वर हे गाव आहे. वैदर्भीय अष्टविनायकांमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण अशा ह्या गणेशस्थानी असलेली ही मूर्ती वाकाटकांच्या काळातील सुमारे १५०० वर्षांपूर्वीची असावी. काही अभ्यासक या गणेशस्थानाला ४००० वर्षांचा इतिहास असल्याचे सांगतात.

आदासा हे स्थान गणेशकोशात अंतर्भूत आहे. वायूपुराणात अध्याय १०० मधील श्लोक १२२ ते १३० मध्ये याचे वर्णन आढळते. जैमिनीय अश्वमेध पोथीत या क्षेत्राला 'अदोष क्षेत्र' संबोधण्यात आले आहे.

## या क्षेत्रासंबंधी काही कथा व इतिहास

असे सांगतात की या बलिराजाच्या पारिपत्याखाली विष्णूचा पाचवा अवतार समजला जाणाऱ्या बटू वामनाने ह्या गणेशाची स्थापना केली. गणेशपुराणाच्या क्रीडाखंडात नमूद केल्याप्रमाणे भीम नावाचा एक पारधी या क्षेत्रात राहात होता. हिंसा आणि वाईटकृत्य करून कुटुंबाचे पालनपोषण करणाऱ्या भीमाने एक दिवस हरणाची शिकार केली. घरी परतताना पिंगाक्ष नावाचा अतिमानव त्याच्यामागे लागला. भीम शमीवृक्षावर चढला. त्याच्यामागे पिंगाक्षही त्या वृक्षावर चढला. वृक्षाच्या फांद्या कडाकड तुटायला लागल्या. दोघांच्या मारामारीत शमीची पाने खाली असलेल्या गणेशावर पडू लागली. या वृक्षाखालीच बटू वामनाने गणेशाची स्थापना केली होती. साक्षात परमेश्वरावर शमीच्या पानांचा अभिषेक झाल्याने नकळत गणेश देवता प्रसन्न झाली आणि त्या दोघांचीही मने बदलली आणि त्यांच्यातील दुष्ट प्रवृत्ती निघून गेली.

दुसऱ्या एका मान्यतेनुसार या क्षेत्री गणेशाची स्थापना मुद्‌गल ऋषींनी केली.

गणेशकोशातील एका कथेनुसार प्राचीन काळात पाप आणि दुष्ट प्रवृत्तींचे स्तोम माजल्याने त्याचे निवारण करण्यासाठी शिवपार्वतीरूपी शमी वृक्षातून हा गणेश प्रगट झाला आणि म्हणून त्याला 'शमी विघ्नेश' असे नाव पडले.

या गणेशाबद्दलची आणखी एक दंतकथा अशी की सर्वप्रथम पूजेचा मान असणाऱ्या गणेशाची बळीराजाकडून अवहेलना झाली. तेव्हा भगवान वामनांनी बळीला त्याच्या

शंभराव्या अश्वमेध यज्ञात जिंकण्यासाठी सर्वप्रथम अदासा या ठिकाणी श्रीविग्रह केला. म्हणजेच गणेशाची स्थापना करून बळीराजाला युद्धात पराजित केले व सर्वांचे विघ्न दूर केले. हा गणपती विघ्नांचा नाश करणारा म्हणून 'श्री विघ्नेश' या नावानेही ओळखला जातो.

## मूर्ती, मंदिर व परिसर

शमी विघ्नेशाची ही मूर्ती कदाचित भारतातील सर्वात उंच असावी. ही चतुर्भूज मूर्ती साडे पंधरा फूट उंच व सव्वा सात फूट रूंद आहे. त्यामुळे ती पाठशिळेपासून उठावात कोरली असावी. उजव्या सोंडेची असलेली आणि वाहन सिंह असणारी ही गणेशमूर्ती भव्य अशी आहे. काही अभ्यासकांच्या मते ती सुखासनातही असू शकते. ही मूर्ती त्रिभंगी असून गंडस्थळ तिरपे आहे. त्यामुळे ही मूर्ती नृत्यमुद्रेत असावी असे वाटते. मूर्तीच्या मस्तकावर मुकुट कोरलेला नाही. गंडस्थळ स्पष्ट दिसते. त्यावरून तिचे प्राचीनत्व सिद्ध होते. अनेक भक्त या मूर्तीला स्वयंभू मानतात.

या सुबक मूर्तीचे भाव सौम्य–शांत असे असून स्वरूप प्रदक्षिणा क्रमाने पाश, अंकुश, मोदक व आशीर्वाद मुद्रा असे आहे. कपाळ म्हणजेच भालप्रदेश अत्यंत सुंदर असून त्यावर चंद्रकोर आहे. शूर्पकर्ण, गंडस्थळ सर्वच प्रमाणबद्ध असलेल्या या मूर्तीचे अलंकार मात्र स्पष्ट दिसत नाहीत.

शेंदूरलेपनाने मूर्तीच्या दगडाविषयी निश्चित माहिती नसली तरी कै. अमरेंद्र गाडगीळ यांच्या श्रीगणेशकोशात नमूद केल्याप्रमाणे ती काश्मीरी संगमरवराची असावी परंतु प्राचीन

भारतीय इतिहास व संस्कृतीचे अभ्यासक श्री.के. चितळे यांनी 'विदर्भातील अष्टगणेशस्थाने' या पुस्तकात त्याविषयी असहमती दर्शवली आहे. त्यांच्या मते गारेच्या किंवा संगमरवराच्या मूर्ती अर्वाचीन असतात. मूर्तीच्या उजव्या पायाजवळील व पाठीमागे जे प्रस्तरावशेष दिसतात, त्यानुसार ही मूर्ती लालसर वालुकामय पाषाणापासून तयार झाली असावी.

विदर्भातील पंढरपूर म्हणून ओळखले जाणारे श्री अदासा हे क्षेत्र छोटेसे जरी असले तरी सर्वदूर प्रसिद्ध असे आहे. महाराष्ट्रातील २१ गणेशस्थानांमध्ये त्याची गणना होते. संत रामदासांनी आपल्या विदर्भ प्रवासात या स्थानाला भेट दिली होती. नागपूरचे राजे रघुजी भोसले दर संकष्टीला या गणेशाच्या दर्शनाला येत.

नागपूरहून काटोल रोडने निघाल्यावर कळमेश्वर, धापेवाडा मार्गे आदासा लागते. हा परिसर मोहरीच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. हिवाळ्यात मोहरीची पिवळी फुले सर्वत्र दिसतात. या गावच्या वेशीवर मातीच्या जाड भिंतींचा, दिंडी दरवाजासह एक पुरातन भग्न वाडा आहे. हा श्री. गोडसे पाटलांचा असल्याचे बोलले जाते. जुन्या काळात येथे बऱ्यापैकी राबता असावा असे अवशेषांवरून जाणवते.

आदासा हे गाव लहानसे आहे. मध्यभागी टेकडीवर मंदिर आहे. १० हेक्टर परिसराचा विस्तार आहे. वर जायला पश्चिमेकडून पायऱ्या आहे. आता वरपर्यंत रस्ता झाल्याने मोटार नेता येते. ग्रामपंचायतीचा कर आणि मोटार पार्कींगचे शुल्क भरावे लागते. काही मोजकी फुले, प्रसादाची दुकाने आहेत. पाण्याची सोय झालेली आहे. काही मोठी झाडे असून निसर्गाच्या सान्निध्यात सहभोजनाचा आनंद लुटता येतो. वैदर्भीय उन्हाळा मात्र कडक

असल्याने तेव्हा दर्शनास जावयाचे असेल तर फार काळजी घ्यावी लागते. उन्हाळ्यात सकाळीच दर्शन योग्य ठरते.

पायऱ्या चढून परिसरात जाताना अंबारीसदृश घुमटी आहे. पदमार्गाच्या दोन्ही बाजूंना समांतर चावड्या आहेत. ज्या १०–१२ घुमटी आहेत त्यात गिरी गोसावी–पुरी यांच्या काही नामसमाध्या आहेत. काही चौथऱ्यांवर पावले आहेत, तर काही पावलांवर अर्धवर्तुळाकार घुमट्या आहेत. या शिवभक्त नाथसंप्रदायाच्या गोसाव्यांच्या आहेत. त्यात बहिरमबुवा, शक्ती, त्र्यंबकेश्वर, भुयारबाबा यांच्याही समाध्या आहेत.

पुढे गेल्यावर दोन घुमट्यांमध्ये एकात भैरवनाथ तर दुसऱ्यात शक्ती प्रतिमा आहे. अष्टभुज भैरवाची मूर्ती सव्वा आठ फूट उंच व साडे चार फूट रुंद आहे. याही मूर्तीचा मूळ चेहरा शेंदराने माखल्याने नीट कळत नाही. रेखीवपणा लक्षात येत नाही. नेत्र बटबटीत असून केशसंभार आहे. कानात सर्पाकार कुंडल आहे. नागांचे दागदागिने धारण केलेले आहेत. कमरेवर घंटायुक्त मेखला आहे. उभे राहण्याची ढब मजबूत पुरुषी अशी असून चेहऱ्यावर रौद्र भाव आहेत. प्रदक्षिणा क्रमाने हाती वलय, अंकुश, नागपाश, खड्ग व पुढील चार हातात डमरू, त्रिशूळ, नरमुंड व सीताफळाप्रमाणे फल धारण करून आहे. या मूर्तीच्या दोन्ही बाजूंना भैरवाच्या शक्ती दिदिनिका व गौरीका आहेत. या मूर्ती १३ व्या शतकातील असाव्यात. काही अभ्यासकांनी या मूर्ती राष्ट्रकुटकालीन १०व्या शतकातील असाव्यात, असे मत मांडले आहे. या प्रतिमांच्या मागे एक भव्य दगडी प्रतिमा व काही प्रतिमांचे लालसर पाषाणाचे भग्न अवशेष अस्ताव्यस्त विखुरले असून त्यावरून तीन तुकडे एकत्र केल्यास मूर्तीच्या उग्रतेची व भव्यतेची कल्पना करता येते. ती १० ते १२ फुटांची असावी.

पिळदार शरीर आकर्षक आहे. या मूर्तीच्या ओठांची ठेवण शिवमूर्तीप्रमाणे आहे. एका हातात असलेले खड्ग जणू घाव घालण्याकरिता तयार असून डमरू असलेला हात खंडित झाला आहे, तरी रेखीव वाटतो. पायाशी मुंडके नसलेला कुत्रा आहे. कुत्र्यावरून ही भैरवाची मूर्ती असल्याचे सिद्ध होते.

भैरवाच्या समोरच्या भव्य घुमटीत आक्रमक व भव्य असा हनुमान असून हनुमंतराय शनी व त्याची शक्ती पनवती हिला जमिनीवर चेचताना दर्शवले आहे. काहींच्या मते हनुमंत जंबुमेळ्यास लोळवीत आहे.

पुढे अर्धा फर्लांग उत्तरेस निद्रिस्त हनुमानाची मूर्ती आहे. राम–रावण युद्धात लक्ष्मण बेशुद्ध झाल्यावर हिमालयातून संजीवनी वनस्पती आणण्यास हनुमानजी गेले. जाताना क्षणभर ते येथे विसावले अशी श्रद्धा आहे.

प्रवेशद्वारातून आत गेल्यावर एक मोकळी जागा व्हरांड्यासारखी आहे. तिथे आरामात बसता येते. जवळच अभिषेक स्थान आहे. मंदिरात दर्शनासाठी काही पायऱ्या खाली उतरावे लागते. मूर्ती फार विशाल असल्याने मंदिराचे गर्भगृह लहान वाटते. हे गर्भगृह यादवकालीन असावे. फार कमी भक्त एका वेळी आत जाऊ शकतात. यादवांकडे हेमाद्रीपंडित पंतप्रधान होते. हे मंदिर हेमाडपंथी स्थापत्याचा नमुना आहे.

प्रदक्षिणा थोडी मोठी आहे आणि प्रदक्षिणा मारण्यासाठी पायऱ्यांवरून वरखाली करावे लागते. कारण मूर्ती प्रचंड आणि पहाडावरील आहे. गर्भगृह खूप उंच आहे. त्यामुळे डाव्या बाजूने १०–१२ पायऱ्या चढून आपण मंदिरामागील गच्चीवर पोचतो. तिथे भरपूर मोकळी जागा आहे. वरून दूरदूरपर्यंतचा परिसर दिसतो, तो अत्यंत रमणीय असा आहे. पायथ्याशी दिसणारी

कौलारू घरे, डांबरी सडक, हिरवीगार झाडे पाहण्यासारखी असतात. सायंकाळी तर दूरवरचे दिवे पाहण्यासारखे असतात. वाराही खूप वाहतो. परत प्रदक्षिणा पूर्ण करताना उजवीकडून खाली उतरावे लागते. म्हणजे पूर्वी हे मंदिर भव्यच असावे. त्यावर शिल्प, नक्षीकामही असावे; परंतु आज ते शिल्लक नाही. पुजाऱ्याला प्रतिमेसमोर एक मोठा लाकडी तक्त असून त्यावरूनच षोडशोपचार करावे लागतात. पूर्वी त्याचे सभामंडप मोठे असावे. काळाच्या ओघात ते टिकले नसावे. आज घुमटी १२ फूट बाय १० फूट व अंतराळ १० फूट बाय ५ फुटाचे आहे.

हे मंदिर हेमाडपंथी आहे. भिंतींवर किंवा स्थापत्यात फारशी शिल्पे नाहीत. काटकोनी दगडी चिरे कर्णरेखांकित असून बाहेरील भिंती भोसलेकालीन आहेत. त्यानंतरही वेळोवेळी जीर्णोद्धार व दुरुस्ती होत गेल्याचे निदर्शनास येते. प्रवेशद्वार सुमारे दीडशे वर्षांपूर्वीचे असावे.

सुमारे १२०० वर्षांपूर्वीचे स्थापत्य म्हणजे येथील शिवाचे मंदिर. गिरी गोसाव्यांच्या समाधीस्थळांच्या पूर्वेस हे मंदिर आहे. हेमाडपंथी वाटत असले तरी ते त्यापूर्वीचे आहे. देवालय प्रशस्त असून तीन दिशांना तीन स्तंभयुक्त ओवऱ्या व तीन प्रवेशद्वारे आहेत. मंडपात नंदीशिल्प आहे. मध्यभागी वर्तुळाकार रंगशिळा आहे. आत गर्भगृहात शिवलिंग आहे.

मंदिराच्या पश्चिमेस मागील बाजूस अरण्यात एक पाऊलवाट जाते. त्या वाटेने गेल्यास डोंगराच्या उतारावर ८–१० माणसे मावतील अशी एक नैसर्गिक गुंफा आहे. त्याच्या आत आणखी एक गुंफा आहे. मात्र ती अत्यंत धोकादायक आहे. पूर्वी येथे धामण, चिता असे प्राणी दिसल्याचे अनेकजण सांगतात.

गावाच्या पायथ्यास भोसल्यांच्या काळातील एक मोठी विहीर असून त्यात ४७ पायऱ्या आहेत. गणेशाच्या अभिषेकाकरिता ही जलयोजना केली होती.

## इतर माहिती

या भव्य मूर्तीची पूजा म्हणजे भक्ताची परीक्षाच असते. हा शमीविघ्नेश नवसाला पावतो अशी मान्यता आहे. अविवाहितांनी या गणेशाला विवाहाबाबत नवस बोलला तर तो पावतो, असे म्हणतात.

हे क्षेत्र गुप्त—वाकाटकांच्या काळापासून जागृत देवस्थान समजले जाते. आज या मंदिराचे गोंडकालीन मूळ स्वरूप गर्भगृह, अंतराळ व प्रवेशमार्ग एवढेच दिसते. बाकी जीर्णोद्धाराने बऱ्याच गोष्टी बदलल्या असाव्या.

या प्रदेशात प्राचीन काळी शमीवृक्ष मोठ्या प्रमाणावर होते, त्यामुळे याला शमीमूलपूर असेही म्हटले जायचे. अदोष क्षेत्रामुळे याचे अदोष—अदोषा—आदाषा— आधाशा—आदासा असे अपभ्रंशित रूप झाले आहे.

चौथ्या शतकात वाकाटक दक्षिणमध्य भारताचे सम्राट होते. सहाव्या—सातव्या शतकादरम्यान हे क्षेत्र घरघोर अरण्यात लुप्त झाले असावे. त्यानंतर पाच—सहाशे वर्षांचा विदर्भाचा इतिहास फारसा आढळत नाही. इस्लामच्या आक्रमणात अनेक शिल्पकला, वास्तू नष्ट झाल्या. मात्र घनघोर अरण्यात लुप्त झालेल्या या देवालयाचे निर्जन, निर्मनुष्य परिसरामुळेच रक्षण झाले. देवगिरीचे यादव राजे १२—१३ व्या शतकात आले आणि हेमाडपंथी मंदिरांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती झाली. त्यावेळी

आणि नंतर भोसल्यांच्या काळात या मंदिरावर विशेष लक्ष दिले गेले. भोसल्यांच्या काही पत्रांवरून दुसरे रघुजी भोसले नियमित येथे येत असत. त्यांचा मृत्यू १८२६ मध्ये झाला. मात्र ते हयात असेपर्यंत संकष्टी, अंगारकी अशा सर्वच गणेश तिथ्यांना ते लवाजम्यासह येत आणि त्याकरिता जय्यत तयारी केली जायची. गावजेवणे दिली जायची. भोसल्यांच्या २६ जाने. १८८८ च्या पत्रावरून आदाश्याच्या गणपतीची खोळ याच दरम्यान गळून पडल्याचा उल्लेख आढळतो.

## आजूबाजूची पाहण्यासारखी ठिकाणे

नागपूरहून निघाल्यावर धापेवाडा हे आदाश्यापूर्वी अडीच कि.मी. अंतरावर लागणारे गाव विठोबाच्या मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. विदर्भाचे पंढरपूर समजले जाणारे चंद्रभागेच्या तीरावरचे हे मंदिर राजे बाजीराव भोसल्यांचे दिवाण श्री. उमाजी आबा यांनी बांधले होते. धापेवाड्यापूर्वी अडीच कि.मी. वर एक देवीचेही मंदिर आहे.

पुढे सावनेरला गेल्यास श्री वसिष्ठ (कश्यप) आश्रमात काही प्राचीन प्रतिमा आहेत. प्रसिद्ध नाटककार राम गणेश गडकरी यांचे जुने घरही आहे.

आदासा ते रामटेक मार्गावर थोडे आतमध्ये पारशिवनी हे तालुक्याचे गाव आहे. तेथे काळ्या पाषाणाची महालक्ष्मीची कोरीव अशी सुंदर मूर्ती उत्खननात सापडली होती. ती एका घुमटीत स्थापित केली आहे. पुढे १५ कि.मी. वर कुवारा भीमसेन हे देवस्थान असून त्याच्या समोर पेंच नदीचे विस्तीर्ण जलाशय

आहे. पाण्यात एक महाल आहे. तो प्राचीन महाल पाहण्यास नावेने जातात. भिवगड नावाचा किल्लाही जवळच आहे.

असे हे आदासा क्षेत्र म्हणजेच अदोष क्षेत्र. नागपूरवरून या यात्रेस निघणाऱ्या भाविकभक्तांनी वैदर्भीय अष्टविनायकांपैकी भव्य मूर्ती असलेल्या निसर्गरम्य वातावरणातील श्री शमीविघ्नेशाच्या दर्शनाने सुरुवात करण्यास काही हरकत नसावी.

# श्री अष्टादशभुज गणेश, रामटेक

प्रभू श्रीरामाच्या पावलांनी पावन झालेल्या रामटेकजवळच्या शैवल्य पर्वतावर या गणेशाचे स्थान आहे. हा शैवल्य पर्वत म्हणजे शम्बूक ऋषींचे आश्रयस्थान. या पर्वतावर विद्याधराची संस्कृती होती. अठरा विश्वाच्या विज्ञानाचे ज्ञान असलेल्या या विद्याधराची दृष्टीच अष्टादशभुजा म्हणजे अठरा भुजा असलेल्या या स्फटिकाच्या गणपतीत आढळते. मोरपंखाच्या लेखणीसह अभय हस्त व मोदक हस्त वगळता मूर्तीच्या प्रत्येक हातात अंकुश, पाश, खटवांग, त्रिशूळ, परशू अशी शस्त्रे आहेत. या देवळाचा घुमट भोसलेकालीन असला तरी मूर्ती ५०० वर्षांपूर्वीची आहे. विशेष म्हणजे गणेशाची मूर्ती प्रामुख्याने चार हातांचीच असते; पण ही मूर्ती दुर्गेप्रमाणे अठरा हातांची आहे. या मंदिरातच मध्यभागी 'महागणपती'ही विराजमान आहेत.

आदाश्यापासून पूर्वेकडे रामटेकचा अष्टादशभुजा गणेश आहे. आदासा रामटेकचे अंतर ६० कि.मी. असून सावनेर, खापा, मनसर अशा मार्गे जाता येते. नागपूर–रामटेक सरळ अंतर ५० कि.मी. आहे.

## या क्षेत्रासंबंधी काही कथा व इतिहास

पूर्व विदर्भात येणारी मंडळी आवर्जून रामटेकला भेट देतात. २००० ते २५०० वर्षांची प्राचीन संस्कृती असणाऱ्या रामटेकला जसे श्रीरामचंद्रांचे मंदिर प्रसिद्ध आहे, तसेच विदर्भाला सुवर्णयुगात नेणाऱ्या वाकाटक राजांच्या कर्तृत्वाचे प्रतीक म्हणूनही प्रसिद्ध आहे. चौथ्या–पाचव्या शतकात उत्तर भारतातील सुवर्ण

राज्यकर्ते गुप्त यांचेच समकालीन वाकाटक होते. असे म्हणतात की त्यांच्यात वैवाहिक संबंध होते. चंद्रगुप्त द्वितीयची कन्या प्रभावती गुप्त वाकाटक राजे रुद्रसेन यांची पट्टराणी होती.

रामटेकला मोठ्या प्रमाणावर मंदिरे आहेत. श्रीरामाचे मंदिर, लक्ष्मणाचे गडावरील मंदिर, त्यातील ४५ ओळींचा यादवकालीन शिलालेख, वाकाटककालीन केवळ नृसिंह मंदिर, या मंदिरातील पेटिकाशीर्षक लिपीतील १५०० वर्षांपूर्वीचा शिलालेख, रुद्र नृसिंह मंदिर, त्रिविक्रम, लोपामुद्राची बावडी, सीता न्हाणी, कर्पूर बावडी, गोकुळ दरवाजा, वराह प्रतिमा, अगस्ती मुनींचा मठ, गावाच्या पायथ्याशी असलेले शंबुकेश्वर, महाकवी कालिदास स्मारक, जैन मंदिर, मेघदूत भवनम्, प्रवेशद्वारावरील शारंगधराचा शिलालेख, नंदीवर्धनचा भुईकोट, हेमाडपंथी शिवमंदिर, खिंडसी तलाव, अंबाळा तलाव, श्रावणबाळाची कावड व दशरथ शरस्थान ही सर्व ठिकाणे पाहण्यासारखी आहेत. शिवाय सिद्ध पुरुषांचे मठ, कबीर ओटा, गुरू नानकदेव यांच्या स्पर्शाने पावन झालेली भूमी, अनेक स्मारके, पादुका, शिल्पपट्ट, दगडी प्रतिमा अशा विविध बाबींसाठी रामटेक प्रसिद्ध आहे. या रामटेकमध्ये अनेक पाहण्यासारखी स्थाने असल्याने अष्टादशभुजा गणपतीचे स्थान काहीसे फिके पडले, असे वाटते.

असे म्हणतात की रामटेकची पायी वारी रामनवमीला केल्यानंतर या गणेशाच्या दर्शनाने ती यात्रा सुफल व संपूर्ण होते.

'सिंदुरगिरी महात्म्य' पोथीमध्ये प्राचीन रामटेकचे सविस्तर वर्णन आहे. येथे केळीच्या खूप बागा होत्या, असा उल्लेख 'कदलीवाटप ग्रामे' म्हणून केला आहे. या गावाची प्राचीनता रामायणकाळापर्यंत मागे नेता येते.

श्रीराम वनवासात असताना या ठिकाणी काही काळ वास्तव्यास होते. त्यामुळे या ठिकाणाला 'रामटेक' असे नाव पडले. नागपूरपासून ईशान्येकडे ५० कि.मी. अंतरावर असलेल्या या शहराची प्रसिद्धी सुमारे ६०० वर्षांपूर्वीच्या श्रीराममंदिराने अधिक झाली आहे. हे मंदिर एका उंच डोंगरावर आहे. तिथून सर्व आजूबाजूचा परिसर दूरदूरपर्यंत न्याहाळता येतो. या मंदिर परिसरात एक विशाल नंदी आहे. श्रीगणेशाचेही एक पुरातन मंदिर येथे आहे. वानरांचा मुक्त संचार या मंदिर परिसरात आहे. नागपूरकर भोसल्यांचा शस्त्रसाठाही या मंदिरात आहे.

साधारणत: इ.स. २५० मध्ये हा परिसर मौर्य शासकांच्या अधिपत्याखाली होता. सातवाहनांच्या काळात प्रवरपूर म्हणजे सध्याचे मनसर हे एक महत्त्वाचे ठिकाण होते. ते येथून अगदी जवळ आहे. इ.स. ३५० मध्ये त्यांचा पाडाव करून वाकाटकांनी सत्ता काबीज केली. त्याच काळात कालिदास झालेत असा समज आहे. संस्कृत काव्यातील एक अभिजात कलाकृती म्हणजे 'शाकुंतल'. कविकुलगुरू कालिदासाने हे काव्य याच रामटेक परिसरात लिहिले आहे.

या परिसरात बौद्ध संस्कृतीचे अवशेषही आढळले आहेत. मनसरला महाविहार होता, असे दिसून पडते. आयुर्वेदाचार्य नागार्जुन यांची ही कर्मभूमी असल्याचे मानले जाते.

रामटेक म्हणजे रामाचा डोंगर. पूर्वी या डोंगरास 'सिंदूरगिरी' किंवा शेंदराचा डोंगर व 'तपोगिरी' म्हणजे तपस्या करण्याचा डोंगर असे नाव असावे. या संदर्भातील चौदाव्या शतकातील शिलालेख लक्ष्मण मंदिराजवळ आहे. येथे १०० मीटर उंचीवरच्या टेकडीवर ही मंदिरे आहेत. टेकडीची दक्षिण व पश्चिम बाजू नैसर्गिकरीत्या संरक्षित आहे. उत्तरेकडे दुहेरी भिंतीची तटबंदी

असून बाहेरील भिंत गवळी राजांनी बांधली आहे. इतर काम नंतर होत गेले आहे. राममंदिर हे पश्चिमेकडच्या सर्वात उंच भागावर असून अंबाला तलावाच्या पश्चिम टोकाकडून टेकडीवर चढण्यास पायऱ्या आहेत. वर दगडी भिंत असलेले जुने तळे व जवळच नरसिंहाची मोठी मूर्ती असलेले देऊळ आहे.

आख्यायिकेप्रमाणे हिरण्यकश्यपूचा नाश केल्यावर नृसिंहाने (नरसिंह) येथे आपली गदा फेकली व त्यायोगे हे तळे देवळाजवळ निर्माण केले.

एका कथेनुसार शम्बुकाला श्रीरामाने ठार केले मात्र प्रत्यक्ष श्रीरामाच्या हातून मरण प्राप्त झाल्याने शम्बुकाला आनंद झाला व त्याने रामाकडून रामटेकला कायमचे वास्तव्य करण्याचा वर मागून घेतला. त्यास रामाने अनुमती दिली व शम्बुकाचीही येथे पूजा होईल, असे सांगितले. त्याप्रमाणे धुमेश्वर महादेवाचे मंदिर निर्माण केले गेले.

## मूर्ती, मंदिर आणि परिसर

रामटेक गावात शिरल्यानंतर श्री नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यापासून आत एक निमुळती गल्ली आहे. टेकडीच्या पायथ्याशी तेलीपुरा आहे. तिथे एक चौकोनी घुमटीवजा जागा असून तेथेच ही अष्टादशभुज गणेशाची प्रतिमा आहे.

या मंदिराचे तीन भाग आहेत. आत शिरल्यावर सुमारे १५ फुटांचा व्हरांडा, २५ बाय ३० फुटाचे सभागृह आणि गर्भगृह. सभागृहात लघुशिल्पांकित स्तंभ आहेत. ते भोसल्यांनी निर्माण केले असावेत. दोनअडीचशे वर्षांपूर्वी या मंदिराचा जीर्णोद्धार झाला असावा.

या मंदिरातील तीन गर्भगृहात तीन गणपतीच्या प्रतिमा आहेत. त्या वेगवेगळ्या घुमट्यांत असल्या तरी प्रदक्षिणा पथ एकच आहे. मध्यघुमटीत चतुर्भुज महागणेश आहे. प्रतिमा सुंदर असली तरी प्राचीन नसावी. मूर्तीच्या उजव्या हातास असलेल्या घुमटीत श्री रिद्धीसिद्धी गणेश असून ही प्रतिमाही चतुर्भुज आहे. गणेशाच्या शक्ती रिद्धीसिद्धी उभय बाजूंना आहेत.

या मंदिरात महालक्ष्मीचीही मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात आली असून ती अलीकडच्या काळातील आहे.

अष्टादशभुज गणेशाची प्रतिमा मात्र मुख्य मध्य मूर्तीच्या डाव्या हाताच्या घुमटीत आहे. दोन्ही बाजूंना ९ हात आहेत. उंची सुमारे साडे चार ते पावणे पाच फूट आहे. पाठशिळा सुटी आहे. ही स्फटिकाची बहुधा रक्ताश्मशिळेची मूर्ती मुकुट, गंडस्थळ, शूर्पकर्ण, लघुनेत्र, भालप्रदेश व सोंड वाम–दक्षिण अशा वेटोळ्यात आहे. झोकदार उर्ध्वअधर अशी सोंड अतिशय सुंदर असून ती मोदक ग्रहण करताना दिसते. मूर्तीचा उजवा पाय दुमडला आहे. डावा पाय पद्मासनात असावा.

इतर गणेशमूर्तींप्रमाणे ही मूर्ती शेंदूरलेपनाने झाकलेली नसल्याने बहुतेक अवयव स्पष्ट दिसतात व मूर्ती तेजस्वी वाटते. डोक्यावर पाच फण्यांचा नाग असून गळ्यातही नाग व कमरेला नागपट्टा आहे.

अठरासिद्धींमुळे अष्टादशभुज गणपतीस शास्त्रपुराणात 'विघ्नेश्वर' म्हणून पूजले जाते. मंदिर भोसलेकालीन असले तरी ही मूर्ती यादवोत्तर काळातील चौदाव्या शतकातील असावी.

श्री. चांद्रायण कुटुंबाकडे १९६५ पर्यंत या देवळाची वहिवाट होती. ही मंडळी स्थलांतरित झाल्याने येथील युवकांनी १९६८–६९ च्या दरम्यान श्री गणेश उत्सव सुरू केला. मंदिरास

आधारासाठी काही स्तंभ बांधले. मंदिराची रंगरंगोटी केली. या कामी रामटेकच्या श्री अगस्त्य आश्रमाचे प्रमुख श्री गोपालदास महाराज यांनी पुढाकार घेतला. १९८० पासून त्यांच्याच पुढाकाराने सुरू झालेल्या आणि वैकुंठ चतुर्दशीस निघणाऱ्या अतिभव्य शोभायात्रेची सुरुवात याच मंदिरातून होते.

## आजूबाजूची पाहण्यासारखी ठिकाणे

रामटेक आणि आजूबाजूचा प्रदेश पाहण्यासारखा आहे. रामटेकमधील वर उल्लेखित ठिकाणे पाहण्यात बराच वेळ निघून जातो. गडावरचे श्री कालिदास स्मारक, नृसिंह मंदिर, वराह मंदिर, श्री राम—लक्ष्मण मंदिर, त्रिविक्रम मंदिर पाहण्यासारखे आहे. या टेकडीच्या पायथ्याशी असलेला अंबाळा तलाव, त्याच्या पूर्वेस ३ कि.मी.वरचा श्री रामसागर म्हणजेच खिंडसी तलाव जरूर पाहावा. तिथे बोटिंगची सोय आहे. आदाश्यावरून रामटेकला येताना मनसर लागते. तिथे इ.स. ४ थ्या शतकातील दोन भव्य वास्तूंचे पुरावशेष आढळून आले आहेत. त्यातील एकात शिवलिंग, गर्भगृह, स्तुपावशेष, तटबंदी, सोपान मार्ग, चंद्रशिला आहेत. दुसरीत सभागृह, मंदिराप्रमाणे वास्तू, वऱ्हांडे, निवासी गृह, तपस्या कक्ष इत्यादी आहे. रामटेक आटोपल्यावर पुढे भंडाऱ्याकडे निघताना मौद्यास श्रीविष्णूंची कोरलेली सुंदर मूर्ती आहे. नागपूर—रामटेक मार्गावरचे कामठी येथील ड्रॅगन पॅलेस ही सर्व ठिकाणे पाहण्यासारखी आहेत.

येथे भिकाऱ्यांचा त्रास नाही. लहानसा रस्ता, रामटेकच्या प्राचीन ऐतिहासिक ठेव्याने झाकोळलेले हे मंदिर अशा अनेक

कारणांनी चतुर्थी, तिथ्या व उत्सवांव्यतिरिक्त या मंदिरात गर्दी नसते आणि हा एक वैदर्भीय अष्टविनायक आहे, याची जाणीवही अनेकांना नाही; पण या अठरा भुजा असलेल्या गणेशाला नवस बोलणारे भक्त मोठ्या संख्येने आहेत. अत्यंत सुंदर, पाहता क्षणी प्रभावीत करून जाणारी, मन प्रसन्न करणारी अशी ही मूर्ती आहे.

# श्री भृशुंड गणेश, मेंढा

विदर्भाच्या पूर्वेकडील जिल्हा म्हणून भंडारा जिल्हा ओळखला जातो. दाट जंगलांनी व्यापलेला हा प्रदेश असून या जिल्ह्याचे विभाजन होऊन गोंदिया जिल्हा निर्माण झाला. गोंदियापलीकडे छत्तीसगड राज्य सुरू होते. नागपूर—कोलकाता राष्ट्रीय महामार्गावर भंडारा आहे. रामटेकवरून सुमारे ७१ कि.मी. वर भंडारा आहे. भंडाऱ्यापासून तुमसर मार्गावर पूर्वेकडे अगदी लगेचच ३ कि.मी.वर मेंढा हे छोटेसे गाव आहे. ते आता भंडाऱ्यातच समाविष्ट झाल्यासारखे आहे. आजचे मेंढा गाव म्हणजे पूर्वीचे नागांचे पद्मपूर राज्य. या ठिकाणी ११ व्या शतकातील प्राचीन अशी श्री गणेशाची मूर्ती आहे. येथून नागपूर—कोलकाता रेल्वे मार्गावर 'भंडारा रोड' हे रेल्वे स्टेशन सुमारे ८ कि.मी. अंतरावर आहे. नागपूर—भंडारा ६१ कि.मी. अंतर आहे.

## या क्षेत्रासंबंधी काही कथा व इतिहास

नागवंशातील भृशुंड ऋषींनी या गणेशाची स्थापना केली, त्यामुळे त्याचे 'भृशुंड गणेश' असे नाव पडले. भृशुंड ऋषींची परंपरा चालविणाऱ्यांना आजही 'भृशुंडी' या आडनावानेच ओळखले जाते. 'भु' म्हणजे भुवया आणि 'शुंड' म्हणजे सोंड. गणपतीची आराधना करताना ऋषी इतके तल्लीन झाले की त्यांच्या भुवयांपासून एक सोंड फुटली आणि त्यामुळे त्यांना भृशुंड ऋषी म्हटले गेले अशी आख्यायिका आहे.

आताचे छत्तीसगड आणि तेव्हाचे दंडकारण्य या परिसरातील अत्यंत तपस्वी विद्वान ऋषी 'और्व' यांची कन्या 'शमिका' आणि 'शौनक' ऋषींचा मुलगा 'मंदार' यांचा विवाह झाला. शमिका वयात आली तेव्हा तिला सासरी आणण्यासाठी शौनकांनी मंदारला और्व ऋषींकडे पाठवले. मंदार तेथे दोन दिवस राहिला. पत्नीला घेऊन परतताना त्याने वाटेत भृशुंड ऋषींच्या आश्रमात मुक्काम केला. भृशुंड ऋषींना जेव्हा त्यांनी प्रत्यक्ष पाहिले तेव्हा त्यांच्या कपाळातून निघालेली सोंड पाहून ते दोघेही तारुण्यसुलभ चेष्टेने हसू लागले. गणेश भक्तीत तल्लीन भृशुंड ऋषींना हा साक्षात गणेशाचा अपमान वाटला. ते संतापले आणि त्यांनी या दोघांना शाप दिला की 'तुम्ही दोघेही वृक्ष व्हाल.' मंदार आणि शमिकाला आपली चूक कळली; परंतु उशीर झाला होता. ते दोघेही वृक्ष झाले.

दोघेही घरी परत आले नाही, तेव्हा चौकशी करीत मंदारचे गुरू 'धौम्य' आणि वडील 'और्व' भृशुंड ऋषींच्या आश्रमात आले. तिथे पोचल्यावर त्यांना सर्व प्रकार समजला. त्यांनी भृशुंड ऋषींना या शापातून मुलांना मुक्त करण्यास विनविले. भृशुंड ऋषींच्या सल्ल्यावरून त्या दोघांनीही तपश्चर्या केली व श्री गणेशाला प्रसन्न करवून घेतले. मात्र श्री गणेशाने मंदार व शमिकेला परत मनुष्यदेह न देता वरदान दिले की, 'मी स्वतः शमी आणि मंदार वृक्षाच्या मुळाशी नित्य निवास करीन. दुर्वेशिवाय माझी पूजा पूर्ण होत नाही; परंतु आता दुर्वा नसल्यास मी शमी–मंदाराने तृप्त होईन. या वृक्षांच्या प्रदक्षिणेने पृथ्वी प्रदक्षिणेचे पुण्य लाभेल. हे वृक्ष म्हणजे माझेच रूप समजून त्यांचे पूजन होईल.'

मुद्‌गल पुराणात 'भृशुंड आख्यान' आहे. उत्तरेकडून येणारे अनेक साधूसंत नद्यांच्या काठाकाठाने प्रवास करीत दक्षिण भारतात जात. श्री गणेश भक्त मुद्‌गल ऋषी दक्षिणेत धर्मप्रसारार्थ जात असताना ह्या नदीकाठी एका लुटारूने त्यांना अडवले व जवळच्या सर्व वस्तूंची मागणी केली. हा लुटारू अनेक पांथस्थांना लुटायचा; परंतु जीवहानी करत नसे. ऋषींजवळ काय असणार? झटापटीत मुद्‌गल ऋषींचा स्पर्श त्या लुटारूला झाला आणि त्याची मती पालटली. बुद्धी स्थिर झाली आणि तो मुद्‌गल ऋषींना शरण गेला. आपल्याला अनुग्रह करावा असा आग्रह त्याने ऋषींना केला. ऋषींनी त्याला गणेशमंत्र दिला. 'ह्या मंत्राने तुझा उद्‌धार होईल. तू शेती करून सत्त्वशीलतेने आपल्या कुटुंबाचे पालनपोषण कर' असे सांगितले. तो अहोरात्र श्री गणेशाचा जप करू लागला. परमेश्वर स्वरूपात विलीन झाला. त्याच्या दाढीमिशा, जटा वाढल्या. त्याचा चेहरा एखाद्या तपस्वी साधूप्रमाणे झाला. तो संपूर्ण गणेशमय झाला होता आणि पुढे प्रत्यक्ष भुवयांमधून शुंड उगवल्याने त्याने निर्माण केलेली शिल्पप्रतिमा ही मानवी चेहऱ्याची, दाढीमिशा असणारी आणि सोंड असणारी अशी तयार झाली.

## मूर्ती, मंदिर व परिसर

ही मूर्ती बघताक्षणी काहीशी चमत्कारिक वाटते. या मूर्तीच्या मुखमंडळाच्या जागी मानवी नाकपुड्या आणि किंचित दाढीमिशा आढळतात. श्रींच्या मानवसदृश अशा वेगळ्या रूपामुळे ही मूर्ती लोकप्रिय आहे.

प्रत्यक्ष मूर्ती ८ बाय ८ फुटाच्या चुन्याच्या घुमटीत आहे. प्रदक्षिणा घालण्यास फारशी जागा नाहीच. आता घुमट असलेला भाग लाकडी रेलिंग लावून बंदच केला आहे. त्यामुळे बाहेरून प्रदक्षिणा घातली जाते.

या चतुर्भूज मूर्तीच्या शिरोभागी जटामुकुट आहे. प्रदक्षिणाक्रमाने हातात परशू, अंकुश, मोदक आहेत. चौथा हात आशीर्वाद देत आहे. कपाळावर अक्षदाकुंकुमतिलक, नाक, गाल, ओठ, मिशा स्पष्ट जाणवतात. डोळे अर्धोन्मिलित असून ते मानवी वाटतात. डावा पाय दुमडला असून उजवा पाय मूषकावर सुखासनात म्हणजे खाली सोडलेला दिसतो. कुंकुमतिलकाची जागा थोडी फुगीर आहे.

मूर्तीची सोंड ही खाली सोडलेली असली आणि मूर्तीच्या ओठांमधून आल्यासारखी भासली तरी ती भवयांमधूनच सुरू झालेली आहे.

शेंदूरलेपनाने अलंकार दिसत नाहीत; परंतु दंडावर, मनगटात, गळ्यात व पायात ते असावेत. मूर्तीच्या प्रभामंडळाच्या जागी पाच फण्यांचा नागराज दिसतो. त्याने या मूर्तीवर फणाछत्र धरले असल्याचा भास होतो. खाली मूषकाचे पाय, मुख व कान दिसतात. एकंदरीत काय शिल्पकाराला असे दाखवून द्यायचे आहे की श्रीगणेशाचा मंत्र जपत भृशुंड ऋषी गणेशातच स्वरूप समर्पित झाले आहेत.

मंदिराच्या वरील घुमटी हेमाडपंथी आहे. त्यामुळे ही मूर्ती ११ व्या शतकात स्थापित झाली असावी. मूर्तीसमोरील दोन्ही बाजूंचे भव्य स्तंभ मूळचेच असावेत. मूर्तीपुढ्यात एक नंदी आहे. ती प्रतिमा नंतर प्रतिष्ठापिली असावी. तसेच पुढील ओटा व सभामंडपही फार नंतरचा आहे.

मंदिराच्या समोर जे पटांगण आहे, त्यात दक्षिणमुखी राक्षसनिर्दालन मुद्रेतील हनुमानाची भव्य मूर्ती आहे. तिला छत नाही. छत बांधले तर कोसळते अशी आख्यायिका आहे. श्री सीतारामजी कोंडूजी चचाणे ह्या पांडुरंगभक्ताने वार्धक्यावस्थेत पंढरीची वारी होत नसल्याने या प्रतिमेपुढे दैनिक पूजा बांधली. काकडआरतीपासून चातुर्मासव्रत, दैनिक दिवाबत्ती, साफसफाई या सर्व सेवा केल्या. १९६४ मध्ये त्यांचे निधन झाल्यावरही ती परंपरा श्री शंकर शिवचरण भारद्वाज यांनी सांभाळली.

परिसरात काही सतीशिळा आहेत. त्यावर चंद्रसूर्यांचे अंकन आहे. पतीच्या निधनानंतर स्त्रिया पतीच्या कलेवरासह सती जायच्या. जोपर्यंत सूर्यचंद्र आहेत, तोपर्यंत या सतींचे नाव चिरंतन राहावे ह्या उद्देशाने त्यांचे नातेवाईक अशा शिळा अंकन करीत. नदीच्या जवळ अशा शिळा आढळतात. हा पट्टा रेताड आहे. गोलवट आकाराचे दगड आहेत. वनस्पतींची शुष्कता आहे. त्यामुळे पूर्वी येथील वैनगंगा नदीचे पात्र मंदिरापर्यंत असावे, असे वाटते. कालांतराने नदीने मार्ग बदलला असावा. परिसरात गिरी गोसाव्यांच्या समाध्या आहेत.

परिसरात १३ व्या किंवा १४ व्या शतकात तेथे निर्वासित असलेल्या १०–१२ महंतांच्या समाध्या आहेत. त्यावर चतुष्कोनी, अष्टकोनी अशा घुमट्या आहेत. ही मंडळी शिवोपासक असतात. एका घुमटीत विष्णूप्रतिमा आहे. एखादा भक्त वैष्णव असावा. ३०० वर्षांपूर्वीची ही प्रतिमा असावी. समभंगात चतुर्भूज असलेली ही प्रतिमा अलंकारांनी ल्यालेली आहे.

## आजूबाजूची पाहण्यासारखी ठिकाणे

भंडारा गाव तसे जुने. या गावात काही प्राचीन प्रतिमा आहेत. जैन मंदिरातील शिल्पपट्ट, खांब तलावाच्या काठावरील सतीस्तंभ–विरगळ स्तंभ, बहिरंगेश्वराचे मंदिर, हयग्रीव प्रतिमा, पाहण्यासारख्या आहेत.

भंडाऱ्याच्या वैनगंगेचे पात्र पूर्वी अगदी या मंदिरार्यंत असावे. मात्र आज ते अडीच कि.मी. अंतरावर गेले आहे. पूर्वी मेंढ्याच्या ठाण्यापर्यंत पूर आला की गाव जलमय व्हायचे असे सांगतात. आज मात्र जमिनीखालच्या पाण्याची पातळी जरी वर असली तरी मूळचे नदीपात्र शुष्क झाले आहे. मंदिराच्या परिसरात मोठा वटवृक्ष होता असे जुनी मंडळी सांगतात. वैनगंगेचे विस्तीर्ण पात्र पाहण्यासारखे आहे.

तुमसरमधील आंधळगावच्या जवळ एक गायमुख देवस्थान असून पार्वतीची एक रौद्र रूपातील प्रतिमा एका नैसर्गिक विवरात म्हणजे डोंगारात सुमारे ४० फूट खोल प्रतिष्ठापित आहे. जवळच अंबागड हा गोंडकालीन किल्ला आहे.

## इतर माहिती

भंडाऱ्याची पितळी भांडी प्रसिद्ध आहेत. पितळी ठोक्याचे गंज निर्मितीचे काही लघुउद्योग आहेत. श्रीमंत गोंड आणि भोसल्यांच्या काळात हे मोठे गाव होते. पितळी व अन्य धातूचा भन् भन् असा आवाज येत राहतो म्हणून याला 'भानारा' असे म्हटले असावे. पुढे भनारा–भंडारा असे झाले असावे.

जोशी कुटुंब या मंदिराची देखभाल करत आहे. १२ व्या शतकात श्री. निळंभट भानारेकर हे ग्रामजोशी होते. त्यांच्याकडे श्री

चक्रधर स्वामी येऊन गेल्याचे सांगतात. म्हणजे जोशी कुटुंबाकडे ८०० वर्षांपासून पूजेची परंपरा आहे.

माघ शक्ल चतुर्थीस सार्वजनिक उत्सव साजरा होतो. तेव्हा खूप गर्दी होते. महिन्यातील दोन्ही चतुर्थी, माघी चतुर्थी, तिळी चतुर्थी, भाद्रपदातील गणेश चतुर्थी अशा तिथ्यांना खूप गर्दी असते. एरवी या देवस्थानात फारशी गर्दी नसते. भजन, प्रवचन, गोपालकाला, कीर्तन, अथर्वशीर्षाचे पठण, उद्‌बोधनात्मक कार्यक्रम सतत सुरू असतात.

भंडाऱ्यातील रस्त्यांचे डांबरीकरण, सिमेंटीकरण झाले असून ऑटोरिक्षा मोठ्या प्रमाणावर आहेत. एस.टी.च्या भरपूर फेऱ्या नागपूर व अन्य जवळपासच्या स्थानकांवरून सुरू असतात. राहण्यासाठी धर्मशाळा व आता हॉटेलही आहेत.

# श्री पंचानन गणेश, पवनी
# श्री सर्वतोभद्र, पवनी

भंडारा जिल्ह्यातील पैनगंगेच्या तीरावर प्राचीन अशा पवनी गावात श्री पंचाननाची प्रतिष्ठापना झाली आहे. सुमारे २३०० ते २५०० वर्षांचा इतिहास असलेले 'पवनी' हे त्या काळात बौद्ध धर्मीयांचे पवित्र क्षेत्र होते, हे इथे असलेल्या बौद्ध स्तुपांवरून सिद्ध होते. बौद्ध प्रार्थनेत जो 'एकदंत नागपुरे' असा उल्लेख आढळतो, तो या पवनी पंचाननाचाच आहे, असे अभ्यासक मानतात. तत्कालीन बौद्धांच्या प्रगत शिल्पकलेचा नमुना म्हणजे ही गणेशमूर्ती होय. हा गणपती म्हणजे पाच प्रतिमांचा असून चार दिशांना चार व नैऋत्येस एक अशा पाठीस पाठ टेकवून हा एकच पंचानन गणेश बनला आहे. ही मूर्ती दगडाची नसून लाकडाची आहे. शमी वृक्षावर प्रतिमा कोरण्यात आल्या आहेत.

## या क्षेत्रासंबंधी काही कथा व इतिहास

मोठी पवनी म्हणून ओळखले जाणारे हे ठिकाण भंडाऱ्याच्या दक्षिणेस भंडाऱ्यापासून ४७ कि.मी. तर नागपूरपासून ८२ कि.मी. अंतरावर आहे. प्राचीन इतिहासाची साक्ष देणारे गावातले मठ, मंदिरे, पवन राजाचा भव्य किल्ला, स्तुपावशेष, दशावतार स्तंभ, भग्न मूर्ती पाहून कोणे एके काळी हे अत्यंत प्रगत गाव असावे व राज्यकर्त्यांचे महत्त्वाचे ठाणे असावे, असे वाटते. वैनगंगा किनारी वसलेल्या या गावाची लोकसंख्या सुमारे

तीस हजार आहे. पौराणिक राजा पवन याच्या नावावरून या गावाला 'पवनी' म्हटले गेले. या ठिकाणी पद्मावती राणीने राज्य केल्याने पूर्वी या गावाला 'पद्मावती' असे म्हटले गेले. गावाला तीन बाजूंनी भिंत असून ठिकठिकाणी बुरुज आहेत.

इ.स.पू. तिसरे ते पहिले शतक म्हणजे मौर्य—शुंगकालीन भव्य स्तुपाचे अवशेष या गावाजवळील हरदुलालाची टेकडी, चांडकापूर टेकडी, जगन्नाथ टेकडी या क्षेत्रात आढळले. खरमुखी यक्ष, मुचसिंद नाग शिल्प, स्तुपाच्या सूच्या, दगडांचे लेखयुक्त स्तंभ, ब्राह्मी लिपीतील लेखांचे पुरावे अशा गोष्टी काही शिल्पांसह आढळल्या. याचे उत्खनन पुरातत्त्व तज्ञ कै. डॉ. शांताराम भालचंद्र देव यांनी केले होते व अहवालही प्रसिद्ध केला होता.

पवनी हे हीनयान पंथाचे आराधना केंद्र होते. अशोकाच्या काळात ते वैभवशाली बनले. सम्राट अशोकाने येथे काही काळ वास्तव्य केले. आपली मुलगी संघमित्रा हिला त्याने येथूनच श्रीलंकेला पाठवले. दुसऱ्या उत्खननात इ.स.पू. पहिल्या शतकातला क्षत्रपकुमार रूपीअम्माचा स्तंभलेख आढळला. तो आता नागपूरच्या वस्तूसंग्रहालयात आहे. रूपीअम्मा हा कुषाणाचा क्षत्रप होता. त्याला सातवाहन सम्राट गौतमीपुत्र सातकर्णीने पराभूत केले. या युद्धानंतर त्याने नाशिक येथील गुहालेखात 'बेनाटक स्वामी' असे स्वतःला संबोधले. इ.स. १९९४ मध्ये भारतीय पुराणवस्तू संशोधन विभागाचे डॉ. अमरेंद्रनाथ यांच्या नेतृत्वाखाली उत्खनन झाले. यात इ.स.पू. १५०० पर्यंतचा इतिहास उपलब्ध करणारे सोन्याचे अलंकार, तांब्याची भांडी, पायऱ्या असलेल्या विहिरी आढळल्या. एक केशविन्यास करणारी महिलेची मूर्ती आढळली. अरब देशांशी व्यापार झालेल्या वस्तू आढळल्या. डॉ.

मिराशी यांना हरदोला टेकडीच्या पश्चिमेस उत्खननात राजा भगदत्त यांचा शिलालेख सापडला. डॉ. अमरेंद्र यांच्या मते पवनीइतका प्राचीन, भक्कम, सुरक्षित व अभंग किल्ला महाराष्ट्रात नाही. अरेबियन दगडांवरून पवनीचा समुद्र मार्गे अरब देशांशी व्यापार होता, हे सिद्ध करते तर हाडांपासून बनविलेल्या सुया २३०० वर्षांपूर्वी हे क्षेत्र विणकामात निपुण होते, हे दर्शवितात.

पवनीवर मौर्य, शुंग, सातवाहन, सिथियन, पुन्हा सातवाहन, वाकाटक, मुसलमान धर्मीय, गोंड, भोसले आणि अखेर इंग्रजांनी राज्य केले. या काळातच यादवांचे राज्य १३१८ मध्ये लयाला गेल्यावर देवगडच्या गवळी राजांनी सत्ता प्रस्थापित केली. यानंतर चांद्याच्या गोंड राजांनी हा प्रदेश जिंकला. इ.स. १७३९ मध्ये नागपूरच्या रघूजी भोसले यांनी पवनीचा प्रदेश वलीशाह या गोंड राजाचा पराभव करून जिंकला. त्यांनी तुळजोरामपंत या सरदाराला पवनीत बंदोबस्तासाठी ठेवले. त्यांचे वंशज तुळाणकर पवनीत आजही आहेत.

पवनीचे राज्यकर्ते बदलत गेले तरी पवनीवर ईश्वराचा वरदहस्त असल्यामुळे इथले सांस्कृतिक अवशेष टिकून आहेत, अशी जुनी मंडळी सांगतात. इ.स. १८१७–१८ च्या दरम्यान पेंढाऱ्यांनी तीन आक्रमणे पवनीवर केली. दोनदा पवनीकरांनी पराभव स्वीकारल्यावर तिसऱ्यांदा सर्व लोकांनी एकजुटीने त्यांना पिटाळून लावले. पुढे २५ सप्टेंबर १८१८ ला मेजर विल्सन यांच्या नेतृत्वात ब्रिटिश फौजांनी भोसल्यांचा पाडाव करून पवनी हस्तगत केली.

भंडारा जिल्ह्यातील पवनी मोठे गाव असल्याने इ.स. १८६७ मध्ये जिल्ह्यात नगरपालिकेचा पहिला मान मिळाला. १८६० मध्ये या गावाची संख्या होती ६००००. आज इतक्या

वर्षांनंतर ती कितीतरी पटीने अधिक व्हायला हवी होती; पण ती आज आहे ३००००. जगात कुठेच लोकसंख्या कमी होत नसताना पवनीत मात्र ती कमी झाली.

पवनीमध्ये आजही रेशीमकाठी वस्त्रे चांगली तयार होतात.पूर्वीही ती होत असावी.

## मूर्ती, मंदिर व परिसर

नागपूर किंवा भंडाऱ्यावरून येताना पवनीमध्ये शिरतेवेळी डावीकडे एक भव्य प्रवेशद्वार आहे. हा किल्ल्याचा दरवाजाच होय. किल्ल्याची एक भिंत आणि तिच्या पायथ्याशी असलेला तलाव आपले लक्ष वेधून घेतात. त्यातून आत शिरल्यावर लगेचच उजव्या हाताला एक भव्य अडीचशे वर्षांपूर्वीची गणेशाची प्रतिमा असलेले मंदिर रस्त्याला लागूनच आहे. आपल्याला क्षणभर वाटते की अष्टविनायकांमधील श्री सर्वतोभद्र किंवा श्री पंचानन हाच तर नव्हे? पण नाही, चौकशी करता कळते की येथून डावीकडचा रस्ता घेऊन म्हणजे सरळ या मंदिराच्या प्रवेशद्वारापुढून विरुद्ध दिशेने निघायचे आणि सुमारे दीड कि.मी. जायचे. तिथे भटांचा गणपती म्हणून जो गणपती ओळखला जातो, तो 'श्री पंचानन' होय.

तिथे पोचल्यावर ते मंदिर आहे की कुणाचे जुने घर असा प्रश्न पडतो. गर्दी म्हणून कोणीच नाही. बरेचदा कुलूप लावलेले. मग त्या पुरातन वास्तूत शिरण्यासाठी समोरच राहणाऱ्या भटांकडून किल्ली घ्यायची आणि आत प्रवेश करायचा. सुमारे दीडशे वर्षांपासून या प्रतिमेच्या पूजनाचे अधिकार त्यांच्याकडे आहेत.

हा गणपती अष्टविनायकांत मोडतो, यावर विश्वास बसत नाही. पण आत शिरून मूर्ती न्याहाळल्यावर ती प्राचीन असून सर्वतोभद्र अशी आहे, हे लक्षात आल्यावर आणि या शहराची प्राचीनता डोळ्यांपुढे उभी केल्यावर विश्वास ठेवावा लागतो.

ही कौलारू घुमटी २०—२५ फूट लांब व १०—१५ फूट रुंद आहे. घराप्रमाणे भासते. वर लाकडी पाट्या आहेत. पूर्वी तिथे माळा असावा. रस्त्याला लागून या वास्तूचा दरवाजा पश्चिमेकडे आहे. आत शिरल्यावर उजवीकडे गर्भगृह आहे. त्याची प्रवेशदिशा उत्तरेकडे येते. गर्भगृहात मध्यभागी श्रीगणेशस्तंभ (श्रीगणेशमूर्ती) असून सभोवताल प्रदक्षिणापथ आहे. हा चौकोनी स्तंभ ४ फूट ३ इंच उंच त्याची जाडी २ बाय २ फुटाची आहे. त्यावर श्री गणेश अंकन केले आहे. चारही दिशांना सारखे अंतर सोडून ही पंचाननाची मूर्ती आहे. तिला सर्व बाजूंनी दर्शन घेता येते, न्याहाळता येते. म्हणूनच तिला 'सर्वतोभद्र' असे म्हटले जाते. परमेश्वर हा सर्व दिशांना पाहत असतो, ही संकल्पना त्यामागे असते. अशा प्रतिमा प्राचीन असतात. या प्रतिमेला चार दिशांसह वायव्य दिशेसही एक गणेशमुख आहे. या प्रतिमेच्या भुजा स्पष्ट नाहीत. भालप्रदेश, शुंड, शूर्पकर्ण, लंबोदर स्पष्ट दिसतात. श्री पंचाननाचे वायव्यमुख किंचित जोडावर असून त्यामध्ये कर्णच्छेद रचना साधलेली दिसते. बांधकामाच्या उत्खननात आढळलेली अगदी अशीच सर्वतोभद्र मूर्ती आमच्या कळंबच्या श्री चिंतामणी मंदिरात प्रवेश करताना खाली पायऱ्या उतरण्यापूर्वी उजवीकडे ठेवली आहे, मात्र ती पाषाणाची आहे आणि तिला चतुर्मुखी गणेश म्हणतात.

देवळात डावीकडे एक गवाक्ष आहे. त्यातून सूर्यप्रकाश येतो. या वाडीत एक दगडी दशावतार चौकोनी स्तंभ असून त्यावर चारही बाजूंनी दशावतार हिंदूमिथक म्हणजे श्रावण बाळ, अर्जुन, देवता इत्यादी कोरलेल्या आहेत. हा स्तंभ सुमारे पाच–सहाशे वर्षांपूर्वीचा असावा. असे लोखंडी कांबेने जोडलेले अनेक स्तंभ पवनीत आढळतात.

येथे एक कथा अशी सांगितली जाते की एक ८–१० वर्षांची मुलगी पूजा करीत असताना एक नाग त्या बोळीसारख्या प्रवेशद्वारातून आत शिरला. मुलगी घाबरून किंचाळली. गाभारा लहानसा असल्याने तिला वाचवायला जायचे तर प्रवेशद्वारातूनच जावे लागणार होते. तेव्हा लोकांनी मंदिरातील ते गवाक्ष फोडले आणि मुलीला बाहेर ओढले. गावकऱ्यांनी श्रद्धेपोटी तिच्या हातून चतुर्थीला काही चूक झाली असणार, असा तर्क काढला. जरा वेळाने नागराज दरवाजातून झुडपात निघून गेले.

नागराज येण्यापुरती ही कथा नाकारता येत नाही. कारण कौलारू सभामंडपासमोर देवळाची थोडीशी ओसाड जागा असून अगदी झाडाझुडपांचा पसारा वाढलेला आहे.

## आजूबाजूची पाहण्यासारखी ठिकाणे

गावात काही पुरातन मंदिरे, शिवमंदिरे, किल्ला तटबंदी, मठ, भोसलेकालीन देवालय, दत्तावतार श्री वासुदेवानंद सरस्वती यांनी चातुर्मास व्यतीत केला ते पवित्र स्थळ, गादी, गिरी–गोसाव्यांच्या समाध्या वगैरे आहेतच. या श्री पंचानन मंदिराच्या अर्धा कि.मी. अंतरावर पुढे वैनगंगा नदीचे पात्र आहे. तिथेही एका देवळात श्री गणेश प्रतिमा आहे.

पवनीच्या बाहेर उत्तरेकडे पाच कि.मी.वर कोरंबी नावाचे वनवासी गाव आहे. तेथे काही दगडी शैलाश्रय आहेत. आज तेथे शिव मंदिर आहे. तिथे माणसांची ये–जा असते. मात्र पुढे जंगल असून त्यात गिरीजाबाईचा महाल किंवा सीतेचा महाल किंवा पार्वती भुयार या नावाची दोन शैलाश्रये आहेत. डोंगराच्या खडकातून ती कोरून काढली असून एका गुंफेमध्ये मध्यभागी स्तंभ आहे. दुसरी इंग्रजी 'टी' आकाराची असून त्या गुंफेत जंगली प्राण्यांच्या मलमुत्राचा वास येतो. त्यामुळे हा भाग अतिशय धोकादायक समजला जातो. या गुंफा म्हणजे विदर्भातील महापाषाण युगातील लोकांची दफनस्थळं किंवा अस्थिकुंभ स्थळं असावीत, असे मत श्री.के. चितळे यांनी मांडले आहे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते, इतर श्री गणेश स्थानांपैकी हे स्थान पूर्णत: अविकसित आहे. येथे भक्तांची कुठलीच गर्दी नसते. त्यामागची कारणे नेमकी सांगता येणार नाही. आज थोड्याफार टाईल्स वगैरे लावून गाभारा नवीनतम करण्यात आला आहे. मात्र पवनी शहराप्रमाणे प्राचीनतेच्या या मंदिराच्या खुणा तितक्याशा इतिहासाच्या पानांवर नमूद नाहीत.

# श्री वरदविनायक, गवराळा, भद्रावती (भांदक)

नागपूर अथवा भंडारा–पवनीवरून येताना चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा–चंद्रपूर मार्गावर भद्रावती हे प्राचीन, ऐतिहासिक आणि धार्मिक ठेवा असलेले लहानसे नगर आहे. नागपूरपासून १२५ कि.मी. तर चंद्रपूरवरून नागपूर दिशेने २६ कि.मी.वर ते स्थित आहे. पवनी ते भद्रावती सुमारे १२० कि.मी. अंतर आहे. वैदर्भीय अष्टविनायकांपैकी वरदविनायकाकरिताच ते प्रसिद्ध आहे, असे नाही तर प्राचीन श्री भद्रनाग मंदिर, श्री पार्श्वनाथ जैन मंदिर, विजासन लेण्या यांकरिताही प्रसिद्ध आहे.

या गावात प्रवेश करताना एक मुख्य रस्ता दक्षिणेकडे जातो. त्या रस्त्यावर साडेतीन कि.मी. अंतरावर गवराळा हे पूर्वीचे गाव आणि आता भद्रावतीमध्येच 'गणपती वार्ड' या नावाने समाविष्ट झालेला परिसर आहे. तिथे एक छोटी टेकडी आहे. त्या टेकडीवर हे प्राचीन वरदविनायकाचे मंदिर आहे. येथून 'भांदक' रेल्वे स्टेशन अगदी अर्धा कि.मी. वर आहे. सर्व पॅसेंजर गाड्या व काही एक्स्प्रेस गाड्या येथे थांबतात. भांदक येथे आयुधनिर्माणी म्हणजेच डिफेन्स फॅक्टरी असल्याने सैन्याशी संबंधित अनेक अधिकारी, कर्मचारी येत असतात.

सर्व चतुर्थी आणि सणासुदींना या मंदिरात मोठी गर्दी असते. एरवी फारसे भक्त येथे दिसत नाहीत.

## या क्षेत्रासंबंधी काही कथा व इतिहास

मूळ नाव 'भद्रावती' असलेल्या या गावाचे नामकरण 'भांदक' असे इंग्रजांच्या काळात झाले असावे. प्राचीन नाव भद्रक, भद्रकपूर नंतर भानक, भांदक असे अपभ्रंषित रूप झाले.

चिनी प्रवासी ह्यू—एन—त्संग हा इ.स. ६४८ साली इथे आला होता. या गावात अनेक मंदिरे, प्राचीन मूर्त्या, भग्न अवशेष, शिल्प, दगडी स्तंभ, शिलालेख आजही आढळतात. मात्र ते कुठेही गावभर विखुरले आहेत. त्यातील किती चोरी गेले असतील सांगता येत नाही. आजही त्यांच्या संरक्षणार्थ कोणी पावले उचलताना दिसत नाही. मात्र कोणे एके काळी ही नगरी फार वैभवशाली व प्रसिद्ध असावी, हे नक्की.

मंदिर ज्या टेकडीवर आहे, ती गाईंना चरण्यासाठी असलेली जागा होती. त्यामुळे या परिसराला 'गवराळा' हे नाव पडले. कल्याणचा उत्तर चालुक्य सम्राट सहावा विक्रमादित्य त्रिभूवमल्ल यांच्या अंमलात हा भाग होता. वासुदेव नामक दंडनायक या अधिकाऱ्याने हे क्षेत्र गाईंना चरण्यासाठी खुले केले. परिसरात एक संस्कृतमिश्रित मराठी शिलालेख आहे. त्यानुसार या जमिनीवर सदैव गाईच चरल्या पाहिजेत. याचा दुरुपयोग करणाऱ्यावर देवाचा कोप होईल आणि गाईंची कत्तल करणाऱ्यांना कुंभीपाक नरकात जावे लागेल, अशा आशयाचा मजकूर अकरा ओळीत कोरला आहे.

श्री चिंतामणी कळंब क्षेत्री जी कथानके सांगितली जातात, त्यातलीच एक कथा येथेही सांगितली जाते.

गृत्समद नावाचे ऋषी मुकुंदा नामक ऋषीकन्या व इंद्र यांच्या संबंधातून जन्माला आले होते. पुढे मोठे झाल्यावर ते वेदशास्त्रातही पारंगत झाले आणि मान्यता पावले. एके दिवशी मगध राजाच्या घरी श्राद्धासाठी अनेक ऋषी जमले होते. त्यात गृत्समद ऋषीही होते. तेथे अत्री ऋषींनी त्यांचा 'तू औरसपुत्र नसून जारस आहे' असे म्हणून अपमान केला. गृत्समदांना ते शब्द लागले. त्यांनी घरी येऊन माता मुकुंदेला सत्य विचारले. मुकुंदेने सर्व हकीकत सत्य सांगितली. ते ऐकून गृत्समद दुःखी झाले. त्यांनी श्री गणेशाची उग्र आराधना केली. गणेश प्रसन्न झाले. 'श्री गणेशा, तू मला ब्राह्मणापेक्षा श्रेष्ठ असा ब्रह्मवेत्ता कर' असा वर मागितला. गणेशाने त्यांना ब्राह्मण्य दिले. मंत्रद्रष्टाही केले. गृत्समदांनी ज्या पुष्पक वनात तपश्चर्या केली, तेथेच त्यांनी वरप्राप्तीनंतर 'वरदविनायका'ची स्थापना केली. ते पुष्पकवन म्हणजे आजचे भद्रावती व ही तीच मूर्ती होय, असे सांगितले जाते.

गृत्समद ऋषींनी केलेल्या याचनेत म्हटले आहे की, 'हे विघ्नहर्त्या, गजानना, कलियुगात भद्रक नावाच्या या गावी भक्तांनी यावे. कुंडात स्नानादी आन्हिक करून दान दिल्याने त्या भक्ताच्या सर्व इच्छा पूर्ण होतील.' असे हे प्राचीन उल्लेख असणारे भद्रावती आहे.

महाभारत युद्धोत्तर गोत्र हत्येमुळे युधिष्ठिर अत्यंत दुःखी झाला होता. श्री व्यासांना त्याने यातून मुक्तीचा मार्ग विचारला, तेव्हा व्यासांनी सांगितले, 'भद्रावतीपुरीत यौवनाश्व नावाच्या वीराकडून एका अश्वाचे रक्षण होत आहे. त्याचा पराभव करून तेथील तीर्थात पापक्षालनार्थ स्नान कर म्हणजे तू पापमुक्त होशील.' ('जैमिनीय अश्वमेध'—अध्याय १, श्लोक ३ व १३)

युधिष्ठिराने पंडूपुत्र भीम, घटोत्कचपुत्र मेघवर्ण, वृषकेतू यांच्यासह यौवनाश्वावर हल्ला केला. त्याचा पराभव करून अश्व सोडवला.

त्यात यौवनाश्व व भद्रावती ही नावे जरी जुळत असली तरी आजच्या भद्रावतीत आणि महाभारत क्षेत्रात, इंद्रप्रस्थात बरेच अंतर आहे.

यौवनाश्व राजाला अपत्य नसल्याने त्याने पत्नी प्रभावतीसह शंकराची आराधना केली. पुत्रप्राप्तीसाठी नवस बोलला. नंतर राजाला कन्याप्राप्ती झाली. तिचे नाव 'भद्रावती' ठेवले गेले. त्यावरून या शहराला भद्रावती म्हटले गेले असावे, अशी आख्यायिका आहे.

गणेशपुराणात (उपासना खंड, अध्याय ३७) भांदकचा 'भद्रक' असा उल्लेख आहे. कोसलच्या सोमवंशी अथवा पांडूवंशीय उदयन राजाने पाचव्या शतकात भद्रेश्वराची स्थापना केली होती. त्यावरून 'भद्रक' हे नाव पडले; पण ते रूढ झाले नाही.

भद्रावतीला कृतयुगात 'पुष्पकपूर', त्रेतायुगात 'मणिपूर', द्वापारयुगात 'भानक' आणि कलीयुगात 'भद्रक' म्हटले गेले. भानकचा अपभ्रंश 'भांदक' असा झाला. येथे भद्रसेन राजा होता तसेच चंद्रगुप्त मौर्याचा भद्रबाहू गुरू येथे असल्याने 'भद्रावती' हे नाव पडले असावे. मात्र भांदक हे प्राचीन शहर असले तरी ते पुराणातील 'भद्रावती' नसावे असे अनेक अभ्यासक मानतात. आज भांदक, विजासन, गवराळा, सुमठाणा, चिंचोर्डी आणि डिफेन्स एरिया एवढाच परिसर भांदकचा आहे. चंद्रपूरच्या इतिहासात डोकावताना लक्षात येते की पद्मावतीचा राजा चंद्रहास्य द्वापारयुगात राज्य करीत होता. कलियुगाच्या प्रारंभी त्याने

कौतलकपूर या राजधानीचा त्याग करून नवीन राजधानी वसविली. चंद्रहास्य नावावरून 'चंद्रपूर' नाव पडले असावे. चंद्रहास्याचे राज्य आणि वंश नाश झाल्यावर पोवार, बोकाने, गोलकर मांडलिक राजे झाले. त्यांचेही राज्य नष्ट झाल्यावर चंद्रपूर राजधानी उजाड व जंगलमय झाली आणि दीर्घ काळानंतर या परिसरात 'भद्रावती' ही नवीन राजधानी उदयास आली.

चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती हे गाव १९८१ मध्ये तालुका झाले आणि त्याला १९९७ मध्ये नगर परिषदेचा दर्जा प्राप्त झाला.

पूर्वी भद्रावती भद्र नागांच्या राजधानीचे शहर होते. रामायण काळात हा परिसर 'पुष्पक वन' म्हणून ओळखला जात असे व या वनातच गृत्समद ऋषींचे वास्तव्य होते.

## मूर्ती, मंदिर व परिसर

इ.स. ११०४ मध्ये ही मूर्ती गवसली, असे मानतात. पूर्वी तिथे पूर्ण जंगल होते. अगदी तीस वर्षांपूर्वीपर्यंत हा भाग जंगलाचा व अविकसित होता. आसनस्थ असलेला हा चतुर्भूज गणपती असून काहीजण त्याला केवळ दोनच हात असल्याचे मानतात. मूर्ती जमिनीपासून जवळपास ६ फूट (५ फूट ९ इंच) उंच असून मूर्तीची सोंड डावीकडे आहे. शेंदूर मोठ्या प्रमाणावर असल्याने प्रतिमेचे मूळ स्वरूप लक्षात येत नाही.

मूर्तीच्या डाव्या हाती मोदक असावा. उजव्या हातात बीजपूरक आहे. वरच्या दोन हातात परशू व अंकुश असावा. डावा पाय दुमडलेला असून उजव्या पायाजवळ मूषक असावा.

वरदविनायकाचे रूप काहीसे रौद्र वाटते. नेत्र शून्यात असल्यासारखे भासतात. भालप्रदेश मोठा आहे. शूर्पकर्ण, लंबोदर

असणाऱ्या या मूर्तीच्या पोटास सुमारे ५० वर्षांपूर्वी चोरीच्या उद्देशाने कोणीतरी इजा पोचविली आहे. पोटात काही धन असावे, या आशेने कुण्या चोराने पोट फोडले होते. भक्तांनी डागडुजी करून ते पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला आहे.

मूर्ती इतकी भव्य आहे की आपण एकत्र दर्शन घेऊच शकत नाही. गाभारा लहान असल्याने फोटोही पूर्ण येत नाही. दोन–तीन कोनांतून फोटो घेतल्यावरच त्याची कल्पना येते. भुयाराप्रमाणे हा गाभारा आहे. ३ फूट खाली उतरावे लागते. आत अंधारही असतो. दरवाजाही लहान आहे. ही पद्धत अत्यंत प्राचीन आहे.

वरदविनायकासोबत गर्भगृहात शिवाची पिंड व उमामहेश्वराची सुंदर अशी मूर्तीही आहे. यादवकालीन काही भग्न प्रतिमाही आहेत.

हे देवालय तीन भागात असून तळघर, सभामंडप व मूळ गर्भगृह असे तीन कक्ष जाणवतात. परिसरात ओटे केलेले असून त्यावर भक्त बसून परिसर न्याहाळू शकतात.

मंदिराच्या पुढ्यात लागूनच १६ दगडी खांबांचा यौवनाश्वाचा महाल आहे. हा महाल हेमाडपंथी स्थापत्य आहे. मात्र वेळोवेळी त्यात दुरुस्त्या झाल्याने मूळ स्वरूप राहिले नाही. आज हा महाल म्हणजे वरदविनायकाचा सभामंडप म्हणून राहिला आहे. येथे असलेल्या शिलालेखावरून ११०४ मध्ये चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य याने तो बांधला असावा. भक्त मंडळी याची प्राचीनता महाभारत काळापर्यंत नेतात. ती कथा कथानकाच्या भागात दिलेली आहे. आज हा महाल सिमेंट क्रॉन्क्रिटच्या सभामंडपात परावर्तित केला आहे. हा सभामंडप प्राचीन काळी

नृत्यमंडप असावा. सभामंडपाच्या पूर्वेस एक घुमटी असून ती हेमाडपंथी आहे.

महालाच्या उत्तरेस जो शिलालेख आहे, तो इ.स. ११०४ मधील यादवराजा कान्हीरदेव यादवाचा असावा. त्यावेळी विदर्भात चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य राज्य करीत होता. तसेच गावाच्या पूर्वेस असलेल्या मार्कण्ड्याच्या मंदिराजवळ कान्हीरदेव राजाच्या काळातील युवराज रामदेवाचा लेख आहे. त्यावरून हे देवस्थान यादवकालीन असावे, असे वाटते. याच आशयाची मते 'चंद्रपूरचा इतिहास' लिहिणारे अ.ज. राजूरकर व इतिहास संशोधक श्री.के. चितळे यांनी मांडली आहेत. यौवनाश्व हा चालुक्याचा अधिकारी असावा व लोकप्रिय असावा, त्याने हे मंदिर नंतर बांधले असावे किंवा जीर्णोद्धार केला असावा त्यामुळे या महालाचे नामकरण यौवनाश्व झाले असावे.

मंदिराच्या सभागृहात वैदर्भीय अष्टविनायकांची मोठ्या आकाराची छायाचित्रे व नावे लावलेली आहेत. भद्रावतीच्या वरदविनायकासंदर्भात गृत्समदाची कहाणीही फ्लेक्सवर आहे.

छोट्या टेकडीवरील या मंदिराच्या पायऱ्या चढताना मनुष्याकृती दोन प्रतिमा आहेत. त्या द्वारपालाप्रमाणे मार्गावर उभ्या आहेत. त्यातील एक श्री विष्णूंची मुकुट धारण केलेली प्रतिमा असावी. डाव्या हातात गदा असून उजवा हात भग्न झालेला आहे. इतर दोन हात तुटले आहेत. दुसरी प्रतिमा यक्षाशी जवळीकता दाखवते. काही अभ्यासकांच्या मते त्या ६ फूट उंचीच्या जय–विजय यांच्या कोरलेल्या प्रतिमा आहेत.

चढताना उजव्या बाजूस एका भुयारासारख्या जागेत १० बाय ८ फुटाचे एक शैलाश्रय दिसते. त्यात काही प्रतिमा आहेत. त्यात त्रिविक्रम, केवलनृसिंह, शिवलिंग, शयनमूर्ती भूवराह यांचा समावेश आहे. काही अभ्यासकांच्या मते या भुयारातील मूर्ती वराहविष्णूच्या आहेत.

मंदिर व्यवस्थापन समितीने पाकशाळेची व्यवस्था केली आहे; परंतु कार्यक्राकरिता ती अपुरी ठरते. शिवाय भक्तनिवास तसेच स्वच्छतागृहाचा अभाव आहे.

मंदिराचा परिसर रमणीय निसर्गसान्निध्याचा आहे. मंदिराच्या सभामंडपातून पूर्वेकडे पाहिल्यास प्रशस्त आसना तलाव आहे. मंदिराच्या मागे उंच टेकड्या असून पावसाळ्यात त्या हिरव्यागार वनश्रीने नटलेल्या दिसतात.

पूर्वी मंदिराच्या गाभाऱ्याला छोटेसे छिद्र होते. त्यातूनच तिकडे गेलेले भक्त या मूर्तीचे दर्शन घेत. कालांतराने इंगळे नावाचे स्टेशन मास्तर तिथे आले. त्यांनी या गणपतीला नवस बोलला. त्यांची मनोकामना पूर्ण झाल्यावर त्यांनी ती भिंत तोडून त्या मंदिरासाठी प्रवेश निर्माण केला. त्यावेळी मूर्ती आडवी पडलेली होती. ती सरळ करून नीट बसविली. पुढे पुण्याच्या खरे व तारकुंडे कंपनीने हे मंदिर नीट बांधून दिले, असे सांगतात.

काही वर्षांपूर्वीपर्यंत या गणपतीची मालकी अण्णाजी देशपांडे यांच्याकडे होती. आता विश्वस्त मंडळ आहे. दरवर्षी पौष महिन्यातील संकष्टी चतुर्थीला ५० जोडपी बसवून अभिषेक केला जातो. त्यासाठी बाजूला ओटा बांधला आहे. गर्दी नसल्यामुळे येथे भिकाऱ्यांचा त्रास नाही.

## आजूबाजूची पाहण्यासारखी ठिकाणे

भद्रावतीमध्ये विजासन या तीन पुडांच्या लेण्यांत चंडिका, भैरव व नाथसंप्रदायी शिवप्रतिमा आहेत. लेण्यांच्या शेवटी भगवान तथागताची मूर्ती कोरून काढलेली दिसते.

विवेकानंद शाळेच्या प्रांगणात मोठमोठे प्राचीन स्तंभ आहेत. गावात एक तटबंदीयुक्त वाडा आहे. किल्ल्याप्रमाणे भासणाऱ्या या वाड्याच्या चावडीत अनेक दगडी मूर्त्या आहेत. त्यात कुबेर, गौरीहर, बलराम, नृत्यगणेश, ब्रह्मा, दुर्गा, कालभैरव यांचा समावेश आहे.

गावातील भव्य नटेश्वराची हिरण्यकश्यपू निर्दालन मूर्ती, नृत्यात बेफाम झालेली पण मस्तक नसलेली शिवमूर्ती, खालच्या बाजूस नृत्य पाहणारे गणेश आणि माता पार्वती, बाजूला हत्तीवर आरूढ इंद्र या मूर्त्या वाखाणण्याजोग्या आहेत.

जैनांचे श्री पार्श्वनाथ मंदिर, वरदविनायकाच्या पायथ्याशी कौलारू देवमठातील मूर्त्या व भग्न अवशेष, नव्याने झालेले हनुमान मंदिर पाहण्यासारखे आहे.

## जैनांचे श्री केशरिया पार्श्वनाथ मंदिर

इ.स. १९०० च्या दरम्यान चंद्रपूरच्या स्कॉटिश मिशनरीची पादरी मंडळी जंगलात फिरताना त्यांना चंडिका देवीचे मंदिर प्रथम दिसले. काही अंतरावर श्री पार्श्वनाथाची अर्धवट जमिनीत, अर्धवट बाहेर अशी मूर्ती दिसली. त्यांनी श्वेतांबर जैन समिती आणि पुराणवस्तू संशोधन विभागाला माहिती दिली आणि तत्कालीन शासनाने ते संरक्षित स्मारक केले.

श्री मोहनलाल झवेरी यांच्या 'प्रगट पार्श्वनाथ' पुस्तकानुसार एक माहिती अशी सांगितली जाते की, अकोल्याजवळील शिरपूर गावात अंतरिक्ष पार्श्वनाथ मंदिर आहे. श्री. चतुर्भूज हे त्याचे इ.स. १९०० च्या दरम्यान व्यवस्थापक होते. त्यांना स्वप्न पडले. त्यात ते जंगलात फिरत असता मोठा काळा नाग त्यांच्या मागे लागला. तो पिच्छा सोडेना तेव्हा त्यांनी त्याच्यापुढे हात जोडले तेव्हा नागाने मागे वळून पाहण्यास सांगितले. चतुर्भुजाने मागे बघितले आणि त्याला सुंदर नगर व त्यात पश्चिममुखी पार्श्वनाथाची मूर्ती दिसली. नागराज म्हणाले, 'हेच ते श्री केशरिया पार्श्वनाथ प्रभूंचे तीर्थस्थळ – भद्रावती होय. या तीर्थाचा उद्धार कर.'

चतुर्भुजाने भद्रावती गाठले आणि तेथे खरोखर चंडिका मंदिराजवळ ६ फूट उंचीची डोक्यावर नागाचा विशाल फणा असलेली प्रभूपार्श्वनाथाची मूर्ती सापडली. ती अर्धपद्मासनात केशरिया वालुकामय दगडाची होती. त्यामुळे या देवतेला 'केशरिया पार्श्वनाथ स्वामी' हे नाव पडले.

ही मूर्ती २३०० वर्षांपूर्वीची असावी. मूर्तीच्या डोक्यावरील सप्तफणा नागाला पाहून नागदेवता असेही संबोधले गेले. चंद्रपूर प्रशासनाने त्या काळात मंदिरासाठी ५० पैसे एकराने २१ एकर जागा दिली आणि १९१२ पासून जीर्णोद्धार सुरू झाला.

जुन्या मंदिरांना तडे गेल्याने २०१३ मध्ये परत जैन संत मंडळींच्या हस्ते मूर्त्यांची नवीन मंदिरात प्राणप्रतिष्ठा केली गेली. आज हे मंदिर अतिशय सुंदर असे झाले आहे. राजस्थानी दगड, संगमरवर आणि एकूणच प्रशस्त असे स्थापत्य पाहण्यासारखे झाले आहे. येथे राहण्याचीही सोय आहे.

## भद्रेश्वर

भद्रावतीला भक्त मंडळी येतात ती मुख्यत्वेकरून भद्रेश्वर आणि भद्रनागाच्या दर्शनाकरिता. भद्रेश्वरावरून भांदकचे नाव 'भद्रक' असे पडले, असे सांगितले जाते. नागपूर–चंद्रपूर या मुख्य मार्गाने भद्रावतीमध्ये प्रवेश केल्यानंतर दक्षिणेस रेल्वे स्टेशनच्या दिशेने किंवा गवराळा मार्गावर चार फर्लांगावर डाव्या बाजूस भद्रेश्वराचे प्राचीन मंदिर आहे. ह्यू–एन–त्संग हा चिनी प्रवासी सातव्या शतकाच्या पूर्वार्धात कौसल यात्रेस आला तेव्हा कौसलवर सोमवंशी महाशिवगुप्त बालार्जून राजा इ.स. ५९५ ते ६५५ पर्यंत राज्य करीत होता. कौसलची उपराजधानी चंद्रपूरच्या उत्तरेस २६ कि.मी. वर असलेले भांदक होय. या महाशिवगुप्ताने भांदक येथील किल्ला बांधला असावा. याच वंशाचा पहिला राजा उदयन याने इ.स. ४८० ते ५०० च्या दरम्यान येथे भद्रेश्वराची स्थापना केली.

भद्रेश्वराचे मंदिर हे महादेवाचे असून कालांतराने पिंड नष्ट झाली, नदीने प्रवाह बदलला असावा किंवा ती नष्ट झाली असावी. वैरागडच्या नागवंशीयांचे राज्य दक्षिण पश्चिमेस भांदकपर्यंत होते. नंतर नागवंशीय माना राजांपैकी एखाद्याने किंवा नागराजांच्या प्रेरणेने या पडक्या देवळाचा जीर्णोद्धार झाला असावा आणि तेथे नागदेवतेची अर्थात भद्रनागाची स्थापना केली असावी. हा काळ नवव्या शतकाच्या आसपासचा असावा.

वरोरा–चिमूर मार्गावर शेगाववरून सालोरी गावापासून उत्तरेस ३ कि.मी.वर भटाळा गाव आहे. तिथे एका तलावाच्या काठावर महादेवाचे, एका बाजूस भवानीचे, गावाबाहेर दगडाने

बांधलेले शिवमंदिर आहे. शिवमंदिरात पाच फूट उंचीची भव्य शिवपिंड आहे. हे ठिकाण श्री भद्रनाग स्वामींचे मूळ वास्तव्याचे ठिकाण होय. नंतर ते भद्रावतीस स्थानापन्न झाले. त्यांची पूर्वाभिमुखी स्वयंभू मूर्ती या भद्रावतीच्या उत्तरमुखी मंदिरात आहे. भाविकांना बाहेरून मुखदर्शनाकरिता प्राचीन काळापासून एक खिडकी आहे. सकाळचे पहिले सूर्यकिरण थेट मूर्तीवर पडतात. हे मंदिर हेमाडपंथी असून ते इ.स. १२०० पूर्वीचे असावे, असे सांगितले जाते.

याच मंदिरात निद्रावस्थेतील एक शेषनागाची मूर्तीही आहे. ही मूर्ती गुप्तकालीन असावी.

मंदिरात कोरीव काम असलेले दगडी खांब आहेत. मात्र आता या गाभाऱ्यात विश्वस्तांनी टाईल्स लावल्याने प्राचीनत्व काहीसे लपत जाते. श्री भद्रनाग स्वामींच्या डोक्यावर चांदीचा मुकुट, समोर पाच फणांच्या नागाची मूर्ती, शिवलिंग आणि गणेशमूर्ती असून याला पंचायतन स्थापना असे म्हणतात.

श्री भद्रनाग स्वामी मंदिराच्या मागे शिवपिंडीच्या आकाराची अखंड खडकात कोरलेली किंवा खोदलेली विहीर आहे. उतरण्यासाठी ५१ पायऱ्या असून या विहिरीत नागदेवतेचा वास आहे, अशी श्रद्धा आहे. विहिरीत तळापासून पाच फुटांवर पाझर नसलेले एक गोल छिद्र असून हा श्री भद्रनाग स्वामी यांच्या येण्याजाण्याचा मार्ग होता असे सांगतात. विहिरीला लागून वर बजरंगबलीचे मंदिर, शिवपिंड, गणेशमूर्ती आहेत.

## भवानीमाता मंदिर

भद्रनाग मंदिराच्या उत्तरेस अगदीच जवळ सध्याच्या सरकारी दवाखान्यासमोर प्राचीन असे भवानीमाता मंदिर आहे. येथे तीन गुंफा असून त्यात चंडिका किंवा भवानी, भैरव व नाथसंप्रदायी शिवाची प्रतिमा आहे. मधल्या काळात दुर्लक्ष झाल्याने हे मंदिर दगडमातीने बुजले होते. काही वर्षांपूर्वी भाविकांनी ते मोकळे केले. हे मंदिर खडकात खोलवर कोरलेले आहे. दक्षिणमुखी भवानी मातेची मूर्ती काळ्या पाषाणाची असून अतिशय सुंदर आहे. या मंदिरासमोर भुयार असून ते थेट चंद्रपूरच्या महाकाली मंदिरापर्यंत गेले आहे, असे सांगतात. जरी ते थेट चंद्रपूरपर्यंत नसले तरी बाजूच्या भद्रनाग मंदिरापर्यंत असू शकते.

अत्यंत प्राचीनतेचे अवशेष असणाऱ्या या शहरात विठ्ठल रुक्मिणी मंदिर, भंगारामा देवी, बालाजी मंदिर, इच्छापूर्ती गणेश मंदिर, चंडिका मंदिर, डोलारा सेतू, यवनाश्व राजाचा किल्ला हे सर्वच पाहण्यासारखे आहे. किल्ल्याच्या पश्चिमेस सूर्यमंदिर किंवा टाका तलाव मंदिर आहे. तिथे काळ्या पाषाणाची प्रतिमा आहे. विजासन नावाच्या तीन पुडाच्या बोगदेवजा लेण्या या गावात असून लेण्याच्या शेवटी भगवान तथागताच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. विवेकानंद शाळेच्या प्रांगणातील नक्षीकाम केलेले सुदंर असे एका चबुतऱ्यावर स्थित चार कोरीव स्तंभ आहेत. त्यावर श्रीराम, विष्णू, ब्रह्मदेव इत्यादी देवतांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. पूर्वी येथे मंदिर असावे. चंडिका मंदिरासमोरही असे स्तंभ आहेत. पंचशील वार्डाला लागून नवीन बसस्थानकाच्या

दक्षिणपश्चिमेस सुंदर असा डोलारा तलाव आहे. त्यावर कठडा नसलेला एक दगडी पूल आहे. मध्यभागी असलेल्या हुडकीपर्यंत ३२ खांबांवर तो उभा आहे. पावसाळ्यात तो पाण्यावर तरंगत आहे, असा भास होतो. हुडकीवर शंकराचे मंदिर होते व ते कालांतराने नष्ट झाल्याचे सांगितले जाते. त्याचे काही अवशेष आहेत. यवनाश्व राजाचे घोडपेठला असलेल्या घोडपागेतले घोडे येथे या पुलावरून पाणी पिण्यास येत अशी आख्यायिका आहे.

उद्ध्वस्त झालेला यवनाश्व राजाचा किल्ला येथील किल्ला वार्डात आहे. चिनी प्रवासी ह्यू–एन्–त्संग सातव्या शतकाच्या सुरुवातीला आला तेव्हा कौसलवर सोमवंशी महाशिवगुप्त बालार्जुन राजा राज्य करीत होता. हा कालखंड इ.स. ५९५ ते ६५५ असावा. याच महाशिवगुप्ताने हा किल्ला बांधला असावा. आज येथे पूर्वाभिमुखी मोठे द्वार, एक ३६ पायऱ्या असलेली विहीर, मंदिराच्या दर्शनीद्वाराप्रमाणे इतर तीन द्वारे असे काही अवशेष आहे. पुरातत्व विभागाने हे संरक्षित स्मारक केले असून काही भिंती उभारल्या आहेत.

भद्रावतीत आणखी एक चंडिका मंदिर असून ते जैन मंदिराच्या मागील बाजूस पंचशील नगरात आहे. हेमाडपंथी १६ कोरीव खांबांवर ते उभे आहे. परिसरात काही भग्न मूर्ती व अवशेष आहेत. पुरातत्व विभागाने हे संरक्षित केले असून इ.स. १९०० च्या दरम्यान चंद्रपूरचे स्कॉटिश मिशनचे पादरी फेरफटका मारत असता त्यांना ते दिसले होते. मंदिरासमोर मोठा चबुतरा असून त्यावर चार स्तंभ आहेत. उत्तरेला एक छोटे तळेही आहे.

एकंदरीत भद्रावती प्राचीन मौलिक ठेवा असलेले शहर असून येथे येणाऱ्याने जास्तीत जास्त वास्तू पाहाव्यात. सर्व शक्य न झाल्यास भद्रेश्वराचे मंदिर, श्री केशरिया पार्श्वनाथ जैन मंदिर आणि गवराळा येथील वैदर्भीय अष्टविनायकातील श्री वरदविनायकाचे मंदिर मात्र न चुकता पाहावे.

# श्री चिंतामणी, कळंब

श्री गणेशपुराणात अखंड भारतातील एकवीस गणेशस्थाने वर्णिली आहेत, त्यातील एक स्थान म्हणजे विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील श्री चिंतामणी कळंब. पश्चिम महाराष्ट्रात ज्या गणेशमूर्तींची अष्टविनायकात नावे आहेत, त्यात ही कळंबनगरीची मूर्ती नाही; परंतु अठरा पुराणांपैकी आठव्या शतकात भृगू ऋषींनी रचलेल्या गणेशपुराणात आणि त्यानंतर मुद्‌गल ऋषींच्या मुद्‌गलपुराणात या गणपतीच्या स्थापनेच्या आणि महात्म्याच्या कथा आलेल्या आहेत. त्यावरून या गणेशस्थानाचं प्राचीनत्व इंद्रकाळात पोचतं. पौराणिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेले हे एक देवस्थान. पूर्वी श्री क्षेत्र चिंतामणी म्हणून ओळखली जाणारी ही कदंबनगरी म्हणजे आजचे कळंब.

यवतमाळपासून वर्धा—नागपूरच्या दिशेने राज्य महामार्ग क्रमांक ७ अ वर तेवीस किलोमीटर अंतरावर कळंब आहे. नागपूरवरून कळंबचे अंतर १२० कि.मी. आहे.

## या क्षेत्रासंबंधी काही कथा व इतिहास

श्री चिंतामणी स्वयंभू आहेत, असे मानणाऱ्या भक्तांची संख्या मोठी आहे. ह्या मंदिरातील मूर्तीची स्थापना साक्षात कदंबऋषींनी केली असेही श्रद्धाळू मानतात.

या गणेशमूर्तीच्या स्थापनेबाबत गणेशपुराणातील कथा अशी की ब्रह्मदेवाची सुस्वरूप कन्या अहिल्या हिच्या सौंदर्यावर

भाळून देव, दानव, यक्ष, किन्नर, गंधर्व, नाग, राक्षस, ऋषी, मुनी इत्यादी सगळेच तिची अभिलाषा धरून ब्रह्मदेवाकडे मागणी करू लागले. ब्रह्मदेवांनी अहिल्येच्या विवाहासाठी 'पण' जाहीर केला, की जो कोणी पृथ्वीप्रदक्षिणा करून सर्वात आधी सभामंडपात पोचेल, त्यालाच अहिल्या पत्नी म्हणून प्राप्त होईल. 'पण' ऐकताच सगळेच आपापल्या वाहनाने पृथ्वीप्रदक्षिणा करण्यास त्वरेने निघाले. आर्यावर्तातील गौतम ऋषींनाही अहिल्येच्या प्राप्तीची इच्छा होती. त्यांनी गंगेवर जाऊन शुद्धोदक स्नान केले आणि आश्रमातील प्रसूतशील गाईला मनोभावे प्रदक्षिणा घातली. त्यानंतर स्वत:भोवती एक गिरकी घेऊन ते ब्रह्मदेवासमोर उभे ठाकले. त्यांनी लगेच अहिल्येची मागणी केली. आपल्या बुद्धिचातुर्याने शास्त्रार्थ विशद करून अर्धप्रसूत गाईस प्रदक्षिणा घालणाऱ्याला पृथ्वीप्रदक्षिणेचे पुण्य लाभते, तसेच सगळे विश्व आपल्यातच सामावलेले असल्यामुळे स्वत:भोवती गिरकी घेऊन विश्वप्रदक्षिणा पार पडते, हे त्यांनी सभामंडपातील सर्वांना पटवून दिले. ब्रह्मदेवांनी ते मान्य करून अहिल्येचा गौतमाशी विवाह लावून दिला. त्यानंतर लगेच धावपळ करत इंद्रदेव सभामंडपात इतर सर्वांच्या आधी पोचले; पण येताच अहिल्या गौतमांशी विवाहबद्ध झाल्याचे पाहून ते संतप्त झाले. 'कपटाने का होईना, मी अहिल्या मिळवीनच', असा निश्चय त्यांनी केला.

पुढे एके दिवशी गौतम ऋषी स्नानसंध्या करण्यासाठी नदीवर गेले असता इंद्राने गौतमवेशात त्यांच्या आश्रमात जाऊन अहिल्येशी जारकर्म केले. गुपचूप चोरपावलांनी इंद्रदेव आश्रमाबाहेर पडत असताना गौतमांनी पाहिले आणि परिस्थितीची जाणीव

होताच त्यांनी शाप दिला की 'तुझ्या शरीराला सहस्र भगे पडतील आणि तू विद्रूप कुष्ठरोगी होशील.' नकळत अहिल्येनेही हे पाप केल्याने तिलाही 'तू शिळा होऊन पडशील' असा शाप त्यांनी दिला.

कुष्ठाने पीडित इंद्र लज्जित झाल्यामुळे देवलोकांत गेला नाही. देवांच्या राजाची ही अवस्था पाहून देवगुरू बृहस्पती इंद्राला घेऊन गौतमाकडे गेले आणि त्यांची क्षमा मागितली. गौतमांनी उःशाप दिला की 'कदंबनगरीत जाऊन गणेशाच्या षडाक्षरी मंत्राचा जप कर.' त्याप्रमाणे भगांकित इंद्राने बारा वर्षे कदंब वृक्षाखाली बसून तपश्चर्या केली. भगवान श्री गणेश प्रसन्न झाले. त्यांनी अंकुशाने त्या ठिकाणी एक कुंड निर्माण केले व स्वर्गीची गंगा त्या कुंडात प्रवाहित केली. त्या गंगाजलाने स्नान केल्यावर इंद्राची त्वचा पूर्ववत सुकुमार नितळ झाली. त्याचे शरीर अधिक तेजःपुंज झाले पुन्हा स्वर्गातील देवाधिदेव म्हणून त्याला मान्यता मिळाली.

ज्याच्या कृपेने इंद्राला पूर्वपद लाभले, त्याच्या स्फटिकवत् अंगुष्ठमात्र मूर्तीची स्थापना इंद्राने तपश्चर्येच्या जागीच केली, तीच ही गणेशमूर्ती — श्री चिंतामणी. भक्तांच्या चित्तातील इच्छा पूर्ण करणारा — श्री गजानन. त्याची स्थापना अशी प्राचीन काळात झालेली आहे. नंतरच्या काळात भाविक भक्तांनी चढवलेल्या शेंदूरलेपनामुळे मूळ मूर्तीचे स्वरूप बदलले; परंतु ती मूळ मूर्ती स्फटिकवत आणि अंगुष्ठमात्र होती, हे फक्त पुराणातील कथेतूनच कळते.

जसे श्री क्षेत्र चिंतामणीचे धार्मिक आणि पौराणिक महत्त्व आहे, तसेच कळंब या गावाला इतिहासही आहे. इ.स. २५० ते

५१० या काळात कळंब परिसरात वाकाटकांचे राज्य होते. कळंब हे तेव्हा प्रमुख ठाणे होते. येथे काही काळ यादवांचीही सत्ता होती. २०१२–१३ मध्ये एक गढी जमीनदोस्त केली गेली. अजून काही भाग आहे. गढीची बांधणी यादवकालीन आहे. एका खोदकामात यादवकालीन सोन्याची नाणी मिळाली होती. ती नागपूरच्या वस्तूसंग्रहालयात आहे.

तेराव्या शतकात बहामनी आणि इस्लामच्या आक्रमणाचे व गोंडांनी दिलेल्या झुंजीचे दाखले मिळतात. कळंब आणि माहूर ही दोन्ही गडस्थाने प्रतिकारार्थ झटली आणि ही दोनच ठिकाणे घेण्याचा शत्रूचा प्रयत्न झाला. येथे चांद्याच्या गोंड राजांची सत्ताही होती. परकीयांशी लढताना हजारो गोंड व अन्य आदिवासींनी येथे बलिदान दिले.'जय ठाकरी' या नावाने ती स्मृती आजही गोंड आदिवासींमध्ये कथादिकांच्या दृष्टीने प्रचलित आहे. तो एक उत्सव आजही त्यांच्यामध्ये सुरू आहे. गोंडांचा एक राजा बाबजीबुवा कळंब येथे मरण पावला. त्याची समाधी नदीकाठी बांधली आहे. या भागातील हजारो साधूंनी शत्रूशी लढा दिल्याच्या नोंदीही आढळतात.

औरंगजेबाच्या काळात चांदबिबीची सत्ता येथे होती. त्यापूर्वीच्या कालखंडातील 'आईने अकबरी'त कळंब परिसरात हिऱ्याच्या खाणी होत्या, इसवीसन १४२८ मध्ये सुलतान वलीशहाने आक्रमण करून हिऱ्यांच्या खाणीवर कब्जा मिळवल्याची नोंद आहे. अकबराच्या काळात 'सरकार' म्हणजे जिल्हे पाडण्यात आले. अशा तेरा जिल्ह्यांपैकी कळंब हा एक जिल्हा होता. या जिल्ह्यात एकोणवीस रेव्हेन्यू सर्कल्स म्हणजे

महसुली ठाणी होती. दक्षिणेकडे माहूर, उत्तरेकडे पवनार, पश्चिमेकडे वाशिम हे जिल्हे कळंब जिल्ह्याच्या सीमाभागी होते. आजच्या यवतमाळ जिल्ह्याचा बराचसा भाग तेव्हा कळंब जिल्ह्यात अंतुर्भूत होता.

इ.स. १५९९ मध्ये अहमदनगरचा बुऱ्हाण निजामशहा याची कारकीर्द येथे होती, असे एका रोहिल्याच्या घरात खोदकाम करताना सापडलेल्या चिऱ्यावरील मजकुरावरून लक्षात येते. त्यावर लेख कोरला आहे —

'दर जमाने हजरती बुऱ्हाण निजास्यासु ।
अलफ वाट सालवड डावी नाचण गावू ।।'

बुऱ्हाण निजामशहाच्या कारकिर्दीत जे लष्कर येथे आले होते, त्या लष्कराला किंवा वाटसरूंना वाट दाखवण्याकरिता अथवा सोयीसाठी जेथे सालोडफकीर (सध्याचे विजयगोपाल) आणि नाचणगावसाठी रस्ता फुटतो, तेथे हा चिरा बसवला असावा. त्यावरचा मजकूर फारशीत असून खाली अर्धा भाग बाळबोध लिपीत आहे. तो नीट वाचता येत नाही. हा चिरा आता नागपूरच्या संग्रहालयात आहे.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे राज्य या भागात आले. शाहूराजाने ते वाढविले. परसोजी भोसले यांनी आपले वर्चस्व वाढवून गाविलगड, नर्नाळा, खेरडा, माहूर व कळंब या गडभागाच्या परिसरात आपली सत्ता प्रस्थापित केली. भोसले जेव्हा पश्चिम दिशेने विदर्भाकडे आले, तेव्हा यवतमाळच्या दक्षिणेकडील भांब येथील गढीवर व नंतर कळंब येथे थांबल्याचे दिसते. रघूजी भोसले राजांनी कळंबवर राज्य केले, असे सांगितले

जाते. रघूजीच्या मुलीने लग्नाच्या आंदणात मागितलेल्या गावांत कळंबचा समावेश केलेला बापाला आवडला नाही. राजाने तिच्या तोंडावर हात ठेवून चूप केले, अशी काव्यमय रचना एका कथेत आहे.

इंग्रज येण्यापूर्वी कळंबवर निजामी राजवट होती. इ.स. १८४९ मध्ये नागपूरकर भोसल्यांनी कळंब परिसरातील टेकड्यांच्या आश्रयाने चार हजार सैनिकांसह इंग्रजांना झुलवले होते, प्रखर लढा दिला होता. इ.स. १८५७ च्या बंडाच्या वेळीही कळंब विभाग सक्रिय होता, याचे पुरावे सापडतात. देशभक्त राजगुरू येथेच भूमिगत होते, असेही इतिहासात नमूद केले आहे. राजगुरूंनी येथील चिंतामणी मंदिरातच गुप्त बैठक घेतली होती.

कळंब परिसराचा आणखी एक प्राचीन पुरावा म्हणजे अमरावती जिल्ह्यातील ऋद्धिपूर येथे सापडलेला ताम्रपट होय. हा ताम्रपट वाकाटककालीन आहे.

कोलाम, गोंड, परधान, आंध, माना, गोवारी, हलबी आदी आदिवासींचे वैपुल्य असलेला हा भूभाग आदिवासी राजांच्या ताब्यात होता. कळंबचा चिंतामणीच नव्हे तर मूळातच गणपती हा प्रथम आदिवासींची व ग्रामीणांची देवता मानली जाते. तेव्हा आदिवासीबहूल कळंब येथे श्री गणेशाचे प्राचीन मंदिर असणे आश्चर्य म्हणता येणार नाही. पूर्वी श्री चिंतामणी मंदिराची देखभाल आदिवासींनी केली असावी.

## गृत्समद ऋषी

चिंतामणी मंदिरातील कुंडातील पाण्याने आजच्या घडीला जरी चर्मरोग बरा झाल्याचा अनुभव कुणी सांगत नसले तरी

मुद्गलपुराणात राजा रुक्मांगदाचा कुष्ठरोग बरा झाल्याची कथा आहे. इंद्रकथेशी या कथेचे साम्य आहे. रुक्मांगदाच्या कथेतून या कळंबनगरीत जन्मलेले, वास्तव्य केलेले व आपल्या अनेक शोधांनी नावलौकिक मिळविलेले गणपतीचे निस्सीम भक्त गृत्समद ऋषी यांची माहिती आपल्याला मिळते. गृत्समदांचा काळ हा सुमारे वीस हजार वर्षांपूर्वीचा गणला जातो.

या भूमीत वाचनकवी नावाचे एक अत्यंत प्रतिभासंपन्न ऋषी वास्तव्य करून होते. सौंदर्याची मूर्तीमंत पुतळी म्हणजे वाचनकवींची पत्नी मुकुंदा. एकदा कुंडीनपूरचा राजा रुक्मांगद शिकार करण्यासाठी या कदंबवनात आला होता. मध्यान्हीच्या सांजसंध्याकर्मासाठी वाचनकवी ऋषी नदीच्या तीर्थावर गेले होते. उन्हात फिरून दमलेल्या रुक्मांगदाला तहान लागली, म्हणून तो आश्रमात आला. पाणी देण्यासाठी समोर आलेली ऋषीपत्नी मुकुंदा राजाच्या रूपावर भाळली. आपली कामवासना तृप्त करावी, म्हणून तिने रुक्मांगदाला गळ घातली. सच्चरित्र रुक्मांगद पाणी न पिता ताबडतोब तिला अव्हेरून निघून गेला. कामाग्नीने विव्हळ झालेल्या मुकुंदेने त्याला 'तू कुष्ठरोगी होशील' असा शाप दिला आणि राजाचे शरीर कुष्ठाने विद्रूप झाले. राजाने कर्मगतीला दोष देत तिची विकृत इच्छा पूर्ण न करता तेथून गमन केले. निराशावस्थेत तो जंगलात फिरत असता नारदांनी त्याला श्री चिंतामणी मंदिरातील गणेशकुंडातील जलाने स्नान केल्याने कुष्ठरोग दूर होईल, असे सांगितले. त्याप्रमाणे राजा रुक्मांगदाने स्नान केल्यावर त्याची काया पूर्ववत तेज:पुंज आणि नितळ झाली.

इकडे कामवासना अनावर झालेल्या मुकुंदेला पाहून एका अलौकिक व्यक्तीच्या जन्माचा मुहूर्त आहे, हे ध्यानात घेऊन इंद्राने रुक्मांगदाचे रूप घेऊन फसविले आणि तिचा उपभोग घेतला. मुकुंदेच्या ठायी बीजारोपण झाले. महर्षी वाचनकवी यांना हे काहीच माहीत नव्हते. योग्य समयी मुकुंदेला पुत्र झाला. त्याचे नाव गृत्समद ठेवले. तरुणपणी अत्यंत तल्लख बुद्धीचे गृत्समद — वाचनकवी आणि मुकुंदेचे पुत्र — मगध देशात गेले. तेथे आपल्या अप्रतिहत बुद्धिसामर्थ्याने वादविवादाकरिता जमलेल्या सर्व ऋषीमुनींचा त्यांनी पराभव केला. त्यांचे हे यश अत्री ऋषींना सहन झाले नाही. ते छद्मीपणाने गृत्समदांना म्हणाले, 'तू ऋषीपुत्र नाहीस. क्षत्रिय राजा रुक्मांगदाचा तू पुत्र आहेस. तुला वादविवादाचा अधिकारच नाही.' या वक्तव्याने घायाळ झालेले गृत्समद आपल्या मातेकडे येऊन तिला जन्माचे रहस्य विचारू लागले. मुलाच्या विद्वत्तेबद्दल अभिमान असलेल्या मुकुंदेने खरी हकिकत सांगितली. रुक्मांगदाच्या रूपात आलेल्या इंद्रदेवाच्या समागमातून हा पुत्र झाला आहे, हे तिलाही माहीत नव्हते. मात्र स्वजन्माची कहाणी मातेच्या मुखातून ऐकल्यावर तरुण गृत्समदाने देहत्यागाचा विचार पक्का केला. मातेला त्यांनी शाप दिला, 'तू जन्मानुजन्म कंटकीवृक्ष होशील, तुझ्या सहवासात कोणताही पक्षी राहणार नाही.' त्याच वेळी आकाशवाणी झाली की, 'गृत्समदा, तू रुक्मांगदपुत्र नसून देवाधिदेव इंद्राचा पुत्र आहेस. तू श्री गणेशाची आराधना कर. तुझा सर्व मानसन्मान तुला परत मिळेल.' मातेवर नाराज असलेले महर्षी गृत्समद विदर्भापासून दूर पुण्याजवळ आठ

किलोमीटर अंतरावर असलेल्या थेऊर गावी गेले व तेथे त्यांनी अनुष्ठान मांडले.

'गणानां त्वां गणपतिं हवामहे' या मंत्राचे पुरश्चरण करून त्यांनी बारा वर्षे तपश्चर्या केली. त्या ठिकाणी भगवान गणेश प्रकट होऊन त्यांनी गृत्समदांना अनेक वरदाने दिली. जपास बसलेल्या जागेसमोरच गृत्समदांनी श्री चिंतामणीची स्थापना केली. म्हणूनच थेऊरचा गणपती 'चिंतामणी' नावाने महाराष्ट्रातील अष्टविनायकांत द्वितीय क्रमांकाचा मानला जातो.

त्यानंतर गृत्समद ऋषींना सर्वत्र मानसन्मान मिळू लागला. ते लगेच आपली जन्मभूमी कळंब येथे आले. ऋग्वेदातील दुसरे मंडल लेखनाचा मान त्यांचाच आहे. विदर्भातील जनता दरित्री आहे, ह्याचे कारण ती आळशी आहे, हे जाणून त्यांनी वैदर्भीय जनतेला एक मोलाचा सल्ला दिला. 'मा अहं अन्य कृतेन भोजयेयम्' म्हणजेच 'मी दुसऱ्याच्या कष्टावर जगणार नाही. स्वावलंबनाने स्वत:चे भोजन करीन. कष्टाशिवाय काळ घालविणार नाही', अशी श्रमाची प्रतिष्ठा त्यांनी जनतेला समजावून सांगितली.

एक थोर संशोधक म्हणूनही त्यांना कीर्ती लाभली आहे. गृत्समद हे विज्ञानवादी, गणिततज्ञ, कृषी संशोधक होते. पुरातन काळी भूभाग हा जंगलांनी व्यापलेला होता. क्वचितच मानवी वस्ती आढळायची. त्या छोट्याशा कळंबच्या वस्तीत गृत्समदांनी कापसाचा शोध लावला. आज आपण विदर्भाला कापसाचे भंडार म्हणून ओळखतो. या कापसाचा शोध लावल्यानंतर त्यांनी त्यापासून तंतू किंवा धागा निर्माण करण्याचा शोध लावला. कापसाचा धागा पक्का कसा निघेल आणि त्यापासून वस्त्र कसे

विणता येईल, यासाठी गृत्समदांनी १२ वर्षे सतत प्रयत्न आणि परिश्रम केले. जगात सर्वप्रथम कापूस लागवड गृत्समदांनीच केली. कापसापासून सूत काढणे आणि सुताचे कापड विणणे हे सर्व शोध त्यांनीच जगाला दिले. आजही कळंब परिसरातील जमीन कापूस उत्पादनाच्या दृष्टीने फारशी सुपीक नसतानाही या भागात भरपूर प्रमाणात कापूस उत्पादन होते. मात्र कापूसउत्पादक, संत्राउत्पादकांच्या बाबतीत शासनाची उदासीनता आणि शेतकऱ्यांच्या फायद्याच्या कुठल्याही योजना नसल्याने येथील शेतकरी सोयाबिनकडे वळत चालला आहे.

गणितातील गुणाकार, भागाकाराची कल्पना सर्वप्रथम गृत्समद ऋषींनीच मांडली. तत्पूर्वी बेरीज व वजाबाकी या दोनच क्रिया होत्या. बेरजेच्या तत्त्वाचे उन्नत रूप म्हणजे गुणाकार तर वजाबाकीच्या प्रक्रियेचे सुलभ रूप भागाकार होय, हे दाखवून गृत्समद ऋषींनी गणिती क्रांती केली. दुसऱ्याच्या श्रमांवर जगणे गृत्समदांना मान्य नव्हते. लोक व्यवहाराला सुलभ व्हावे, या दृष्टीने त्यांनी सतत चिंतन केले. कदाचित त्यातूनच पुढे गुणाकाराचा शोध आणि दोनपासून नऊपर्यंत पाढे निर्माण करण्यात त्यांना यश आले. ज्या दिवशी हा शोध त्यांना लागला, त्या दिवशी ते आनंदाने नाचू लागले. त्या भावनिक वेगामध्येच त्यांनी पाढ्याच्या रूपामध्ये इंद्रदेवाचे आवाहन केले.

'आ द्वाभ्यां हरिभ्यामिंद्र याहि,
आ चतुर्भिरा षड्भिर हूयमानः'

'हे इंद्रा, तुम्ही दोन घोड्यांच्या, चार घोड्यांच्या, सहा घोड्यांच्या रथावर बसून अतिवेगाने या.'

स्त्रियांच्या गर्भावर शुक्लपक्ष आणि वद्यपक्षातील चंद्रकिरणांचा वेगवेगळा प्रभाव पडतो, हेही गृत्समदांनीच शोधून काढले. स्त्रियांच्या गर्भावर चंद्राचा परिणाम होतो, असे म्हणण्यापेक्षा चंद्राच्या प्रकाशातच गर्भाची वाढ होते, असे त्यांनी पटवून दिले. चंद्र कलेकलेने वाढतो. गर्भातील जीवाला सूर्यप्रकाशाच्या दाहकतेपासून चंद्राचे शीतल किरणच रक्षण करीत असावेत, असे सांगताना गृत्समद पौर्णिमेला उद्देशून म्हणतात,

'ददातु वीरं शतदायं उक्थम्'

'हे पौर्णिमे, शतपटीने देणारा पराक्रमशील आणि प्रशंसनीय असा सेवक दे.'

ऋग्वेदामध्ये एकूण १० मंडल आहेत. त्यातील द्वितीय मंडलाचे कर्ते गृत्समद ऋषी आहेत. या मंडलात ४३ सूक्त आणि ४०० च्यावर मंत्र आहेत.

'गणानां त्वा गणपतिं हवामहे,
कविं कवीनांमुपश्रवस्तम्,
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणपस्ते,
आ नः शृण्वन्नूतिभिः सीद सादनम्'

हा मंत्र गृत्समद ऋषींनी रचला आहे. या मंत्रात ते म्हणतात, 'हे बृहस्पते, आपण सर्वगणांचे गणपती म्हणजे गणांचे प्रमुख आहात, सर्व कवींमध्ये श्रेष्ठ आहात.' बृहस्पती हे वाणीचे अधिदैवत आहे. म्हणजे बृहस्पती एका अर्थाने गणपतीच आहेत. !कार शब्द ब्रह्मवाचक आहे. ब्रह्मणस्पती म्हणजे वाङ्मयाची किंवा साहित्याची देवता, असे उपनिषदकारांचे म्हणणे आहे. कदाचित

म्हणूनच गणपतीची मूर्ती ही !काराच्या आकाराची घडविली असावी, असे वाटते.

गृत्समद ऋषी आणि जैनांचे प्रथम तीर्थंकर ऋषभदेव यांची भेट घडून आल्याचे उल्लेख आढळतात. ऋषभदेव गृत्समदांच्या कुटीत दोन दिवस वास्तव्यास होते, त्या दोन दिवसांत त्यांच्या बऱ्याच अध्यात्मिक चर्चा झाल्याची नोंद आढळते.

असे हे अलौकिक व्यक्तिमत्त्व श्री गृत्समद ऋषी यांची कळंब ही जन्मभूमी तसेच कर्मभूमी आहे. याच गृत्समद ऋषींचे मिळतेजुळते कथानक भद्रावतीक्षेत्री सांगितले जाते व भद्रावतीच्या वरदविनायकाची स्थापना त्यांनी केली, अशीही आख्यायिका आहे.

## मूर्ती, मंदिर व परिसर

कळंबच्या आजूबाजूला डोंगरांचा परिसर आहे. चक्रावती नदीच्या काठावर कळंब गाव वसले आहे. कळंबच्या चक्राकार फिरण्याने तिला चक्रावती म्हटले गेले असावे. दत्तनाला आणि चक्रावतीचा संगम येथे झाला आहे. कळंब बसस्टँडवरून उत्तर दिशेला सुमारे एक फर्लांग अंतरावर श्री चिंतामणी मंदिर आहे. जमीन सपाटीपासून सुमारे पस्तीस फूट खोल जागेत हे मंदिर असल्यामुळे दुरून कळसही दिसत नाही. जवळ पोचल्यावर रस्त्यावर उभे राहिले असता मंदिराच्या प्रवेशद्वाराऐवजी कळस दिसतो. मंदिराचा संपूर्ण परिसर बाहेरून शिवपिंडीप्रमाणे भासतो. तत्कालीन शिल्पकारांनी ही रचना अत्यंत कल्पकतेने केली असावी.

या हेमाडपंथी मंदिरात प्रवेशासाठी तसे तीन मार्ग आहेत. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर समोरच चतुर्मुखी गणेशमूर्ती दिसते. एकाच दगडात चारही दिशेला गणेशमुखे असून त्यांचे हात एकमेकांत मिसळलेले आहेत. ही मूर्ती गावाच्या उत्तरेकडे प्राचीन गढीत खोदकाम करताना सापडली होती. या मूर्तीच्या पुढ्यात भव्य सभामंडप आहे. त्याची निर्मिती स्व. नारायणराव राजहंस उर्फ बालगंधर्वांनी केली आहे. यवतमाळ येथे त्या काळात झालेल्या त्यांच्या एका कार्यक्रमाचे सगळे उत्पन्न त्यांनी या मंदिरास दिले. त्यांचे औदार्य पाहून भगवान भिकू नावाच्या गवंड्याने कुठलाही मोबदला न घेता हा सभामंडप बालगंधर्वांच्या देणगीतून बांधून दिला. मंदिरात उतरण्याच्या पहिल्याच पायरीवर संगमरवरी फरशी बसवलेली होती. त्यावर सौ. जनाबाई मा. मांडवकर यांनी मंदिरास ३०–७–१९५७ रोजी ३०१ रुपयांची देणगी दिल्याचे कोरले आहे. ही मंदिराची पहिलीवहिली मोठी देणगी. पूर्वी सर्व भक्ताचे पाय त्यावर पडत असल्याने ती आता प्रवेशद्वाराजवळ डावीकडे भिंतीवर बसवली आहे.

प्रवेशद्वारातून आत डाव्या बाजूला या चतुर्मुखी गणपतीपासून एकोणतीस पायऱ्या उतरल्यावर समोर बाहेरून अष्टकोनी व आतून चौकोनी असे कुंड आहे. त्याला श्रीगणेश कुंड असे म्हणतात. इंद्र आणि अन्य असंख्य भक्तांचा कुष्ठरोग दूर करणारे हे महातीर्थ असलेले कुंड. हे कुंड म्हणजे एकप्रकारची निमुळती विहीरच आहे. गणेशकुंडासमोरील गाभाऱ्यात श्री चिंतामणीची मूर्ती आहे. दक्षिणाभिमुख असलेली ही गणेशमूर्ती

भारतातच नव्हे तर जगातही एकमेव असावी. कदाचित इंद्रदेव तपश्चर्येला उत्तरेकडे तोंड करून बसले असावे, त्यांच्यासमोर श्रीगणेश प्रगटले असावे, म्हणून गणेशमूर्तीचे तोंड दक्षिणेकडे असावे. या मूर्तीला चार हात, गजमुख आणि शूर्पकर्ण आहेत. शेंदूरलेपनाने मूर्तीचे नीट आकलन होत नाही. डाव्या सोंडेच्या या गणेशाचा मुकूट अंगचा असावा. भालप्रदेश विशाल आहे. डोळे बारीक आणि तेजस्वी आहेत. डावा पाय दुमडला असून श्री गणेश सुखासनात विराजमान आहेत. प्रतिमा पाहताच मन प्रसन्न होते.

या गणेश मूर्तीच्या दोन्ही बाजूला दोन स्वतंत्र ओवऱ्यांत शंकराच्या पिंडी आहेत. शिवाय नग्नभैरव शिवपिंडही आहे. बालगणेशाच्या दोन मूर्तीही आहेत. चिंतामणी मंदिरातील नंदादीप अखंड तेवत असतो.

सिंदूरलेपनामुळे वाढलेल्या आकारात श्री चिंतामणीची मूर्ती सुमारे चार फूट उंच आणि तितकीच रूंद होत चालली होती. १ फेब्रुवारी, १९९८ रोजी श्रीगणेश जयंतीला (चतुर्थी) चिंतामणी मूर्तीची खोळ सुटू लागली. माघ शुद्ध पंचमीला मूर्तीची खोळ पडू लागल्याचे भाविकांच्या लक्षात आले; परंतु दुसऱ्याच दिवशी षष्ठीला काला व्हायचा असल्याने आणि विनायकी चतुर्थीपासून दर्शनार्थींची यात्रेनिमित्त गर्दी होणार असल्यामुळे मूर्तीभोवती खोळ बांधून ठेवण्यात आली होती. षष्ठीची यात्रा संपल्यानंतर सप्तमीला वेडीवाकडी झालेली खोळ निघेल तेवढी काढून घेण्यात आली. त्यानंतर एकशे एक सुवासिनींच्या हस्ते कलशस्नान घालून पुन्हा शास्त्रोक्त विधी करून चिंतामणीला शेंदूराचे पुनर्लेपन केले गेले.

खोळ काढल्यानंतरची मूर्ती आधीच्या मूर्तीच्या तुलनेत जवळपास निम्म्या आकाराची दिसू लागली होती. तत्पूर्वी चिंतामणीची खोळ केव्हा पडली याची माहिती उपलब्ध नाही; परंतु किमान सव्वाशे वर्षांत ती पडली नसावी, असे वयोवृद्ध नागरिकांच्या मतांवरून लक्षात येते.

पुराणांतील वर्णनावरून श्री चिंतामणीची मूर्ती स्फटिकासारखी शुभ्र होती. पुढे ती शेंदूरलेपनाने शेंदरी वर्णाची झाली असावी किंवा परचक्राच्या वेळी मूळ मूर्ती लपवून दुसरीकडे लपवून ठेवण्यात आली असावी, असेही एक मत मांडले जाते.

मंदिरातच श्री चिंतामणी मूर्तीच्या उत्तरेला सिमेंटविटांनी व्यवस्थित बांधून काढलेले जे गणेशकुंड आहे, ते इंद्राच्या काळातील असावे, अशी श्रद्धा ठेवून भक्त ह्या गणेशकुंडातील पाणी गंगेचे तीर्थ म्हणून प्राशन करायचे. ४ फूट बाय ४ फूट असा त्याचा आकार आहे. गणेशकुंडात पायऱ्या आहेत. हे कुंड पुष्करिणी असावे, असे वाटते. मुख्य गाभाऱ्यासमोरील ज्या प्रांगणात ते आहे, त्या प्रांगणाचा आकार १५ बाय २० फूट आहे. या प्रांगणाच्या बाजूला दोन्ही बाजूंना १० बाय १२ फुटांच्या दोन ओवऱ्या आहेत. हे पूर्वी ध्यान कक्ष असावेत. डाव्या हाताच्या ओवरीत देवी गायत्री, श्री विठ्ठल रुक्मिणी व श्री ज्ञानेश्वरांच्या मूर्ती आहेत. एक ओवरी रिक्त आहे.

श्री चिंतामणी मंदिर हेमाडपंथी असून सातव्या किंवा आठव्या शतकात चालुक्य किंवा द्रविडी शैलीच्या प्रभावकाळात निर्माण झाले आहे. राष्ट्रकुट राजांनी वेरुळचे कैलास लेणे याच काळात बांधले. त्याचाच काहीसा प्रभाव या मंदिरावर जाणवतो.

पाचव्या किंवा सहाव्या शतकात तांत्रिक भक्ती पंथाचा उदय झाला. मंदिराची रचना पाहता त्या पंथाचाही प्रभाव या शैलीवर दिसतो. तसेच मंदिराचे शिल्प हे श्री यंत्राप्रमाणे आहे. श्रीयंत्राला चार द्वारे असतात. येथे चौथ्या द्वाराच्या ठिकाणी स्वत: श्री गणेश आहेत.श्री गणेशाला प्रदक्षिणा घालता येत नाही. जलतत्त्वाची देवता श्री गणेश असल्याने श्री गणेश कुंडालाच प्रदक्षिणा घातल्या जाते. तंत्र, मंत्र आणि यंत्र यांचा संगमच येथे आढळतो.

या देवालयाचा जीर्णोद्धार १२ व्या किंवा १३ व्या शतकात यादवांच्या काळात झाला असावा. दोन्ही बाजूंना ज्या दगडी भिंती आहेत, त्याचे चिरे काळ्या वालुकामय पाषाणाचे आहेत. त्याच्या आत मूळ भिंती असाव्यात व त्या पडू नयेत म्हणून ही योजना केली असावी. डॉ. पु.नि. फडके यांच्या मते या पाताळगुंफा महापाषाणयुगीन असाव्यात. म्हणजेच सुमारे इ.स.पू. ७०० ते इ.स.पू. ५०० इतक्या प्राचीन असाव्यात. म्हणजे अडीच हजार वर्षांपूर्वीच्या. महाभारत काळापर्यंत मागे या मंदिराची प्राचीनता नेली जाते. त्यानंतर केव्हातरी येथे श्री गणेश प्रतिमा स्थापन झाली असावी. अशा गुंफा भद्रावतीच्या नागनाथ मंदिरात, मध्यप्रदेशातील बैतूल येथे, बलढाण्यातील चांडोल येथे, नागपूर जिल्ह्यातील भुयारी येथे आहेत.

## अन्यत्र श्रीचिंतामणी कथासाम्य

जसे यवतमाळ जिल्ह्यातील कळंबबद्दल सांगितले जाते, तसेच उस्मानाबादमधील कळंबबद्दलही सांगितले जाते. तेथेही कळंबची प्रतिकृती वाटावी, असे चिंतामणी मंदिर आहे.

भारताच्या दक्षिण टोकावरील कन्याकुमारी मंदिरापुढे कळंबच्या मूर्तीप्रमाणे गणेशमूर्ती असून जवळच्या खोलगट भागातील मंदिराला व तेथल्या गणपतीला अनुलक्षून नेमकी अहिल्या, इंद्र, गौतम व चिंतामणी गणेशाची कथा प्रचलित आहे. कुष्ठपीडित इंद्राने त्या स्थळी गणपतीला तपोबलाने प्रसन्न केले, असे तेथेही सांगितले जाते.

पुण्याजवळील थेऊर संदर्भात यापूर्वी उल्लेख केला आहेच.

कळंबच्या चिंतामणी मंदिरातील पायऱ्या उतरण्यापूर्वी दिसणारी चतुर्मुखी मूर्ती कळंबच्या गढीत सापडली होती. सुमारे पाऊणशे वर्षांपूर्वी ती येथे आणून मांडली गेली. अशीच गणेशमूर्ती यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर येथे आणि कन्याकुमारीलाही आहे. पवनीच्या श्री पंचाननाशीही या मूर्तीची तुलना केली जाते. बहुधा मूर्तीनिर्मितीचे हे कालखंड समान असावेत.

## आजूबाजूची पाहण्यासारखी ठिकाणे

चिंतामणी मंदिराच्या बाहेर रस्ता ओलांडून पश्चिमेला दोन मंदिरे आहेत. त्यापैकी एकात दत्तमूर्ती आणि पादुका आहेत. या मूर्तींची स्थापना स्थानिक भक्तांनी १९९४ मध्ये केली. दुसऱ्या मंदिरात अनसूयेची मूर्ती आहे, असे भक्त मानतात. ह्या मूर्तीच्या गळ्यात काळ्याशार रुद्राक्षांची माळ, वरील डाव्या हातात विनायकाची मूर्ती आणि खालील डाव्या हातात कमंडलू, मस्तकावर मुकूट आणि दोन बाजूला दोन दासी उभ्या आहेत.

पूर्वी येथे पार्वतीची मूर्ती होती. ती १९९० मध्ये चोरीला गेली. त्या ठिकाणी ही मूर्ती स्थापित केली गेली.

प्राचीन कळंब हे मंदिरमूर्त्यांनी व्यापलेले गाव असावे, असे वाटते. चक्रावती नदीच्या किनाऱ्यावर पूर्वी अनेक मंदिरे असावीत. त्यातील बऱ्याचशा विलोभनीय मूर्ती आजही सापडत असतात. पुण्यातील विद्वान इतिहास संशोधक कै. डॉ. प्र.ल. सासवडकर यांनी कळंब परिसरात सापडलेल्या बहुतेक मूर्ती इ.स. ७०० ते ११०० या काळातील आहेत, असे सांगितले होते.

त्यांच्या मते श्री चिंतामणी मंदिराच्या समोरील रस्त्याच्या दुसऱ्या काठावर दत्तमूर्तीसह असलेले पूर्वाभिमुख मंदिर मूळात अनसूयेचे नसून ती मूर्ती अन्नपूर्णा पार्वतीची आहे. तिचे अवयव अत्यंत रेखीव असून ती सुमारे एक हजार वर्षांपूर्वीची पार्वतीची मूर्ती आहे, असे यवतमाळचे इतिहास संशोधक डॉ.य.खु. देशपांडे यांनीही लिहून ठेवले आहे.

चौदा चावड्यांचे, बत्तीस महालांचे आणि बारा मारुतींचे कळंब असा लौकिक या गावाचा आहे. आजच्या घडीला अशा चावड्या, महाल राहिलेले नाहीत. कळंबच्या पूर्वेला चार किलोमीटर अंतरावर बोरी महाल नावाचे खेडे आहे. तिथेही गढी होती. कदाचित प्राचीन काळी कळंबच्या बत्तीसपैकी तो एक महाल असावा. एकेकाळच्या कळंब सरकारच्या म्हणजे कळंब जिल्ह्याच्या कक्षेत चौदा महसुली किंवा त्यासारखे प्रमुख विभाग असावेत. त्यावेळच्या रचनेप्रमाणे त्या जिल्ह्यात बत्तीस महालही असावेत. तहसिलीला महाल म्हटले जात असावे. त्यातीलच एक बोरी महाल असावे.

बारा मारोतींच्या बाबतीत उल्लेख सार्थ वाटतो. येथील परिसरात आजही मारुतीची बारा मंदिरे आढळतात. यांपैकी तळ्याचा मारुती पूर्वेला, राठचा किंवा रीठचा मारुती पश्चिमेला, जोंधळणीचा मारुती दक्षिणेला तर मुदापूरचा मारुती कळंबच्या उत्तरेला आहे. शिवाय आठ दिशांच्या आठ मारुतींनी या गावच्या शिवेचे रक्षण केले आहे, असे श्रद्धाळू सांगतात.

कळंबच्या पूर्वेला दोन किलोमीटर अंतरावर एका पुष्करणीकाठी कलावंतीणीचा महाल होता, अशी नोंद इ.स. १५०७ च्या एका फारशी शिलालेखात आहे. हा शिलालेख त्या महालाच्या मूळ जागी आहे, असे म्हणतात. प्रत्यक्षात मात्र काही सुगावा लागत नाही.

कळंबला नदीमध्ये एक कागदडोह होता. तेथे पूर्वी कागदांचा कारखाना होता. अकबरकालीन ही स्थिती असावी. कळंबला हिऱ्यांची खाण होती आणि येथे हिऱ्यांचा व्यापारही चालायचा, अशी प्रवाशी नोंद 'आईने अकबरी'त आहे. घोंगडी, तढव विणण्याचा धंदा येथे बऱ्याच आधीपासून चालत होता. कळंब परिसरातील बांधकामातल्या विटा पाण्यावर तरंगायच्या असे सांगतात. येथून बाभूळगावमार्गे अमरावतीकडे जाताना लागणाऱ्या तळेगाव दशासरच्या विटाही पाण्यावर तरंगतात. तळेगाव दशासर येथील एका मंदिरात कळंबहून रघुजी भोसले यांनी पाठवलेली काही दानपत्रे अथवा आज्ञापत्रे आहेत, असे सांगतात. कळंब येथे बैल आणि तरुणांच्या कुस्त्यांची दंगल भरविली जायची. या लढायांच्या जागांच्या खुणा आजही काही प्रमाणात आढळतात. कळंब येथे भरणारा बैलबाजार आजही प्रसिद्ध आहे.

कळंबला यादवांच्या नंतर केव्हातरी गवळी लोकांची संस्कृती प्रभावी होती, असे वाटते. त्यानंतर रजपूत आणि मराठे भटकंतीत इकडे आले व त्यांनी गोपसंस्कृती मागे टाकली. भटकत आलेले कुणी एक ठाकूर कळंबचे सत्ताधारी झाले. पुढे ते 'ठाकरे' नावाचे ग्रामाधिकारी ठरले.

कळंब हे ऐतिहासिक गाव पूर्वी मंदिरमूर्त्यांनी व्यापलेले होते. एक धर्मकेंद्र होते. चक्रावती नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर अनेक मंदिरे होती. आजचे श्रीचिंतामणी मंदिर पुरातन काळी गावापासून दूर वनराईत, कदंबराजीत सरोवराकाठी होते. हा सर्व परिसर हिंदूंनी व्यापलेला असावा. जवळच असलेल्या तपेश्वरमंदिरातील मूर्ती जुन्या काळच्या असून त्या इ.स. ७०० ते ११०० च्या दरम्यानच्या असाव्या. श्री क्षेत्र चिंतामणीपासून सुमारे सात किलोमीटरवर द्रुग किंवा दुर्गचा किल्ला आहे. आता तो खंडहर अवस्थेत दिसतो. पाचव्या शतकातील एका ताम्रपटाच्या उल्लेखावरून हे स्पष्ट होते की, कळंबजवळील कदंबगिरीग्राम दानात दिलेले गाव होते. याच गावाला आज 'दुर्ग' म्हणतात. येथे तेव्हा अभेद्य डोंगरी किल्ला होता. तो गोंडांनी किंवा तत्पूर्वी उभारला व जोपासला असावा.

मध्यंतरी खोदकामात या किल्ल्यातही यादवकालीन सोन्याची नाणी सापडली व ती आज नागपूरच्या वस्तूसंग्रहालयात आहेत. द्रुग किल्ल्याचा परिसर अतिशय निसर्गरम्य आणि दाट झाडीने व्यापलेला आहे. जाण्याचा मार्गही जंगलाचाच आहे. किल्ल्यावर श्री रेणुकादेवीचे मंदिर आहे. जवळच पायथ्याशी एक तलाव आहे. या भागात आणि कळंबच्या गढीच्या खोदकामात

तांब्याचीही नाणी सापडायची. संशोधकांच्या मते ती गुप्तकालीन होत. आजही अनेकदा लोभी किंवा अंधश्रद्धाळू या खंडहर झालेल्या किल्ल्यात पुरातन खजिने सापडतील या आशेने लपूनछपून खोदकाम करतात. काही तर पायाळू व्यक्तींना आणून त्यांच्या तर्कशक्तीने असे शोध घेत हे कृत्य करताना दिसतात.

द्रुग किंवा दुर्गच्या किल्ल्याचा दगड, चिंतामणी मंदिराचा दगड आणि जवळच असलेल्या नांझा या गावातील वाड्यांच्या बांधकामात वापरण्यात आलेले दगड हे सारखेच आहेत. कळंबची गढी, दुर्गचा किल्ला, चिंतामणी मंदिर आदी शिल्पांची बांधणी पुरातन किंवा यादवकालीन असली, तरी उस्तवारी, डागडुजी, पुनर्बांधणी हे कळंब सरकारच्या माध्यमातून गोंड, भोसले आणि मोगल अशा सत्ताधाऱ्यांनी केल्याचे लक्षात येते.

कळंब हे आज तालुक्याचे ठिकाण आहे. मात्र पूर्वी ते मोठे शहर असावे. तीन किलोमीटरवरील बोरी महालपर्यंत याचा विस्तार असावा असे वाटते. कळंब आणि बोरी महाल येथील संपन्नता सहज लक्षात येते. अनेक गढी आणि त्या गढींची पांढरी माती त्याचेच द्योतक आहे. काही वृक्ष मोठमोठाले असून त्यांच्या सभोवतालच्या वस्तीवरूनही प्राचीनता लक्षात येते. पूर्वी गढींच्या भिंतींमध्ये लपविले जाणारे धन सापडेल या आशेने गढीची माती उकरणारेही अनेक महाभाग आढळतात. त्यात गढीची भिंत अंगावर कोसळल्याने काही अपघातही झालेले आहेत. मात्र आता हळूहळू गढी जमीनदोस्त करणे सुरू असून ती माती ग्रामपंचायत, पंचायतसमिती व शासकीय नवीन बांधकामांना खड्ड्यांमधील वा पायाच्या भरतीसाठी वापरली जात आहे.

कळंबजवळचे रमणीय ठिकाण म्हणजे श्री क्षेत्र चिंतामणीपासून पाच किलोमीटरवर उंच टेकडीवर असलेले दत्ताचे स्थान — निरंजन माहूर. हे दत्त भक्तांचे श्रद्धास्नान. नांदेड जिल्ह्यातील यवतमाळपासून ८२ किलोमीटरवर असलेले दत्ताचे वास्तव्य असलेले ठिकाण म्हणजे मोठे माहूर तर कळंबजवळील हे ठिकाण म्हणजे निरंजन माहूर किंवा छोटे माहूर. अरण्याचा प्रदेश आणि जवळच तलाव असल्याने पर्यटनस्थळ म्हणून ते विकसित होत आहे. श्री दत्तमूर्तीच्या मस्तकावर आशीर्वादात्मक हस्त ठेवून उभी असलेली अनसूयेची मूर्ती हे येथील खास आकर्षण. काळ्या पाषाणात कोरलेली ही रेखीव मूर्ती शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. दत्तजन्माच्या वेगवेगळ्या कथा येथे ऐकायला मिळतात. वरून कदंबनगरी, दूरवरचा दुर्गाचा किल्ला, इतर टेकड्या आणि पायथ्याशी असलेला दत्त तलाव छान दिसतो.

कळंबपासून सुमारे २० किलोमीटरवर राळेगाव आहे. या शहराच्या दक्षिणेस तीन किलोमीटरवर रावेरी किंवा रामगंगा हे पौराणिक गाव आहे. हा रामायणकालीन दंडकारण्याचा भाग आहे, असे सांगितले जाते. येथे नदीशेजारी जगतजननी सीतामातेचे (जनकनंदिनी) जे पुरातन मंदिर आहे, त्याची कथा अशी सांगितली जाते — परिटाने व्यक्त केलेल्या संशयावरून जेव्हा सीतेचा रामाने त्याग केला, तेव्हा ती काही दिवस वाल्मिकींच्या आश्रमात वास्तव्याला होती, तो आश्रम येथे होता, असा समज आहे. येथेच लवकुशांनी रामाचा अश्वमेध यज्ञाचा घोडा अडवला व नंतर झालेले युद्धही या भूमीतच झाले, असे गावकरी सांगतात.

जवळच्या रामगंगा नदीशेजारी असलेली समाधी वाल्मिकी ऋषींची असल्याचे बोलले जाते.

झोपलेला किंवा आडवा जो नऊ फुटाचा मारुती येथील मंदिरात आहे, त्याचे पाय दगडी साखळदंडाने बांधले आहेत. या मारुतीला बालपणी त्याच्या मातेने अशी शिक्षा केली होती. या मूर्तीवरून अंजनी मातेचा आश्रम येथे असावा, अशीही श्रद्धा आहे. काहींच्या मते तो लवकुशांशी लढताना जायबंदी झाला आहे. त्याचे प्रतीक म्हणून ही बंदिस्त हनुमानाची मूर्ती आहे.

मुलांना पेज हवी म्हणून सीता गावात गव्हाची भिक्षा मागण्यास गेली; परंतु तिला कुणीही गहू दिले नाहीत. तेव्हा सीतेने या गावात गहू पिकणार नाही, असा शाप दिला. आजही येथे गव्हाचे पीक आढळत नाही. तो पेरला तर पिकत नाही, असे सांगितले जाते.

भारतातील हे एकमेव सीता मंदिर असल्याचे बोलले जाते. हे मंदिर साधारणत: १६ व्या शतकात बांधण्यात आले असावे. मध्यंतरी या मंदिराची प्रचंड दुरवस्था झाली. ते कोसळण्याच्या बेतात आले. काही मंडळींनी नांदेडच्या देगलूरहून शिळा आणल्या. लातूरचे कारागिर बोलावले व मंदिराची दुरुस्ती केली. शासनाने रावेरीला ‘क’ वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा दिला. मात्र हवी तशी प्रगती झालेली दिसत नाही आणि हे मंदिरही खूपसे प्रसिद्धीच्या झोतात आले नाही.

कळंबपासून उत्तरेला १५ किलोमीटरवर उत्तराभिमुखी वर्धा नदीच्या किनाऱ्यावर कोटेश्वर संस्थान आहे. तिथे उंचावर महादेवाची पिंड आहे. येथे प्राचीन काळी कोट्यवधी यज्ञ झाले

होते, असे सांगतात. आजही या भागात कुठेही खोदले तरी यज्ञातील राखेप्रमाणे माती मिळते. रक्षाविसर्जनासाठी व तत्सम विधींसाठी अनेक लोक येथे येतात. तसेच नदीपात्रात विशिष्ट ठिकाणी बिल्वपत्रे बुडतात म्हणून त्या ठिकाणाला बेलबुडी म्हणतात. या नदीत काही ठिकाणी पाण्यात खेचून घेणारे भवरे आहेत. म्हणून मृत्योपरान्त रक्षाविसर्जनासाठी येणारे महामार्गाच्या दिशेने हे विधी न करता सात किलोमीटरचा फेरा घेऊन पलीकडच्या तटावर हे विधी करतात. महामार्गाच्या दिशेने असलेल्या पात्रात पाण्याच्या भवऱ्यांनी होड्या किंवा माणसांना खेचून घेतल्याच्या घटना घडलेल्या आहेत.

याशिवाय कळंब तालुक्यातील खटेश्वर संस्थान, बोपापूरची देवी, नरसापूरचे महादेव मंदिर, तिरझड्याच्या टेकडीवरील जागृत गोसावी मंदिर, गलमगावचा मारुती ही सर्वच ठिकाणे पाहण्यासारखी आहेत. कळंबपासून नागपूर मार्गावर सुमारे ७ कि.मी.वर शिरपूरपासून ४ कि.मी. आत असलेल्या बोपापूरच्या देवी मंदिरात खाली उतरावे लागते. त्यात गोलाकार देवीच्या अनेक मूर्त्या आहेत. कळंबपासून जोडमोहा किंवा घाटंजी मार्गावर १८ कि.मी. अंतरावरचे खटेश्वर संस्थानही खटेश्वर महाराजांसाठी प्रसिद्ध आहे. शांत अशा निसर्गसान्निध्यात हे देवस्थान आहे. भद्रावतीवरून कळंबला वणीमार्गे येताना जोडमोहा किंवा खटेश्वर लागते. कळंबपासून २३ कि.मी. अंतरावर असलेले आताचे जिल्ह्याचे ठिकाण म्हणजे. यवतमाळ. येथील तीन दिशांना असलेली मारुतीची मंदिरे प्रसिद्ध आहेत. ढुमणापूरचा मारुती अमरावती मार्गावर यवतमाळपासून ५ कि.मी. वर (कळंबपासून

२८ कि.मी.), आर्णी मार्गावरचा वनवासी मारुती ३ कि.मी.वर (कळंबपासून २६ कि.मी.) आणि संकटमोचन परिसरातला मारुती हा शहरातच आहे. शिवाय शहरातील महादेव मंदिर, लोहाऱ्याचे महादेव मंदिर, चौसाळ्याचे टेकडीवरील महादेव मंदिर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर, जगत मंदिर अशी काही पुरातन मंदिरे पाहण्यासारखी आहेत. यवतमाळपासून ५ ते १० कि.मी. अंतरावर असलेले जामवाडीचा तलाव, बोरगाव धरण, निळोणा धरण आणि बाभूळगाव येथील बेंबळा प्रकल्प इत्यादी ठिकाणे पाहताना मन रमून जाते.

## इतर माहिती

कळंब नावाची महाराष्ट्रात सात गावे आढळतात. त्यापैकी पुणे, उस्मानाबाद आणि यवतमाळ जिह्यातील कळंब हे तालुके लोकसंख्या, विकास आणि इतिहास या दृष्टीने प्रसिद्ध आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील कळंब हे चिंतामणी मंदिरामुळेच जगप्रसिद्ध झाले आहे. कळंब नावाचे दुसरे गाव विदर्भात नाही.

कळंब परिसरात कदंबाच्या झाडांचे वैपुल्य होते व आजही ही झाडे येथील वनाडोंगरात आहेत.

कळंब हे पूर्वी पंचायत समितीचे मुख्यालय होते. आता तालुका आहे; पण फार पूर्वी हा जिल्हा असावा, असे पुरावे आजही आढळतात. नगर पालिकेसाठी प्रयत्न सुरू आहेत.

पारधी, गोंड, गोवारी, आंध, माना, हलबा, कोष्टी अशा अनेक जमाती या परिसरात राहतात; पण कोलाम जमात या

परिसरात जास्त प्रमाणात आढळते. कोलामांचे ३१ पोड या भागात आढळतात.

कळंबमधील विहिरींचे वैशिष्ट्य कोड्यात टाकणारे आहे. दोन फूट रुंद व तीन फूट लांबीच्या किंवा अडीच फुटी व्यासाच्या बऱ्याच विहिरी येथे आढळतात. मोटारस्टँडवर असणारी विहीरही फार पूर्वीची आहे. तिला उपसले असता अनेक मानवी हाडे, बांगड्या या विहिरीत आढळल्या. शत्रूंपासून आपली इभ्रत वाचवण्यासाठी स्त्रियांनी येथे प्राण त्यागले असावे, असे इतिहासकारांचे म्हणणे आहे.

इंग्रजांच्या राजवटीत या ठिकाणचे महत्त्व कमी झाले. वैभव कमी होत गेले. एकेकाळी हिंदूंचे धार्मिक स्थळ आणि ज्ञान, विद्येचे वर्चस्व राहिलेला हा जिल्हा विविध आक्रमणे आणि नंतर इंग्रजांनी दुर्लक्षित केल्याने आपला विकास करू शकला नाही. खंडहरांची संख्या वाढत गेली. श्रीचिंतामणीचे मंदिर जर वगळले तर असे ठसठशीत आकर्षण या गावाला राहिले नाही. भरपूर कापूस, भाजीपाला, मोठमोठाले कोहळे आणि केळीचे उत्पादन असा काही उत्पादकतेचा भाग सोडला तर नंतर वणी आणि यवतमाळ यांच्या विकासाच्या तुलनेने कळंब मागे पडले. ज्या असंख्य विहिरी आणि चक्रावती नदीच्या भरपूर पाण्याच्या आधाराने येथील शेती प्रसिद्ध होती, त्या शेतीला आज पाणी मिळेनासे झाले आहे. चक्रावतीला पाणी नाममात्रच राहिले आहे. विहिरी खोल गेल्या आहेत. पावसाचे प्रमाण कमी झाल्याने उन्हाळ्यात त्या आटतात. पाण्यासाठी लोकांना वणवण फिरावे लागते. चिंतामणीपुढ्यात साक्षात गंगा अवतरण्याच्या घटना पाहता

या परिसरात पाण्याचे दुर्भिक्ष्य का व्हावे, हा प्रश्न भाविकांना पडणे साहजिक आहे. मात्र रेन वॉटर हार्वेस्टिंग, शेततळे, पाणी अडवणे, साठवणे याविषयी गावात म्हणावी तशी जागृतता नाही. आमच्या इंदिरा महाविद्यालयातही पाण्याची भीषण समस्या होती. हा भाग कडक मुरमाळ आहे. २००५ च्या दुष्काळात परिस्थिती भयानक झाली. महाविद्यालयाच्या परिसरातील तीनही विहिरी खोल करून संपूर्ण इमारतींना रेन वॉटर हार्वेस्टिंग केले. एक मोठे शेततळे खणले. महाविद्यालयातील वाया जाणाऱ्या पावसाच्या पाण्याचा थेंबन् थेंब त्या शेततळ्यात पोचावा, अशी योजना केली. नाल्या आणि पाईपलाईन टाकली. रस्त्याच्या बाजूने वाहणारे पावसाचे पाणी महाविद्यालयात बगिच्याच्या बाजूला चर खोदून आत घेतले. आज पिण्याच्या, वापराच्या पाण्याला काही कमी नाही आणि झाडांनाही पाणी पुरते. आजूबाजूच्या परिसरातील गावातील मंडळी महाविद्यालयातून उन्हाळ्यात पाणी नेतात. आता आमच्या या परिसरात श्री सरस्वती मंदिर निर्माण केले जात आहे. त्यामध्ये विविध देवीदेवता व संतांच्या मूर्त्यांची प्रतिष्ठापना केली जाणार आहे.

गणपतीच्या पादप्रक्षालनार्थ बहुतेक दर बारा वर्षांनी गंगा येते, असे भक्तजन मानतात. गंगास्नानाने सर्व पापे धुतली जातात, असा समज आहे. सर्वांची पापं धुणारी गंगा माता स्वत:ही पापसंपृक्त होते आणि नाइलाजाने ज्या चिंतामणीच्या कृपेने इंद्राची पापे धुतली गेली, त्या चिंतामणीलाच स्पर्श करून स्वत: पापमुक्त होते. आज चिंतामणी मंदिरातील कुंडावर काचेचे झाकण लावलेले आहे, जेणेकरून भक्तांनी त्यात फुले, पैसे टाकून पाणी दूषित

होऊ नये. तरीही काही भक्त प्रदूषणाचा किंवा तो प्राचीन ठेवा बुजण्याचा विचार न करता ते झाकण बाजूला करून त्यात फुले, पैसे टाकण्याचा प्रयत्न करतातच.

गणेशाच्या पूजेसाठी इंद्राने ही गंगा आणली होती, असे भक्त मानतात. गौतम ऋषींच्या शापातून मुक्त झाल्यावर चिंतामणी देवतेची स्थापना जेव्हा इंद्राने केली, तेव्हा पूजनासाठी पृथ्वीवरील पाणी कसे वापरावे, हा प्रश्न पडल्याने इंद्राने स्वर्गातूनच श्री गंगेला आवाहन केले आणि पूजनानंतर तिला दर बारा वर्षानंतर श्री चिंतामणीला स्नान घालण्याची आज्ञा केली, अशी आख्यायिका आहे.

ही गंगा आली की पाण्याची पातळी वाढू लागते. कुंडातून पाणी झिरपू लागते. काही दिवसांतच या पाण्याचा स्पर्श चिंतामणी मूर्तीला झाला की पाणी ओसरू लागते असे सांगतात. आतापर्यंत १९१८, १९३३, १९४८, १९५८, १९७०, १८८३, १९९५ या वर्षांत गंगा आली होती. यावरून तंतोतंत बारा वर्षांनी गंगा अवतरत नाही, असे लक्षात येते. मात्र आपण मंदिरात उतरतो, त्याहीपेक्षा खोल असणारी ही विहीर दरवर्षीच्या पावसाने तुडुंब भरून वाहत का नाही, हे कोडेच आहे. काही काळ यवतमाळ येथे पोलीस अधिकारी म्हणून राहिलेले भूगर्भशास्त्रात पी.एचडी. असलेले दिल्लीचे डॉ. बिसारिया तसेच जिल्हाधिकारी राहिलेले श्री. गिरिराज यांनीही याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला होता.

१९९५ मध्ये सप्टेंबर महिन्यात अवतरलेल्या या गंगेची दूरदुरून आलेल्या भाविकांनी पूजा केली व तीर्थ नेले. नोटांची

पुडकी, सोने, नाणी, फुले गंगेला अर्पण केली. सुमारे वीस—बावीस दिवस चिंतामणी मंदिरातील चौकात पाणी होते. मोटर लावून पाणी उपसले तरी लगेच ते पाझरून येई. भाविकांच्या पूजेची फुले, पाने, नारळ, दुर्वा यांमुळे पाणी दूषित होऊन जनतेला त्रास होऊ नये, त्यासाठी ते सारखे उपसावे लागे.

१९९५ च्या गंगा आगमनप्रसंगी आणि १९९८ च्या मूर्तीची खोळ गळून पडण्याच्या प्रसंगी मी कळंब येथे असल्याने या दोन्ही घटना प्रत्यक्ष अनुभवता आल्या.

गणेशमूर्तीसमोर जे गणेशकुंड आहे, ते भूपातळीपासून सुमारे ३५ फूट खोल आहे. या मंदिराच्या आवारातच पूर्वेकडे एक विहीर आहे. तिची खोली सुमारे ३५ फूट आहे. तिला नेहमीच पाणी असते. या परिसराचे अवलोकन केले असता हे मंदिर पूर्वी सरोवरावर बांधले असावे, असे वाटते; परंतु पाण्याच्या पातळीचे गूढ उकलत नाही.

परंपरेने पुजारी म्हणून व्यास घराण्यातील ब्राम्हण पूजा करतात. दर महिन्याच्या संकष्टी व अंगारकी चतुर्थीला दूरदुरून भाविक चिंतामणीच्या दर्शनासाठी येतात. अनेक भाविक २३ किलोमीटर अंतरावरील यवतमाळसारख्या शहरांतून चतुर्थीच्या अगोदरच्या रात्रीच पायी निघून पहाटे कळंबला पोचून दर्शन घेतात. यवतमाळ—कळंब मार्गावर रात्री भक्तांसाठी पाणी, चहा, नाश्ता देणारी काही श्रीमंत भाविक मंडळी आहेत. या चहापाण्याच्या सोयीमुळे पूर्वी घनदाट जंगलाचा व घाटाचा असलेला आणि आज केवळ सामान्य जंगलाचा, भारी, मडकोना,

चापर्डा, घोटी अशा काही गावांना स्पर्श करून जाणारा घाटविरहित मार्ग खडतर न राहता भक्तांसाठी सुखकर झाला आहे.

या मंदिरात नेहमी गर्दी नसते; पण चतुर्थी किंवा सणासुदींना मोठी गर्दी होते. अशा वेळी किलोमीटरभर रांगाही लागतात. मंदिर खोल असून गाभाऱ्याचा मार्ग फार अरुंद आहे. द्वारातून वाकून जावे लागते. तिथे जागा फार कमी असल्याने दर्शनाला तिथे फार लोकांना थांबता येत नाही. ते दर्शन घेऊन पुढे निघाल्यावरच त्यांच्या मागील भक्तांना आत जाता येते. गर्दीत तिथे मोकळी हवा येत नाही. अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार होतो. याही मंदिराचा जीर्णोद्धार झाल्यास मूळ ढाचा न बदलता दुरून दर्शन घेता येईल व गाभाऱ्यातील गर्दी टाळता येईल यादृष्टीने समोरच्या प्रवेशाच्या द्वाराचा भाग काढल्यास ही समस्या सुटू शकते. आजकाल त्वरित दर्शन होणाऱ्या व प्रसन्न, मोकळ्या वातावरणातील देवस्थानांना जाणाऱ्या भाविकांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. त्यामुळे मंदिराचे उत्पन्नही वाढते. अनेक सेवा योजना राबवता येतात. तेव्हा कळंबच्या चिंतामणीला येणाऱ्या भाविकांना दर्शनासाठी फार काळ तिष्ठत राहावे लागू नये, यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. तसेही श्री चिंतामणीचे सध्याचे जे प्रवेशद्वार आहे, ते प्राचीन नसावे.

येथे कार्यक्रमासाठी, विवाहासाठी हॉल आहे. राहण्याची सोय आहे. स्वच्छतागृहे आहेत. पाण्याची सोय आहे. भोजनप्रसादाची सोय आहे. अनेक दात्यांना येथे त्यांच्यातर्फे भोजन देण्यासाठीही व्यवस्था आहे. देवस्थानाकडून अगदी भांड्यांपासून सर्व साहित्य मिळते. अवेळी येणाऱ्या भक्तांच्या भोजनप्रसादाची

सोय न झाल्यास कळंब—नागपूर रोडवर धाबेही आहेत आणि यवतमाळसारखे शहर अगदी २३ किलोमीटरवर असल्याने व या मार्गावर रात्रभर नागपूर—नांदेडसारख्या बसेस चालत असल्याने भक्तांना अडचण जात नाही.

एकंदरीत प्राचीन असे श्री चिंतामणी देवस्थान व परिसरातील मंदिरे पाहण्यासारखी आहेत. फार मोठ्या प्रमाणावर लोकांची श्रद्धा चिंतामणीवर आहे. चिंता दूर करून व भक्ताला पावणारा हा परमेश्वर असल्याचे भक्त मानतात.

# श्री सिद्धिविनायक, केळझर
# श्री एकचक्रा गणेश

रामायण आणि महाभारतातील अनेक कथानके, घटना विदर्भाच्या भूमीवर घडल्या आहेत. वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील 'केळझर' म्हणजे प्राचीन 'एकचक्रा नगरी'. नागपूर—वर्धा महामार्गावर नागपूरपासून सुमारे ५२ कि.मी. अंतरावर आणि वर्धेपासून २६ कि.मी. अंतरावर आहे. येथील एकचक्रा गणेश म्हणजेच आजच्या केळझरचा 'सिद्धिविनायक' होय. या गावाला पूर्वी 'केळझरी' असेही म्हटले गेले असावे. हे देवस्थान मुख्य मार्गापासून फार तर अर्धा कि.मी. आत टेकडीवर आहे.

## या क्षेत्रासंबंधी काही कथा व इतिहास

पांडवांच्या १२ वर्षांच्या वनवासानंतर एक वर्षाच्या अज्ञातवासाच्या काळात ते विदर्भात आले होते. एकचक्रा नगरीत बकासुर नावाचा राक्षस राहत होता. त्याला रोज दोन बैलगाड्या अन्न (भात), दोन रेडे व गाडी नेणारा एक मानव भोजनास लागे. दररोज एकेका घरचा क्रमांक असे. ज्या घरचा क्रमांक असे, ते घर दु:खात बुडालेले असायचे. ही परिस्थिती पांडवांनी बघितली. एके दिवशी ज्या घरी पांडव थांबले होते, त्या घरचा क्रमांक असताना कुंतीमाता म्हणाली, 'आज माझ्या मुलास भीमसेनास (बल्लवाचार्यास) जाऊ द्या.' बकासुरास भीमसेनाच्या सामर्थ्याविषयी काहीच माहीत नव्हते. एवढा अगडबंब मानव आज

खायला मिळणार म्हणून तो खुश झाला. प्रचंड युद्ध झाले आणि सर्व अन्न भीमानेच खाऊन टाकले. भीमाच्या हल्ल्यांनी बकासुर रक्तबंबाळ झाला. मृत्युपाश फेकून भीमाने बकासुरास लोळवले, यमसदनी पाठवले. गावाने सुटकेचा नि:श्वास टाकला. युद्धाची जागा वर्धा–नागपूर मुख्य मार्गावर केळझरच्या आग्नेय दिशेस बौद्धविहारामागे बकासुर किंवा तोंड्या राक्षस मैदान म्हणून प्रसिद्ध आहे.

या युद्धाने बकासुराला लोळविणारा बलाढ्य माणूस कोण, अशी विचारणा होऊ लागली. भारतात फक्त भीमच हे कार्य करू शकतो, हे अनेकजण जाणून होते. तेव्हा अज्ञातवासात पकडल्या जाण्यापेक्षा आपण येथून निघून गेलेले बरे, असा विचार करून पांडव दक्षिणेकडे आंध्रप्रदेशात सरकले.

बकासुराच्या मृत्यूची स्मृती म्हणून पांडवांनी टेकडीवर एकचक्रानगरीचा विनायक स्थापन केला. तोच हा एकचक्रागणेश. असे हे प्राचीन देवस्थान.

बकासुराच्या वधाची पूर्वतयारी येथे झाली आणि प्रत्यक्ष वध आजच्या अमरावती जिल्ह्यातील चिखलदऱ्यात झाला अशीही कथा सांगितली जाते. त्याला 'कीचकदरा' असे म्हटले गेले. आजही चिखलदऱ्यात कीचकदरा किंवा भीमकुंड म्हणून एक दरी दाखविली जाते. येथेच भीमाने बकासुराचे मृत शरीर फेकले असे सांगितले जाते. असे घडूही शकते. कारण अज्ञातवासात पांडवांना आपली ओळख लपवत सतत ठिकाणे बदलावी लागत होती. ते टेकड्या, जंगले यांतून अधिक वास्तव्य करीत. चिखलदरा आणि केळझर ही दोन्ही ठिकाणे उंच टेकड्यांवर आणि दऱ्यांनी युक्त

आहेत. तेव्हा बकासुराला मारून त्याचे प्रेत एकचक्रानगरीतून नेऊन कीचकदऱ्यामध्ये फेकले असावे. मात्र बलवान भीमाने केलेल्या कीचकाच्या वधामुळे ते नाव कीचकदरा पडले असेही सांगितले जाते.

महर्षी वशिष्ठांनी केळझर या गणेशक्षेत्राची स्थापना केली असेही मानले जाते. वशिष्टपुराणानुसार वशिष्टमुनी या प्रांतात राहात होते. त्यांनी येथे गणेशाची स्थापना केली. वर्धा नदीला येथून प्रवाही केले आणि वर्धा नदीच्या नावावरून या गणेशाचे नाव 'वरदविनायक' असे केले गेले. श्रीरामचंद्राचा जन्म झाला आणि वशिष्टांनी ही भूमी सोडली. म्हणजे या मंदिराचा इतिहास रामायणापूर्वीपर्यंत पोचतो.

महाभारतकालीन या मंदिराचा जीर्णोद्धार यादवकाळात हेमाडपंताने केला, असे मानले जाते.

परकीय आक्रमणात या देवस्थानाची व नगरीची फार नासधूस करण्यात आली. अद्यापही पूर्वीचे वैभव या देवस्थानाला प्राप्त झाले नाही.

जळगाव जिल्ह्यातील एरंडोल शहरालाही 'एकचक्रानगरी' म्हटले जाते. बकासुरवधाची कथा त्या स्थानाशीही जोडली जाते व 'भीमकुंड' नावाची जागाही दाखवली जाते.

वाकाटकांनंतर राजा प्रवरसेनाने या प्रसिद्ध नगरीला आपली राजधानी केली होती, असे म्हणतात.

भोसले राजे जेव्हा कोल्हापूरहून नागपूरला स्थायिक होण्यास निघाले, तेव्हा त्यांनी केळझर येथे मुक्काम केला होता, त्याचेही उल्लेख काही ठिकाणी आढळतात.

मूर्ती, मंदिर व परिसर

उजव्या सोंडेची सिद्धिविनायकाची मूर्ती शेंदूरलिंपित प्रतिमा असून तिची उंची पावणेपाच फूट आहे. मूर्तीचा व्यास ४ फुटी असावा. मूर्तीच्या बाजूने आता सिंहासनाप्रमाणे बांधकाम झाले आहे. मूर्तीच्या मस्तकावरचा मुकुट हा अंगचा नाही. गंडस्थळ शिल्पित केलेले आहे. प्रतिमा चतुर्भुज असावी. मूर्ती प्राचीन आहे.

केळझर हे लहानसे गाव आहे. गावाच्या पश्चिमेस एका टेकडीवर श्री एकचक्रा गणेश प्रतिष्ठापित आहे. या टेकडीला किल्ला म्हटले जाते. किल्ल्याचे पुरावशेष अत्यल्प आहेत. मंदिराच्या पश्चिम दिशेस उंच दगडी वर्तुळाकार बुरूज असून त्याची बांधणी काळ्या दगडांची आहे. ती अतिशय मजबूत आहे. काही चुन्याचे व काही शिश्याचे जोड दिलेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज आपल्या स्थापत्यात असे वितळलेले शिसे वापरीत. बुरुजावर चढण्यासाठी पायऱ्या आहेत. पूर्वी येथे पाच बुरूज होते. आता सततच्या दुरुस्ती व समतलीकरणाने ते आढळत नाहीत. मंदिराच्या बाबतीतही तसेच झाले आहे. दुरुस्त्या व जीर्णोद्धाराने प्राचीनतेच्या बऱ्याचशा खुणा आता लुप्त होत चालल्या आहेत.

केळझरचा हा किल्ला श्रीमंत भोसले यांच्या ताब्यात होता. मुळात तो स्थानिक जमीनदारांचा असावा. किल्ल्याच्या पूर्वेस लांबलचक पण खुजी भिंत आहे. पूर्वी ती उंच असावी; परंतु वारंवारच्या डागडुजीने समतल केली असावी. याव्यतिरिक्त किल्ल्याचे अवशेष नाहीत.

मुख्य सिद्धिविनायक मंदिराच्या पायऱ्या उंच आहेत. मंदिर चतुष्कोणाकृती ओट्यावर आहे. ओट्याच्या बाहेरील भिंतीवर दर्शनीय भागात काही सुटी शिल्पे आहेत. ही शिल्पे मंदिराच्या आसपास भग्नावस्थेत सापडली असावी. तिथेच त्यांना भिंतीत रोवली असावी.

येथे हेमाडपंथी मंदिराचे भग्न चिरे, चौकोनी प्रस्तर, ओळंबे सर्वत्र विखुरलेले असल्याने हे मंदिर यादवांच्या काळातील म्हणजे १२ व्या किंवा १३ व्या शतकातील असावे किंवा त्यांच्या काळात या प्राचीन मंदिराची मोठी डागडुजी झाली असावी.

या मंदिराचे गर्भगृह प्राचीन असले तरी समोरचे बांधकाम गेल्या काही वर्षांतील असावे. मंदिराचा सभामंडप प्रशस्त आणि स्तंभयुक्त आहे. अष्टकोनी सभागृहाच्या पूर्वेस श्री अथर्वशीर्ष म्हणणाऱ्या भक्तांसाठी व्यवस्था केलेली दिसते.

मंदिरात श्रीगणेशासमोरच्या मंडपाच्याच भागात विठ्ठल रुक्मिणीची मूर्तीही नंतर प्रतिष्ठापित करण्यात आलेली आहे.

या मंदिरासमोर नंतर तयार करण्यात आलेली काही मंदिरे आहेत. त्यात एका घुमटीत एक महालक्ष्मीची प्राचीन अशी काळ्या दगडाची अतिशय सुंदर मूर्ती आहे. तिला धनश्री देवी असेही म्हणतात. २०१३ च्या अखेरीस मंदिरामागील पाण्याच्या टाकीकरिता खोदकाम सुरू असताना दोन काळ्या पाषाणाच्या प्राचीन विष्णूप्रतिमा आढळल्या. त्या याच महालक्ष्मी मंदिरात दोन बाजूंना प्रतिष्ठापित केल्या आहेत. बाजूच्या एका घुमटीत श्री गजानन महाराजांची मूर्ती आहे. या गावात अशा अनेक प्रतिमा आढळल्या आहेत आणि आढळतात. त्यात काही जैन प्रतिमाही

आहेत. त्यामुळे हे गाव निश्चितच प्राचीन आहे. काही वर्षांपूर्वी येथील खोदकामात आढळलेली आणखी एक श्रीविष्णूंची प्रतिमा गावात स्थित आहे. अशा विविध मूर्त्या पाहून सर्व संप्रदाय येथे गुण्यागोविंदाने नांदले असावेत असे वाटते.

या मंदिराच्या उत्तरेस दगडी पायऱ्यांचा जिना आहे. त्यातून लालसर चिरेबंदी दगडी बांधकामाच्या विहिरीपर्यंत आपण पोचतो. त्याला 'गणेश कुंड' म्हणतात. या विहिरीच्या पायऱ्यांवर, भिंतींवर काही प्राचीन काळातील सुशोभन होते व काही भग्न प्रतिमांचे अवशेषही भिंतीत चिणून ठेवल्याचे लक्षात येते. मात्र आता एक गणेश प्रतिमा वगळता बाकी तेथून हलविल्याचे निदर्शनास येते. त्यावरील शिल्पांकनामुळे ते स्थापत्य भोसले–गोंडांपूर्वीचे म्हणजे ११–१२ व्या शतकातले ठरते. 'कुशावर्ती विहीर' असेही या विहिरीला म्हटले जाते. तिचे पाणी गोड आहे. असे म्हणतात की या पाण्याने गजकरण, इसब, कोंडा, नायटा, खरूज बरे होतात. पाण्यात गंधक असावे असे वाटते. पुढे या विहिरीच्या पलीकडे नजर टाकल्यास एक चिखलयुक्त तलाव दिसतो. याला 'गणेश तलाव' असे म्हणतात.

१९९३ मध्ये या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. त्यावेळी १९९४ च्या महाशिवरात्रीपूर्वी खोदकामात प्राचीन शिवलिंग आढळले. शिवलीलामृतात अखेरच्या पाठात एकचक्रानगरीत ज्योतिर्लिंग असल्याचा उल्लेख आहे. महालक्ष्मीची मूर्ती तसेच हे शिवलिंग सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीचे असावे, असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे जैनांचे आठवे गुरू चंद्रप्रभू स्वामी यांची जी मूर्ती सापडली, ती आठव्या शतकातील असावी, असा

कयास लावला जातो. एकंदरीत हे देवस्थान, ही नगरी, ह्या मूर्त्या अत्यंत प्राचीन अशा आहेत.

## आजूबाजूची पाहण्यासारखी ठिकाणे

केळझरच्या शासकीय निवासस्थानापासून महामार्गावरून एक लहान डांबरी सडक वळते. काही कि.मी. अंतरावर रमणीय असे बोरधरण आहे. या कालव्याचे खोदकाम करताना प्राचीन नाणी आढळली होती. तिथे एक अभयारण्य आहे. येथून जवळच सुफी संत पीर साईबाबांची टेकडी आहे.

कळंबवरून केळझरला येताना वर्धेनंतर पवनारचा विनोबा भावे यांचा आश्रम वर्धेवरून १० तर केळझरपूर्वी सुमारे १५ कि. मी. अंतरावर वर्धा नदीच्या तीरावर आहे. तेथील मूर्त्याही पाहण्यासारख्या आहेत. श्री गंगा भगवतीची वाकाटककालीन प्रतिमा पवनारच्या आश्रमाच्या मागच्या बाजूला एका घुमटीत स्थित आहे. येथे गंगा स्त्रीरूपात असून मोजके दागिने, कुंकुम तिलक असलेली व समोर धावण्याच्या मुद्रेत असलेली ही मूर्ती फारच सुंदर आहे. नदीच्या खडकाळ पात्रात बरेच शिवलिंग दगडात कोरलेले आहेत. मोठमोठ्या शिळा आहेत. एखाद्या शिळेवर बसून नदीच्या पाण्यात पाय बुडवून बसायची मौज काही वेगळीच असते. मात्र पावसाळ्यात नदीचे पात्र चांगलेच फुगते. प्रवाह जोरदार असल्याने मनुष्य खेचला जातो. तेव्हा त्यावेळी जरा सांभाळूनच!

वेळ असल्यास वर्धेमधील महात्मा गांधीच्या वास्तव्याने पावन झालेल्या सेवाग्रामलाही भेट द्यावी. ऐतिहासिक महत्त्व असलेले व शासनाने संरक्षित केलेले असे हे स्थळ आहे.

केळझरवरून नागपूरकडे जाताना अगदी पाच ते सात मिनिटात मोटारीने महामार्गावरच खडकीचा मारुती प्रसिद्ध आहे. याच मंदिरात विठ्ठल रुक्मिणी, गजानन महाराज, शिवलिंग आदी प्रतिमा आहेत. दर शनिवारी व मारुतीच्या सणांना भोजनावळी असतात.

केळझरचे हे मंदिर आणि सिद्धिविनायकाची मूर्ती अत्यंत सुंदर असून विविध मूर्त्या आणि त्यांची मंदिरेही आकर्षक आहेत. मंदिराची स्वत:ची वेबसाईट आहे. येथे पाण्याची सोय चांगली आहे. भिकाऱ्यांचा त्रास नाही. महामार्गावर असल्याने येण्याजाण्यास सोयिस्कर असे हे देवस्थान आहे.

# श्री टेकडी गणेश, नागपूर

नागपूरच्या टेकडी गणेशाने अष्टगणेशांची साखळी पूर्ण होते असे म्हणतात. नागपूर रेल्वे स्थानकापासून पश्चिम दिशेला बाहेर पडल्यावर उजव्या हाताला हा सीताबर्डीचा टेकडी गणेश दिसतो. पायी जाण्यासारखे हे अंतर आहे. पूर्वीसारखे आता त्या टेकडीवर चढल्यासारखेही वाटत नाही, इतके समतलीकरण झाले आहे. हे गणपती मंदिर सीताबर्डी किल्ल्याच्या पूर्व उतारावर असून काही काळापूर्वी ते लष्करी निर्बंधित क्षेत्रात मोडत होते.

## या क्षेत्रासंबंधी काही कथा व इतिहास

नागपुरात गोंड राजांच्या पूर्वी इ.स. १४ व्या शतकात सीताबर्डी परिसरातील दोन छोट्या टेकड्यांच्या आधाराने श्री. सितलप्रसाद व श्री. बद्रीप्रसाद नावाचे दोन गवळीबंधू राज्य करीत होते. हे उत्तर भारतातून पशुधन घेऊन या परिसरात आले आणि या टेकडीच्या आधाराने येथे स्थायिक झाले. हे पुढे राजे झाले की जमीनदार हे नक्की सांगता येणार नाही; परंतु त्यांच्या आद्याक्षरावरून 'सितलबद्री' असे या टेकडीचे नामकरण झाले. पुढे ते 'सीताबद्री' आणि नंतर 'सीताबर्डी' असे अपभ्रंशित रूपात ओळखले गेले. आज ही वस्ती सीताबर्डी नावाच्या उपवस्तीवरून ओळखली जाते.

पूर्वी येथे घनदाट अरण्य होते. येथे चित्ते वावरत असत. त्यामुळे या परिसराला 'चित्ताबर्डी', नंतर 'चिताबर्डी' आणि

कालांतराने ‘सीताबर्डी’ म्हणून ओळखले गेले, असा एक मतप्रवाह आहे.

१८६६ मध्ये रेल्वे स्टेशन ते सुभाष पुतळा या रस्त्याचे काम सुरू होते. त्यावेळी खोदकाम करताना ही स्वयंभू मूर्ती शमीच्या झाडाच्या बुंध्याला लागून होती. भोसले राजवटीत ती ग्रामदेवता असावी. ही प्रतिमा जेव्हा आढळली तेव्हा एकाएकी ढग जमा झाले, खूप विजांचा कडकडाट झाला आणि खूप मुसळधार पाऊस पडला असे भक्तांतर्फे सांगितले जाते.

वाकाटकांनंतर यादवांच्या काळात या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. साधारणत: बाराव्या शतकात हेमाद्रीपंडितांने मूळ देऊळ बांधले असावे.

पूर्वी टेकडी गणेशाची मूर्ती भोकरीच्या झाडाखाली उघड्यावर होती. लष्कराच्या ताब्यातील या जागेमुळे बांधकामाची परवानगी नव्हती. १९२० मध्ये येथे टिनाचे शेड उभारले गेले. १९७२ पर्यंत ते होते. मंदिराजवळ वड–पिंपळ होते. आजही आहे. रेल्वे स्टेशन नवीन झाल्यावर १९२२–२३ पासून या मंदिरात लोक दर्शनासाठी येऊ लागले. १९२४ मध्ये काही अटींवर संरक्षण खात्याने पत्र्याची खोपी बांधण्याची परवानगी दिली. मंदिरात १९४८ मध्ये वीज आली. १९६४–६५ मध्ये संरक्षण खात्याने १५० फुटांची जागा देऊन कुंपण घालण्याची परवानगी दिली. त्यावेळी स्व. यशवंतराव चव्हाण संरक्षण मंत्री होते. मात्र तेथे कायम स्वरूपाचे मंदिर, धर्मशाळा किंवा पुजाऱ्यास राहण्यासाठी निवासस्थान बांधण्याची मनाई होती. पुढे १९७५ मध्ये

सिमेंट काँक्रीटचे छोटेखानी मंदिर बांधण्यात आले आणि १९८५ मध्ये देवळातील गाभाऱ्यावर संगमरवर लावण्यात आले.

आज मंदिर बरेच बदलले आहे. बाजूने झालेल्या उड्डाणपुलावरूनही मंदिरदर्शन होते. नागपूरसारख्या महानगराच्या मध्यात हे मंदिर असल्याने आज मंदिरात खूप गर्दी होते. देणगीदार मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे मंदिराला वैभव प्राप्त होत आहे. इतर देवस्थानांप्रमाणे या येथील श्री गणेशही जागृत असून नवसाला पावतो, असे भाविक मानतात.

## मूर्ती, मंदिर व परिसर

झाडातूनच या मूर्तीचा उगम झाला असल्यामुळे आणि ती शेंदराने माखली असल्याने मूर्ती आज सुस्पष्ट आकार–स्वरूपात नाही. विशाल भालप्रदेश, सोनेरी डोळ्यांतील रौद्रभाव, गंडस्थळाच्या ठेवणीवरून तिचे भव्यपण लक्षात येते. ही मूर्ती ५०० वर्षांपूर्वीची असावी. ती गोंड राजाच्या काळात घडविली असावी. ती पूजेतील मूर्ती होती आणि हा भाग लष्कराच्या ताब्यात होता. त्यामुळे अधिक खोदकाम झाले नाही. मंदिराचा इतिहास सीताबर्डी किल्ल्याविषयी असलेल्या ग्रंथांत आढळत नाही. हे स्थान भोसलेकालीन असावे. पूर्वी शुक्रवारी तलावाचे पाणी बर्डीच्या किल्ल्यापर्यंत होते. भोसले राजे महालातून नावेने गणेशदर्शनास येत.

सीताबर्डीच्या या गणेश मंदिराच्या पायथ्याशी दक्षिण बाजूस एक 'नागपूरची देवी' म्हणून ठाणे आहे. ती ग्रामदेवता होती की नाही, हे निश्चित नाही. पूर्वी या परिसरात आढळलेला

एक शिलालेख नागपूरच्या संग्रहालयात ठेवला आहे. त्यावर गाई कोरलेल्या असून चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य याचा मांडलिक राजा महाराष्ट्रकूटवंशी धांडीमंडक ह्याच्या वासुदेव नामक दंडनायकाने गाईच्या चाऱ्यासाठी काही निवर्तने जमीन दान दिल्याचा उल्लेख आहे. हा सर्व उल्लेख ब्रिटिश अधिकारी कनिंगहॅम याने आपल्या अहवालात केला होता. हा लेख ११ व्या शतकातील असून 'सीताबर्डीचा लेख' म्हणून ओळखला जातो.

मात्र श्री.के. चितळे यांनी त्यांच्या 'विदर्भातील अष्टगणेशस्थाने' या पुस्तकात यासंदर्भात काही मते मांडली आहेत. त्यानुसार हा शिलालेख मूळचा चंद्रपूर जिल्ह्यातील भांदकचा आहे, हे विनायकराव औरंगाबादकर नावाचे इंग्रजांचे दुभाषी होते त्यांनी व डॉ.य.खु. देशपांडे यांनी 'इंडियन ऑफीस डायरी' च्या कागदपत्रांवरून सिद्ध केले आहे. जेव्हा हे सर्व शिलालेख नागपूरच्या संग्रहालयात संकलित केले तेव्हा हा शिलालेख कोणत्या गावचा, याचा उल्लेख नसल्याने घोटाळा झाला. भद्रावतीच्या वरदविनायकासंबंधी माहितीत ज्या शिलालेखाचा उल्लेख आला आहे, तो हा असावा.

सीताबर्डीची वस्ती खूप प्राचीन नसावी. गवळ्यांच्या वस्त्या पाच–सहाशे वर्षांपूर्वी येथे होत्या. गणेश प्रतिमा इतकी प्राचीन असावी, असे वाटत नाही. ज्या भोसल्यांचा उल्लेख यापूर्वी केला आहे ते राजे रघुजी द्वितीय शुक्रवारी तलावातून नावेने या गणेश दर्शनाला यायचे. त्यांच्यासोबत गायक आणि त्यांची वाद्येही सोबत असायची व ते सूर्यास्तास परत महालात

जात, अशा वर्णनांमुळे ही प्रतिमा तीनशे वर्षांपूर्वीची निश्चितच ठरते.

मंदिराच्या मध्यभागी असलेली ही गणेश मूर्ती विशाल आहे. तिचे मोठे गंडस्थळ, त्यावर असलेला भालचंद्र, लांब शुंड, सुपर्णकर्ण, किंचित रौद्र भाव असलेले नेत्र आहेत. ही शिळा रक्ताश्मस्वरूपाची आहे. मात्र शेंदूरलेपनाने मूर्तीला हात किती, हातात आयुधे किती हे निश्चित सांगता येत नाही. मूर्तीच्या मागे असलेले वृक्षाचे भव्य खोड अजूनही तसेच ठेवले आहे व त्यावर छत उभारले आहे.

सभामंडप आज ५० बाय ५० फुटाचा आहे. त्याची वारंवार दुरुस्ती व बांधकाम होत गेल्याने आज हे मंदिर आकर्षणाचे केंद्र ठरले असून भक्तांची रीघ लागते. आज धर्मशाळा, स्लॅब, कंपौंड, पायऱ्या, प्रवेशद्वार, पाणी व्यवस्था, पार्कींग व्यवस्था अशा सगळ्या सोयी झालेल्या आहेत. मंदिर रात्री १२ ते पहाटे ५ पर्यंत बंद असते. या मंदिरात दररोज सुमारे ५००० भक्त येतात आणि चतुर्थी व सणासुदीला तर हा आकडा ५०००० पर्यंत जातो. बऱ्यापैकी देणगीची आवक असलेल्या या मंदिराचे संकेतस्थळ म्हणजे वेबसाईटसुद्धा आहे. ट्रस्ट मोठी व रजिस्टर्ड आहे. मोठ्या प्रमाणावर धार्मिक कार्यक्रम येथे होत असतात. ट्रस्टने जीर्णोद्धाराचा मास्टर प्लॅन तयार केला असून पूर्वीचे रूप पूर्णतः पालटून जाईल असे वाटते. प्राचीनतेच्या कोणत्या खुणा शिल्लक राहतील हा प्रश्न मात्र आहे.

या मंदिरातच एका बाजूस उत्तराभिमुखी एक तळघर होते, आता केवळ तीन पायऱ्या खाली तिथेच श्री कालभैरवाची

प्राचीन प्रतिमा प्रतिष्ठापित आहे. खाली न उतरता दर्शन घेता येते. याशिवाय आणखी एक भव्य गणेशमूर्ती, महालक्ष्मी, हनुमान यांच्याही मूर्त्या आहेत.

याच मंदिराच्या उत्तरेस भारत सरकारचे सैन्य भरती कार्यालय आहे. तिथे आणखी एक गणेश मंदिर असून त्यास 'फौजी गणपती' म्हणतात. सैन्याचा परिसर असल्याने तेथे एकदम नीरव शांतता असते, गर्दी नसते. परिसर सुंदर निसर्गाने वेढलेला आहे.

## आजूबाजूची पाहण्यासारखी ठिकाणे

नागपुरात आणि आजूबाजूला खूप काही पाहण्यासारखे आहे. सीताबर्डीचा किल्ला, श्री गीता मंदिर, अंबाझरी तलाव व उद्यान, सेमिनरी हिल्स, तेलंगखेडी उद्यान, तेलंगखेडीजवळची प्राचीन मंदिरे, नागपूर सुधार प्रन्यासची विविध उद्याने, क्रेझी कॅसल ॲम्युझमेंट पार्क, सातपुडा बॉटनीकल गार्डन, डॉ. हेडगेवार यांचे रेशीमबागेतील स्मृतिमंदिर, महाराज बाग, अजब बंगला (संग्रहालय), रमण विज्ञान केंद्र, दीक्षाभूमी, नवनवीन मॉल्स, फ्लाय ओव्हर्स, कोराडीची देवी, कामठीचा ड्रॅगन पॅलेस, कोंढाळी रोडवरचे बाजारगाव येथील फन अँड फूड वॉटर पार्क इत्यादी ठिकाणे पाहण्यासारखी आहेत. सीताबर्डीचा किल्ला हा लष्कराच्या ताब्यात असल्याने तो केवळ १५ ऑगस्ट व २६ जानेवारीलाच पाहता येतो.

वैदर्भीय अष्टविनायकात या गणेशाचा समावेश होण्याचे कारण नागपूर शहरात गणेशाची अन्य प्राचीन मूर्ती आढळलेली नाही. विदर्भाची राजधानी, भारताची पर्यायी उपराजधानी आणि महाराष्ट्राचीही उपराजधानी समजले जाणारे नागपूर वैदर्भीय अष्टविनायकांत असणे काळाची गरज होती. भोसल्यांची श्रद्धा, त्यांचे नित्यनेमाने येथे दर्शनाकरिता नावेतून येणे यानुसार हा टेकडी गणेश अष्टविनायकांत समाविष्ट झाला असावा. शिवाय दीर्घकाळ हा भाग लष्कराच्या ताब्यात राहिल्याने ही मूर्ती लुप्त अवस्थेत होती. आज वैदर्भीय अष्टविनायकांतील सर्वात श्रीमंत देवस्थान म्हणून हे सीताबर्डी गणेश मंदिर प्रसिद्धीस आले आहे. नागपूर महानगराच्या अगदी मध्यवर्ती ठिकाणी आणि रेल्वे स्टेशनवरून पायी जाण्याच्या अंतरावर असल्याने भक्तांच्या आकर्षणाचे केंद्र झाले आहे.

# अष्टविनायक यात्रा कशी करावी?

आता भक्तांना प्रश्न पडेल की या वैदर्भीय अष्टविनायकांची यात्रा कशी करावी? मला असे वाटते की परमेश्वरच जर आपला माता आणि पिता असेल तर तो आपल्या अपत्यांवर कुठल्याही कारणाने राग धरणार नाही. अशी सहल केली तर परमेश्वर पावेल आणि उलट केली तर श्री गणेशाचा अपमान होईल, या विचारातून प्रथमत: आपण बाहेर आले पाहिजे. निर्मळ मनाने व भक्तिभावनेने जोडलेले हातही परमेश्वरी कृपेस पात्र आहेत. आपला जीवनमार्ग जर चांगला असेल, तर सर्वशक्तिमान परमेश्वराचा आशीर्वाद प्रत्येक क्षणी आपल्या सोबतच असतो.

वैदर्भीय अष्टविनायकाची यात्रा आपण कुठे राहत आहोत, यावर कुठून सुरू करायची, हे ज्याने त्याने ठरवले पाहिजे. पुण्यामुंबईकडून किंवा विदर्भाच्या पश्चिमेकडून येणारी भक्त मंडळी प्रारंभीचा मुक्काम कुठे करणार, यावर पुढील यात्रा ठरवावी.

आपण पूर्व विदर्भाचा नकाशा जर पाहिला तर नागपूरहून या अष्टविनायकांपैकी सर्वात नैऋत्येला आहे यवतमाळ जिल्हा आणि त्यात असणारा कळंबचा श्री चिंतामणी. श्री चिंतामणी कळंबपासून ईशान्येकडे नागपूर मार्गावर वर्धा व सेलूनंतर केळझरचा सिद्धिविनायक आहे. तेथून परत ईशान्येकडे नागपूरचा टेकडी गणेश आहे. नागपूरच्या वायव्येकडे आदाश्याचा श्री शमीविघ्नेश आहे. आदाश्यापासून पूर्वेकडे रामटेकचा अष्टादशभुजा गणेश आहे. रामटेकच्या दक्षिणेस मेंढ्याचा म्हणजेच भंडाऱ्याचा

भृशुंडगणेश आणि पुन्हा दक्षिणेस पवनीचा श्री पंचानन. पवनीपासून नैऋत्येकडे भांदकचा म्हणजे भद्रावतीचा वरदविनायक आहे. असे हे वर्तूळ आहे.

फक्त अष्टविनायकच करायचे असतील आणि यात्रा जर नागपूरवरून स्वत:च्या वाहनाने सुरू करायची तर पहाटेची टेकडीगणेशाची काकडआरती करून आदाश्याला प्रस्थान करता येते किंवा सरळ एका तासात आदाश्याला पोचून तिथे सकाळची आरती करता येते. आदाश्याहून रामटेकचा मार्ग घ्यावयाचा. रामटेक सुमारे ५९ कि.मी. वर आहे. म्हणजे दीड तास प्रवास. अष्टादशभुजा गणेशाचे दर्शन घेऊन दक्षिणेकडे ७१ कि.मी. वर भंडारा गाठायचे. दीड तासांच्या या प्रवासानंतर मेंढ्याच्या भृशुंडगणेशाचे दर्शन घेऊन भोजनाचा आस्वाद घ्यायचा.

भोजनोत्तर आणखी दक्षिणेकडे ५९ कि.मी. वर पवनीकडे सरकायचे. पवनीच्या पंचाननाचे दर्शन घेऊन भद्रावतीकडे कूच करायचे. पवनी ते भद्रावती सुमारे १२० कि.मी. अंतर आहे. रात्री भद्रावतीत पोचल्यावर जैन मंदिराच्या भव्य अशा धर्मशाळेत मुक्काम करायचा. राहण्याचे बुकींग आधी करून ठेवावे. मंदिराच्या संकेतस्थळाला भेट द्यावी. संपर्क साधून व्यवस्था करून ठेवावी.

सकाळी उठून भांदकच्या वरदविनायकाची आरती करायची आणि १५० कि.मी. वरील कळंबकडे प्रयाण करायचे. वणी, मारेगाव, वडकी, राळेगाव, कळंब असा मार्ग सोयीचा ठरतो. दुसरा मार्ग भद्रावती, वरोरा, वणी, मारेगाव, उमरी जोडमोहा, कळंब असा आहे. दोन्ही प्रवासात वरोरा मार्गे जाता येते किंवा सरळ भद्रावतीवरून वणी मार्ग आहे; पण कोळशाच्या ट्रकच्या वाहतुकीचे प्रमाण फार आहे. रस्ता समाधानकारक नाही.

तसाही वणीचा पट्टा हा कोळशाचाच आहे. पांढरी मोटार काळी होते, इतकी धूळ आणि कोळशाची भुकटी वणीपर्यंत आहे. भद्रावती–कळंब हा प्रवास चार तासांचा आहे.

श्री चिंतामणी, कळंब येथे दर्शन आटोपून मंदिरातील भोजनाचा अर्थात प्रसादाचा आस्वाद घ्यावा. बहुतेक दिवशी कुणा ना कुणा भक्ताचे किंवा देवस्थानचे भोजन असते. नसल्यास नागपूर, वर्धा मार्गावर धाबे आहेतच. वर्धा मार्गे केळझरकडे रवाना व्हायचे. केळझर ७२ कि.मी. अंतरावर आहे. हा प्रवास दोन तासांचा आहे. केळझरलाही महाप्रसाद बरेचदा असतात, भक्तांतर्फे भोजन असते किंवा तिथून पुढे नागपूरकडे १० कि.मी. वर महामार्गावरच खडकीचा मारुती आहे. शनिवार किंवा मारुतीचा सण असल्यास कितीतरी भक्तांची भोजनावळ सुरू असते. रस्त्याने जाता जाता दर्शन अवश्य घ्यावे. अनेक वाहने तिथे थांबलेलीच असतात.

सायंकाळ होत आलेली असेल. अशा वेळी ५२ कि.मी. वरील नागपूरकडे निघायचे. एका तासात नागपूर गाठता येते, असा सुंदर हायवे झालेला आहे. बुटीबोरीपासून तर सहा पदरी मार्ग आहे. नागपूरच्या टेकडी गणेशाची आरती गाठता आली तर फारच बरे! आणि मग वैदर्भीय अष्टविनायकांची ही आवर्त सहल पूर्ण झाल्याच्या समाधानात नागपूरच्या मुक्कामी विश्रांती घ्यावी.

ही दोन दिवसांची सहल केवळ अष्टविनायकांची झाली. जर आपल्याला अन्य पर्यटन स्थळे बघत सहल करायची असेल तर मग किमान ४ दिवसांचा कार्यक्रम आखावा. राहण्याच्या सोयी बहुतेक ठिकाणी होऊ शकतील. काही ठिकाणी मंदिराचे भक्तनिवास आहे. फक्त पवनी, रामटेक, मेंढा येथे भक्तनिवास नाही. मात्र सर्व शहरांच्या ठिकाणी हॉटेल्स आहेतच. रामटेकला

धर्मशाळा आहेत. कळंब, केळझरला मंदिरालगत भक्तनिवासात मुक्कामाची सोय आहे. जैन मंदिरामुळे भद्रावतीत राहण्याची सोय होतेच आणि जर नाहीच झाली तर चंद्रपूर अगदी जवळ आहे. तिथे भरपूर हॉटेल्स आहेत. कळंबच्या जवळ २३ कि.मी. वर यवतमाळ शहर आहे. केळझरवरून तर वर्धा काय नागपूरही जवळ पडते. आदाशा, रामटेक ही तर नागपूरच्या टप्प्यातलीच ठिकाणे आणि मेंढा म्हणजे भंडारा शहरच. एकंदरीत काय कुठेही अडचण जाणार नाही. फक्त पूर्वनियोजन असावे. रात्रीचा प्रवास मात्र टाळावा.

जर नागपुरात राहूनच दर्शन यात्रा करायची असेल आणि दोन्ही दिवशी रात्री नागपुरात परत येऊन मुक्काम करायचा असेल तर थोडा वेळ अधिक लागतो आणि श्रम अधिक होतात. अशा वेळी पहिल्या दिवशी आदाशा, रामटेक, मेंढा आणि पवनी करून नागपुरात परतावे. दुसऱ्या दिवशी भांदक, कळंब, केळझर आणि शेवटी नागपूरचा टेकडी गणेश असा गोल घ्यावा. मात्र दोन्ही दिवशी पोचायला नागपुरात उशीर होऊ शकतो, याची तयारी ठेवावी. त्यातल्या त्यात दुसऱ्या दिवशी तर होतोच. तेव्हा नागपूरचा टेकडी गणेश करून निघावे म्हणजे केळझरहून नागपुरात पोचायला खूप उशीरही झाला तरी हरकत नाही. केळझरचे मंदिर ८ वाजता बंद होते. मग बाहेरूनच दर्शन घ्यावे लागते.


तीन दिवसांची सहल केल्यास पहिल्या दिवशी नागपूरवरून टेकडी गणेशासह आदासा (आदाशा), रामटेक करावे. दुसऱ्या दिवशी मेंढा, पवनी व भद्रावती करावे. तिसऱ्या दिवशी केळझर व कळंब करावे. या प्रवासात सर्वच मार्ग उत्तम आहेत व मावळतीपर्यंत परत येता येते.

पश्चिम महाराष्ट्रातील भक्तांनी स्वतःच्या गाडीने आल्यास कळंब, केळझर, नागपूर, आदासा, रामटेक, मेंढा, पवनी, भद्रावती असे आवर्त दर्शन घ्यावे. वेळेची बचत होते. रेल्वेने येणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रातील मंडळींनी नागपूर हे मुक्कामाचे स्थळ निवडल्यास सर्व सोयी होतात. स्वतःच्या किंवा भाड्याच्या वाहनाने फिरणे मात्र आवश्यक ठरते. अन्यथा बसेस तर आहेत; पण मोठ्या प्रमाणावर प्रत्येक मार्गावर नाहीत, आणि वेळ खूप जातो.

प्रत्येक विनायकाजवळील परिसराचे वर्णन केले आहेच. हाताशी एक पूर्ण दिवस असेल तर चंद्रपूर जिल्ह्यातील वरोऱ्यापासून जवळ असलेले म्हणजेच भद्रावतीपासूनही फारसे अंतर नसलेले ताडोबा अभयारण्य पाहण्यास विसरू नका. कितीतरी प्राणी अगदी वाघही आपल्याला दर्शन देतील; पण पूर्व बुकींग करण्यासाठी संकेतस्थळाचा आधार जरून घ्या. वेळेवर प्रवेशाचे किंवा राहण्याचे बुकींग होत नाही.

चतुर्थी आणि श्रीगणेशाशी संबंधित सण वगळता कुठल्याही मंदिरात फारशी गर्दी राहणार नाही. मात्र उपरोक्त दिनी लांबलच रांगांत उभे राहून दर्शन घ्यावयाचे म्हटल्यास दोन दिवस अपुरे पडतील. तेव्हा व्यवस्थित नियोजन करून भक्तांनी पर्यटन आणि श्री गणेशदर्शन असा दुहेरी योग जुळवून आणावा आणि विदर्भातील प्राचीन अशा अष्टविनायकांचे तसेच इतर शक्य तितक्या स्थळांचे दर्शन घ्यावे. मन प्रसन्न झाल्याशिवाय राहणार नाही, याची शाश्वती घ्यावी.

।। श्री गणेशाय नमः ।।




**वैदर्भीय अष्टविनायक**

(प्राचार्य डॉ. पवन मांडवकर, कळंब ९४२२८६७६५८)

# संदर्भ ग्रंथ / नियतकालिके /वृत्तपत्रे

१. 'चारचौघी' मासिक, गणपती विशेषांक, पुणे, सप्टेंबर, २००८
२. 'चंद्रपूरचा इतिहास', अ.ज. राजूरकर, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, प्रथमावृत्ती, १९५६
३. 'दै. तरुण भारत', नागपूरचे विविध अंक
४. 'दै. दिव्य मराठी', अमरावतीचे विविध अंक
५. 'दै. देशोन्नती', नागपूरचे विविध अंक
६. 'दै. लोकदूत', यवतमाळचे विविध अंक
७. 'दै. लोकमत', नागपूरचे विविध अंक
८. 'दै. लोकसत्ता', नागपूरचे विविध अंक
९. 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास', दे.जो. लांडगे
१०. 'नागपूर परगण्यातील अष्टविनायक', डॉ. बाळ पदवाड, नागपूर
११. 'भद्रावती दर्शन', खुशालदास कामडी, वत्सविनायक प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००९
१२. 'भारतीय संस्कृतिकोश', संपा. महादेवशास्त्री जोशी, विविध खंड, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती, १९६४ ते १९७९
१३. मराठी विश्वकोश, संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी आणि इतर विविध खंड, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती
१४. 'विदर्भातील अष्टगणेशस्थाने', श्री. के. चितळे, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, प्रथमावृत्ती, २००८
१५. 'श्री गणेश कोश', संपा. अमरेंद्र गाडगीळ, पुणे
१६. 'श्री क्षेत्र चिंतामणी कळंब', डॉ. पवन मांडवकर, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र, कळंब, प्रथमावृत्ती, २०१०
याशिवाय विविध मंदिरांची संकेतस्थळे व गूगलवरून प्राप्त माहिती.



View publication stats